# MPSC

# राज्यसेवा पूर्व परीक्षा

## पेपर पहिला व पेपर दुसरा

८ एप्रिल, २०१८

संस्करित प्रश्नपत्रिका

# विश्लेषणात्मक

## विस्तृत स्पष्टीकरणे व संदर्भासह

## २०१८

संस्करण

के'सागर

के'सागर पब्लिकेशन्स

**Published By**
Sau. Shobhadevi Kshirsagar
**K'Sagar Publications**
'Suvarna Shilpa', 444/1 Shaniwar Peth,
Adjacent to Rajmachikar Flour Mill,
Near Dakshinabhimukhi Maruti Temple, Pune - 411 030
: (020) 24450125, 24455435 Fax : 91-020-24453065
***Email : customer@ksagar.com,***
***sales@ksagar.com***
***website : www.ksagar.com***
**© K'Sagar Publications, Pune : 2014**
**Thoroughly Revised Thirteenth Edition, 2018**

❁❁❁

**The name K'Sagar is registered**
**under the trade marks Act, 1999**

❁❁

**Printed at**
A. R. Printers
Paper Galli, Near Kanyashala, Narayan Peth, Pune.

❁

**Typesetting**
K'Sagar Publications, Pune

❁❁

**Cover Design**
K'Sagar Publications, Pune

❁❁❁

**Price : ₹ 75/-**

| Our Firms | K'Sagar's Book Centre | K'Sagar's Book's Agencies | K'Sagar's House of Books |
|---|---|---|---|
| | Appa Balwant Chowk,<br>Pune - 411 002<br>(020) 24453065<br>9823121395<br>9545567862 / 63 | Appa Balwant Chowk,<br>Jogeshwari Mandir Lane,<br>Pune<br>(020) 24465650<br>9923810566 | Appa Balwant Chowk,<br>Jogeshwari Mandir Lane,<br>Pune<br>(020) 24483166<br>9923906500<br>8087722277 |

Due care has been taken to ensure that the information provided in this book is correct. However, the authors and the publishers bear no responsibility for any damage resulting from any inadvertent omission or inaccuracy in the book.

**(प्रश्नपत्रिका संग्रहासोबत मोफत)**

# १

# राज्यसेवा पूर्व परीक्षा पेपर पहिला
# ८ एप्रिल, २०१८

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

१. खालीलपैकी कोणत्या थिअरीज किंवा सिद्धान्त जीवनउत्क्रांतीशी संबंधित आहेत?

(१) नैसर्गिक निवडीचा सिद्धान्त (२) उत्परिवर्तन उत्क्रांतीचा सिद्धान्त

(३) वारसा वर्ण गुणधर्म सिद्धान्त (४) वियोग सिद्धान्त

(अ) १, २ आणि ४ (ब) १, २ आणि ३ (क) १, ३ आणि ४ (ड) वरील सर्व

चार्ल्स डार्विन निसर्गवादी होता. त्याचा जन्म इंग्लंडमध्ये श्रॉपशायर परगण्यात मौंट श्रूसबरी येथे १२ फेब्रुवारी, १८०९ रोजी झाला. उत्क्रांतिवाद व त्याचे कार्य हा सिद्धान्त त्याने मांडला. यालाच डार्विनवाद म्हणतात. उत्क्रांतिविषयक त्याची तत्त्वे (१) ओरिजिन ऑफ स्पेसीज बाय नॅचरल सिलेक्शन (१८५९), म्हणजे नैसर्गिक निवडीच्या प्रक्रियेने जीवजातींची उत्पत्ती, आणि (२) डिस्सेन्ट ऑफ मॅन अँड सिलेक्शन इन रिलेशन टू सेक्स (१८७१), म्हणजे मानवाचा अवतार आणि लिंगसंबंधी निवड, या त्याच्या दोन ग्रंथांत मांडली गेली आहेत.

डार्विनने मांडलेल्या उत्क्रांतीच्या सिद्धान्ताने जैविक, पर्यावरणीय व भौमिक शास्त्रांमध्ये क्रांती घडवली. सजीवांचे सर्वसामान्य अवतरण, सावकाश परिवर्तन व गुणाकारी प्रसरण ही त्या सिद्धान्ताची मुख्य तत्त्वे होती. नैसर्गिक निवड, वांशिक निवड, सहधर्मी वेगळेपण, आनुवंशिक उपलब्धी व निर्देशित वेगळेपण या क्रियांचाही त्याने उल्लेख केला होता. पृथ्वीवरील असंख्य वस्तुजात त्याच्या वातावरणाशी इतके सूक्ष्मपणे समरस कसे होते आणि ते सर्व कोणत्याही दैवी योजनेशिवाय कसे अस्तित्वात येऊ शकते हे साध्या-सोप्या, कार्यकारणभावाने, नैसर्गिक रीतीने डार्विनने खुलासेवार सांगितले. त्याने युक्तिवाद केला की, जगण्यासाठी संघर्ष केलाच पाहिजे. त्याचे फलित हेच की जे या संघर्षात टिकून राहिले ते त्यांच्या पर्यावरणाशी, त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा अधिक, समरस झाले होते. पर्यायाने हा पुनरुत्पादकतेच्या सफलतेचा सिद्धान्त होय. म्हणजे असे की, एकापासून दुसरे उत्पन्न होण्याच्या प्रक्रियेत, तौलनिकदृष्ट्या जे अधिक गुणवान असते ते वाढत जाते व जे जरा कमी दर्जाचे असते ते नष्ट होत जाते.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** इव्होल्यूशन ऑफ जिऑग्रफिकल थॉट – डॉ. माजिद हुसैन के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १२४ व १२५)*

२. खालीलपैकी कोणती संप्रेरके पिट्युटरी ग्रंथीची आहेत?

(१) टीएसएच (२) एसटीएच (३) एचसीजी (४) एडीएच

(अ) १ आणि २ (ब) २ आणि ३ (क) १, २ आणि ४ (ड) १, २ आणि ३

**पियुषिका ग्रंथी (Pituitary glad)** : या ग्रंथी Skull स्फेनॉयड (Sphelhoid), सेलाटर्सिका (Sellaturcica) मध्ये असतात. पियुषिका ग्रंथीना मास्टर ग्रंथी असे म्हटले जाते. कारण या अन्य ग्रंथींच्या होणाऱ्या स्रवणावर नियंत्रण ठेवतात. या ग्रंथी व्यक्तीच्या स्वभाव, आरोग्य, वृद्धी व लैंगिक विकासास प्रेरित करतात. पियुषिका

१. (ब) २. (क)

ग्रंथीद्वारे स्रवित होणारे हार्मोन १. सोमेटोट्रॉपिक हार्मोन (वृद्धी हार्मोन) २. थाइरॉइड प्रेरक हार्मोन ३. एड्रिनोकॉटिको ट्रापिक हार्मोन ४. गोनेडोट्रॉपिक हार्मोन ५. मिलॅनोसाइट प्रेरक हार्मोन ६. वेसोप्रेसिन हार्मोन ७. ऑक्सिटोसीन हार्मोन K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(संदर्भ : राज्यसेवा पूर्व परीक्षा संस्करित प्रश्नपत्रिका विश्लेषणात्मक स्वरूपात विशाल पवार व राहुल फुसे, के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २०६)*

३. अस्थिसंस्था ही खालीलपैकी कोणते कार्य करते?

(१) संरक्षण (२) रक्तोत्पादन/रुधिरजनन

(३) हालचाल सुलभता (४) क्षारांचे संवर्धन/साठा

(अ) १, २ आणि ३ (ब) २, ३ आणि ४ (क) १, ३ आणि ४ (ड) वरील सर्व

**संयोजी ऊतीचे प्रकार**

संयोजी ऊतीचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येईल—

(१) **अस्थी** : अस्थी शरीरातील मुख्य अवयवांना आधार देतात. अतिशय मजबूत असून लवचीक नसतात. अस्थी या कॅल्शियम व फॉस्फरस यांच्या संयुगापासून बनलेल्या आधारकात घट्ट रुतलेल्या असतात.

(२) **अस्थिबंध** : अस्थिबंधामुळे दोन हाडे एकमेकांशी जोडली जातात. यात कमी प्रमाणात आधारक असतात. अस्थिबंध पायाच्या पोटरीतील हाड व मांडीतील हाड पांढऱ्या रक्तपेशी, लाल रक्तपेशी यांना जोडते, त्यामुळे गुडघ्यास मजबूती येते.

(३) **रक्त** : रक्त हे द्रायू संयोजी ऊती आहे. यामध्ये द्रवरूप आधारक असते, त्याला रक्तद्रव म्हणतात. यात पांढऱ्या रक्तपेशी, लाल रक्तपेशी व रक्तपट्टिका असतात. रक्ताद्वारे ऑक्सिजन, अन्नातील पोषणद्रव्ये व संप्रेरके यांचे वहन केले जाते.

(४) **स्नायू रज्जू** : याच्याद्वारे स्नायू हाडांशी जोडले जातात. हे तंतुमय असून खूप मजबूत असतात. यामुळे अस्थींची हालचाल होते.

(५) **कास्थी** : यातील पेशी या विस्तृत भागात विखुरलेल्या असतात. कास्थीमुळे हाडांच्या सांध्यास नरमपणा येतो. कास्थी नाक, कान, स्वरयंत्र, श्वसनलिका यांमध्ये आढळतात.

(६) **विरल ऊती** : या ऊती त्वचा व स्नायू यांच्या दरम्यान, रक्तवाहिन्यांच्या भोवती व चेतातंतू यांमध्ये आढळतात.

(७) **चरबीयुक्त ऊती** : या ऊती मेदपिंडाने भरलेल्या असतात. त्वचेखाली, वृक्काच्या भोवती, आंतरिंद्रियांमध्ये आढळतात. या ऊती त्या उष्णतारोधक म्हणून कार्य करतात.

*(संदर्भ : समग्र सामान्य विज्ञान - प्रा. नवनाथ जाधव के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २१२)*

४. ग्रेगर मेंडेल यांना जनुकशास्त्राचे जनक असे संबोधले जाते, कारण त्यांनी प्रथम अनुवंशिकतेचा सिद्धान्त मांडला. त्यांची प्रयोगशाळेतील संशोधनसामग्री कोणती होती?

(अ) फ्रुट फ्लाय (फलमाशी) (ब) ब्रेड मोल्ड (बुरशी) (क) वाटाण्याचे झाड (ड) रेसुस माकड

इ. स. १८५६ मध्ये **ग्रेगर मेंडेल** याने वाटाण्याच्या झाडावर प्रयोग करून काही निरीक्षणे मांडली. वनस्पतींचा रंग, आकार वगैरे गुणधर्म त्यांच्यातील मूलगामी आनुवंशिक कणांवर अवलंबून असतात. या कणांनाच आपण आता 'जनुके' किंवा 'जीन्स' म्हणतो. जनुके ही 'डीएनए'चा भाग आहेत. म्हणजेच अशा अनेक जनुकांपासून

३. (ड) ४. (क)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

डीएनए चा एक रेणू तयार होतो. प्रत्येक सजीवात केंद्रक आम्ले असतात. ही दोन प्रकारची असतात. एकाला 'डीएनए' व दुसऱ्याला 'आरएनए' म्हणतात.

आपण नेहमीच बघतो, की गहू पेरले तर गव्हाचेच पीक येते किंवा मांजरीची पिल्ले अगदी मांजरीसारखीच दिसतात. आईवडिलांकडून मुलांकडे किंवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीत गुण संक्रमित होत असतात. या गुणधर्माला 'आनुवंशिकता' असे म्हणतात. आनुवंशिकतेचा शास्त्रीय पद्धतीने **ग्रेगर मेंडेल** या ऑस्ट्रियन धर्मगुरूने सर्वप्रथम अभ्यास केला. त्याचे प्रयोग अत्यंत अचूक आणि वैशिष्ट्यपूर्ण होते. मेंडेलने आपल्या प्रयोगासाठी वाटाणा या वनस्पतीची निवड केली. इ. स. १८६६ मध्ये त्याने आपल्या प्रयोगाची निरीक्षणे एका वैज्ञानिक मासिकात प्रसिद्ध केली.

वरील प्रयोगावरून मेंडेलने आनुवंशिकतेचे नियम तयार केले.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** संपूर्ण सामान्य विज्ञान - प्रा. कविता भालेराव, के'सागर पब्लिकेशन्स, (एकोणिसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ५६, ५२, ५३)*

५. 'M' हे मूलद्रव्य डोबेरायनर त्रिकके Ca, M आणि Ba मध्ये .... हे आहे.

(अ) Be (ब) Mg (क) Sr (ड) I

डोबेरायनर हा मूलद्रव्यांचे वर्गीकरण करणारा पहिला शास्त्रज्ञ होय. त्याने समान गुणधर्माच्या तीन तीन मूलद्रव्यांचे गट तयार केले व त्यांना त्रिकके संबोधले. रासायनिकदृष्ट्या समान गुणधर्म असलेल्या मूलद्रव्यांची मांडणी त्यांच्या अणुभारांकाच्या चढत्या क्रमाने त्रिककांमध्ये केली असता मधल्या मूलद्रव्याचा अणुभारांक हा त्रिककामधील अन्य मूलद्रव्यांच्या सरासरीएवढा असतो असे त्याने १८२९ मध्ये दाखवून दिले. यालाच 'डोबेरायनरच्या त्रिककांचा नियम' असे म्हणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| उदाहरणार्थ– (१) | Li | Na | K |
| | ७ | २३ | ३९ |
| (२) | Ca | Sr | Ba |
| | ४० | ८८ | १३७ |

**डोबेरायनरच्या त्रिककांच्या त्रुटी किंवा मर्यादा**

(१) त्या काळी ज्ञात असलेल्या सर्व मूलद्रव्यांचे त्रिककांमध्ये वर्गीकरण करता आले नाही.

(२) त्रिककांमधील बऱ्याच गटांबाबत सरासरी ततोतंत आली नाही.

*(**संदर्भ :** समग्र सामान्य विज्ञान - प्रा. नवनाथ जाधव के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २१७)*

६. काष्ठजन्य अल्कोहोल म्हणजेच ....

(अ) मिथेनॉल (ब) इथेनॉल

(क) बेन्झिल अल्कोहोल (ड) आयसोप्रोपिल अल्कोहोल

**मिथिल अल्कोहोल ($CH_3OH$) :** यालाच मिथेनॉल किंवा वूड अल्कोहोल म्हणतात. मिथिल अल्कोहोल आणि इथिल अल्कोहोलच्या मिश्रणाला मिथिलेटेड स्पिरीट म्हणतात. याचा वापर लाकडी फर्निचरला पॉलिश करण्यासाठी तद्वतच रंगात आणि वॉर्निशमध्ये केला जातो.

*(**संदर्भ :** संपूर्ण सामान्य विज्ञान -प्रा. कविता भालेराव, के'सागर पब्लिकेशन्स, (एकोणिसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २४२)*

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

५. (क) ६. (अ)

७. पाण्यात क्लोरीन नेहमी मिसळतात; कारण ....

(अ) ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. (ब) जंतू नष्ट करण्यासाठी उपयुक्त

(क) गाळ काढण्यासाठी. (ड) न विरघळणारी अशुद्धता घालविण्यासाठी.

**क्लोरीन** (Chlorine - Cl) : मिठाच्या रूपात निसर्गात मोठ्या प्रमाणात सापडतो. पाण्यात विरघळतो. हवेपेक्षा जड, विषारी, हिरवट पिवळसर रंग, कागदाच्या, कापडाच्या कारखान्यांत वापरतात. पाणीशुद्धीकरणासाठी अत्यंत उपयुक्त.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** संपूर्ण सामान्य विज्ञान - प्रा. कविता भालेराव के'सागर पब्लिकेशन्स, (एकोणिसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २६२)*

८. खालीलपैकी कशामुळे गंजण्याची क्रिया होते.

(अ) फक्त भौतिक अभिक्रिया (ब) फक्त रासायनिक अभिक्रिया

(क) दोन्ही अ व ब (ड) कोणतीही नाही.

रासायनिक प्रक्रियेत जेव्हा पदार्थाचा ऑक्सिजनशी संयोग होतो किंवा पदार्थातील हायड्रोजन काढून टाकला जातो, तेव्हा त्या क्रियेस 'ऑक्सिडेशन' म्हणतात. आधुनिक रसायनशास्त्राच्या अभ्यासानुसार अणूने अथवा अणुसमूहाने इलेक्ट्रॉन गमावण्याच्या क्रियेला 'ऑक्सिडेशन' म्हणतात. काही धातूंमध्ये ऑक्सिडेशनमुळे पदार्थाचे ऑक्साइड बनतात; त्यामुळे धातूंना गंज चढतो. ही क्रिया दमट हवेत घडते. अधातूंचा ऑक्सिजनशी संयोग झाल्यानंतर जी ऑक्साइडस् तयार होतात ती पाण्यात विरघळल्यास त्यांचे आम्लात रूपांतर होते. अशा ऑक्साइडस्ना 'आम्लधर्मी ऑक्साइडस्' म्हणतात. काही धातूंचे ऑक्साइडस् अल्कधर्मी असतात व ते पाण्यात विरघळविल्यास त्यापासून अल्कली तयार होतात. पोटॅशिअम परमँगनेट, हायड्रोजन पेरॉक्साइड इत्यादी पदार्थ ऑक्सिडाइजिंग एजंट आहेत. ते ऑक्सिडेशनला मदत करतात. अशुद्ध रूपातील खनिजांपासून वेगवेगळे धातू वेगळे काढण्यासाठी कारखान्यांमध्ये ऑक्सिडेशन-रिडक्शन या प्रक्रिया सतत केल्या जातात.

*(**संदर्भ १. :** संपूर्ण सामान्य विज्ञान - प्रा. कविता भालेराव के'सागर पब्लिकेशन्स, (एकोणिसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २३७)*

*(**संदर्भ २. :** समग्र सामान्य विज्ञान - प्रा. नवनाथ जाधव, के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १८६)*

९. नैसर्गिक वायूमध्ये .... चे प्रमाण मुख्यत्वे करून असते.

(अ) ब्युटेन (ब) प्रोपेन (क) मिथेन (ड) इथेन

**नॅचरल गॅस** : कोळसा किंवा खनिज तेलाच्या खाणीच्या प्रदेशात नॅचरल गॅस आढळतो.

उदाहरणार्थ– (१) मिथेन-८० ते ९० टक्के. (२) इथेन-६ ते १० टक्के.

(३) प्रोपेन-३ ते ५ टक्के. (४) ब्युटेन-१ ते २ टक्के.

त्याचबरोबर थोड्या प्रमाणात नायट्रोजन, कार्बन-डाय-ऑक्साइड, हायड्रोजन सल्फाइड, हेलियम हे वायू असतात.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** समग्र सामान्य विज्ञान - प्रा. नवनाथ जाधव, के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ८५)*

**७. (ब) ८. (ब) ९. (क)**

१०. नैसर्गिक स्रोतातील कोणत्या घटकापासून चरबी आणि तेल मिळते?

(अ) कार्बोदके (ब) लिपिड (क) प्रथिने (ड) टर्पिन

११. भारतीय राज्यघटनेच्या खालीलपैकी कोणत्या तरतुदी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी लागू झाल्या?

(१) नागरिकत्व (२) निवडणुका (कलम ३२४)

(३) तात्पुरती संसद (४) मूलभूत अधिकार

(अ) १, २ आणि ३ (ब) २, ३ आणि ४ (क) १ आणि ३ (ड) १ आणि २

कलम ५, ६, ७, ८, ९, ६०, ३२४, ३६६, ३६७, ३७९, ३८०, ३८८, ३९१, ३९२ आणि ३९३ मधील नागरिकत्व, निवडणुका, हंगामी संसद, तात्पुरत्या आणि संक्रमणीय तरतुदी आणि लघु शीर्षक या राज्यघटनेतील तरतुदी २६ नोव्हेंबर, १९४९ पासूनच अमलात आल्या.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** इंडियन पॉलिटी – एम लक्ष्मीकांत, के'सागर पब्लिकेशन्स, (दहावी रिप्रिंट आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३७)*

१२. खालीलपैकी कोणत्या प्रकरणात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेत संसदेला बदल करता येणार नाही, असा निर्णय दिला?

(अ) शंकरी प्रसाद विरुद्ध भारत सरकार (ब) गोलकनाथ विरुद्ध पंजाब राज्य

(क) केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (ड) मिनर्व्हा मिल्स लि. विरुद्ध भारत सरकार

चोविसाव्या घटनादुरुस्ती अन्वये राज्यघटनेच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकारांवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले. मूलभूत हक्कातही दुरुस्ती करण्याचा संसदेला अधिकार आहे हे या घटनादुरुस्तीने स्पष्ट केले; परंतु चोविसाव्या घटनादुरुस्तीला 'केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य' (इ. स. १९७३) या खटल्याद्वारे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने या वेळी मात्र ही घटनादुरुस्ती उचलून धरताना मूलभूत हक्कांत दुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार मान्य केला. म्हणजे गोलकनाथ खटल्यात त्याने जी भूमिका घेतली होती तिचा या वेळी त्याग केला. न्यायालयाने असे स्पष्ट केले की, चोविसाव्या घटनादुरुस्तीपूर्वीही संसदेला राज्यघटनेच्या कोणत्याही भागात दुरुस्ती करण्याचा अधिकार होता. या घटनादुरुस्तीने ते आणखी स्पष्ट शब्दांत नमूद केले इतकेच.

**मूलभूत संरचना किंवा चौकट**

'केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य' या खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने आणखी एक महत्त्वाचा सिद्धान्त पुढे आणला. त्याने एकीकडे मूलभूत हक्कांत दुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार मान्य करताना दुसरीकडे असेही प्रतिपादन केले की, राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेत किंवा चौकटीत (Basic Structure) बदल करण्याचा अधिकार मात्र संसदेला नाही. राज्यघटनेचे श्रेष्ठत्व, प्रजासत्ताक व लोकशाही शासनपद्धती आणि देशाचे सार्वभौमत्व, घटनेचे धर्मनिरपेक्ष व संघराज्यात्मक स्वरूप, कायदे मंडळ व न्यायालये यांच्या अधिकारांची विभागणी, व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व एकात्मता ही सात तत्त्वे घटनेची मूलभूत तत्त्वे म्हणून निश्चित करण्यात आली.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण – के'सागर, के'सागर पब्लिकेशन्स, (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ९३)*

१०. (ब) ११. (अ) १२. (क)

१३. भारताच्या उपराष्ट्रपतीबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(१) या पदासाठी असलेल्या निर्वाचन मंडळामध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या निर्वाचित सदस्यांचा समावेश असतो.

(२) ते राष्ट्रपतीच्या अनुपस्थितीमध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ नाही इतक्या कालावधीसाठी राष्ट्रपतिपदावर राहू शकतात.

(३) या पदाच्या निवडणुकीसाठी किमान २० मतदार हे प्रस्तावक आणि २० मतदार हे अनुमोदक असणे आवश्यक असते.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(अ) १ (ब) २ (क) ३ (ड) यांपैकी एकही नाही.

भारतीय घटनेच्या कलम ६३ मध्ये उपराष्ट्रपतिपदाची तरतूद करण्यात आली आहे.

(१) राज्यघटनेतील कलम ६४ मधील तरतुदीनुसार उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

(२) राष्ट्रपतींचे पद मृत्यू, राजीनामा, आजारपण वा अन्य कारणाने रिक्त असल्यास राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत उपराष्ट्रपती त्यांचे काम पाहतात.

(३) संसदेच्या दोन्ही गृहांतील सदस्यांमार्फत उपराष्ट्रपतींची निवड केली जाते.

(४) उपराष्ट्रपतिपदासाठी पात्र ठरण्यासाठी संबंधित उमेदवार भारताचा नागरिक असावा. त्याचे वय ३५ वर्षे पूर्ण असावे. तो राज्यसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असावा. तसेच तो केंद्र अथवा राज्यशासनामध्ये कोणतेही फायद्याचे पद भूषवीत नसावा. तो संसदेच्या कोणत्याही गृहाचा सभासद असू नये. तो संसदेच्या एखाद्या गृहाचा सभासद असल्यास उपराष्ट्रपती म्हणून निवडून येताच त्याचे सदस्यत्व आपोआप रद्द होते.

(५) उपराष्ट्रपतिपदासाठी उभ्या राहणाऱ्या उमेदवाराचे नाव निर्वाचक मंडळातील किमान वीस सदस्यांनी सुचविणे अगत्याचे असून तितक्याच सदस्यांनी त्यास अनुमोदन देणे गरजेचे आहे. म्हणजेच त्याच्या नामांकन पत्रावर निर्वाचक मंडळातील चाळीस सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असतात. राष्ट्रपतिपदाच्या उमेदवाराप्रमाणेच उपराष्ट्रपतिपदाच्या उमेदवारासही रुपये पंधरा हजार इतकी रक्कम अनामत ठेवावी लागते. वर उल्लेखिलेल्या निर्वाचक मंडळात संसदेच्या दोन्ही गृहांतील निर्वाचित सदस्यांचा समावेश होतो.

(६) उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसंदर्भात काही वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहेत. (कलम ७१).

(७) उपराष्ट्रपतींना त्यांनी त्यांचे पद स्वीकारण्यापूर्वी राष्ट्रपतींसमोर किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या व्यक्तीसमोर शपथ ग्रहण करावी लागते. (कलम ६९).

(८) उपराष्ट्रपतिपदाची मुदत पाच वर्षे असते. तथापि, तत्पूर्वी त्यांनी राजीनामा दिल्यास अथवा त्यांना पदावरून कमी केल्यास त्यांची मुदत संपुष्टात येते.

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण – के'सागर, के'सागर पब्लिकेशन्स, (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १६५)*

१४. खालील विधाने विचारात घ्या.

(१) विभागीय परिषदा या घटनात्मक संस्था आहेत.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(२) पंतप्रधान हे सर्व विभागीय परिषदांचे अध्यक्ष म्हणून कार्य करतात.

(३) प्रत्येक मुख्यमंत्री हा आळीपाळीने विभागीय परिषदेचा उपाध्यक्ष म्हणून कार्य करतो.

(४) दोन किंवा अधिक विभागीय परिषदांच्या संयुक्त बैठकींचे अध्यक्षस्थान केन्द्रीय गृहमंत्री भूषवितो.

**१३. (ड)**

(अ) विधान १, २ आणि ३ बरोबर (ब) विधाने २, ३ आणि ४ बरोबर

(क) विधाने १, ३ आणि ४ बरोबर (ड) विधान ३ आणि ४ बरोबर

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**विभागीय परिषदा**

(१) विभागीय परिषदा या वैधानिक संस्था आहेत. विभागीय परिषदांची स्थापना राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ या संसदेच्या कायद्याने झाली आहे.

(२) या कायद्यामध्ये देशाचे उत्तर, मध्य, पूर्व, पश्चिम आणि दक्षिण असे पाच विभाग पाडले आहेत व प्रत्येक विभागासाठी विभागीय परिषदेची तरतूद केली आहे.

(३) देशाचे नैसर्गिक भाग, नद्यांची स्थिती, संचार व दळणवळणाची साधने, सांस्कृतिक व भाषिक साम्य, आर्थिक विकासासाठीच्या गरजा, संरक्षण आणि कायदा व सुव्यवस्था इत्यादी घटक हे विभाग बनविताना विचारात घेतले आहेत.

प्रत्येक विभागीय परिषदेत पुढील सदस्य असतात–

- केंद्रीय गृहमंत्री
- विभागातील सर्व राज्यांचे मुख्यमंत्री
- विभागातील प्रत्येक राज्याचे इतर दोन मंत्री.
- विभागातील प्रत्येक केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक

विभागीय परिषदेत पुढील व्यक्ती सल्लागार म्हणून विभागीय परिषदेशी संलग्न असतात. (मतदानाचा अधिकार नाही)

- नियोजन आयोगाने नामनिर्देशित केलेला सदस्य
- विभागातील प्रत्येक राज्याचा मुख्य सचिव
- विभागातील प्रत्येक राज्याचा विकास आयुक्त
- केंद्रीय गृहमंत्री हा पाचही विभागीय परिषदांचा अध्यक्ष असतो. प्रत्येक मुख्यमंत्री आळीपाळीने परिषदेचा उपाध्यक्ष असतो व त्याचा कार्यकाल एका वेळी एक वर्ष असतो.

*(**संदर्भ :** राज्यसेवा पूर्व परीक्षा संस्करीत प्रश्नपत्रिका विश्लेषणात्मक स्वरुपात – विशाल पवार व राहुल फुसे, के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २७३–२७४)*

१५. स्थानिक शासनावरील दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या सहाव्या अहवालातील शिफारशी .... आहेत.

(१) एक दशलक्ष लोकसंख्येपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांमध्ये समान महानगरीय वाहतूक प्राधिकरण निर्माण करण्यात यावे.

(२) स्थानिक संस्था लोकपाल–लोकायुक्त स्थापन करावेत.

(३) महापौरांची सरळ निवड.

(४) जिल्हा मंडळे स्थापन करावीत आणि त्यांचे मुख्य सचिव म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी कार्य करावे.

(अ) १, २ आणि ३ (ब) २, ३ आणि ४

(क) १, ३ आणि ४ (ड) १, २, ३ आणि ४

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**१४. (ड) १५. (ड)**

भारत सरकारने (प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभाग, कार्मिक मंत्रालय) ऑगस्ट, २००५ मध्ये वरिष्ठ काँग्रेस नेते आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोईली यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाची (Second Administrative Reforms Commission : ARC) स्थापना केली. लोकप्रशासन प्रक्रियेत मोठ्या सुधारणांचा तपशीलवार आराखडा बनविण्यासाठी चौकशी आयोग म्हणून याची स्थापना करण्यात आली. मे, २००९ मध्ये आयोगाने आपले काम पूर्ण केले.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**स्थानिक शासनासंबंधी**

(१) विकेंद्रीकरणाच्याही पुढे जाऊन स्थानिक संस्थांना स्वयंशासित संस्था म्हणून विकसित करण्यासाठी स्थानिक लोकशाहीला चालना द्यावी अशी आयोगाने शिफारस केली आहे.

(२) दक्षिण आफ्रिकेतील कायद्याच्या धर्तीवर स्थानिक संस्थांच्या जबाबदाऱ्या, त्यांची कार्ये, त्यांच्याकडे सोपविलेले अधिकार याविषयी ठळक तत्त्वे मांडणाऱ्या कायद्याचा आराखडा सरकारने संसदेसमोर मांडावा अशी शिफारस आयोगाने केली आहे.

(३) भूतकाळातील वसाहतवादी प्रणालीतील असलेल्या सध्याच्या प्रणालीच्या जागी जिल्हा स्तरावर तिसऱ्या स्तरावरील लोकशाही सरकार प्रणाली आणण्याचा प्रस्ताव आहे. सध्याच्या प्रणालीच्या जागी शहरी व ग्रामीण क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणारी जिल्हा परिषद संघटित केली पाहिजे आणि जिल्हा अधिकारी हा परिषदेचा मुख्य सचिव असेल व नियामक कार्यांसाठी तो राज्य शासनाला उत्तरदायी असेल. यामुळे ग्रामीण आणि शहरी क्षेत्रीय नियोजन आणि विकास कार्ये एकत्र येणे हे सुनिश्चित होईल.

(४) प्रत्येक राज्यामध्ये विधान परिषद स्थापन करण्यासाठी संसद तरतूद करील. स्थानिक संस्थांच्या दृष्टिकोनांना महत्त्व मिळविण्यासाठी यामध्ये स्थानिक संस्थांनी निवडून दिलेले सदस्य असतील.

(५) निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करणे, मतदारसंघांचे आरक्षण आणि परिसीमनाचे काम राज्य निवडणूक आयोगाकडे सोपवावे.

(६) राज्य वित्त आयोग अशा पद्धतीने संघटित करावा जेणेकरून स्थानिक संस्थांची वित्तीय परिस्थिती सुधारण्यासाठी केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी विचारात घेतल्या जातील, अशी शिफारस आयोगाने केली.

(७) राज्यघटनेनुसार स्थानिक संस्थांकडे सोपविलेल्या सर्व कार्यांची संपूर्ण जबाबदारी त्या संस्था घेतील आणि वीजमंडळे व जल प्राधिकरणे अशा संस्था त्यांना उत्तरदायी असतील, अशी आयोगाने शिफारस केली. स्थानिक संस्थांच्या कामकाजामध्ये उत्तरदायित्व व पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी कुप्रशासन व लाचलुचपतीच्या तक्रारींसाठी स्थानिक संस्था लोकपाल नेमला जावा, असे सुचविले आहे.

(८) जलदगतीने होणाऱ्या शहरीकरणाच्या समस्या हाताळण्यासाठी, आयोगाने शहरीकरणाकरिता एक राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याची शिफारस केली आहे. तसेच महापौराची निवडणूक सार्वत्रिक मतदानाद्वारे थेट पद्धतीने व्हावी असे आयोगाला वाटते.

(९) आयोगाने जकात कर रद्द करावा अशी शिफारस केली आहे आणि त्यामुळे होणाऱ्या महसुलाच्या नुकसानीच्या भरपाईसाठी सरकारने यंत्रणा विकसित करावी असे सुचविले आहे.

(१०) शहरी वाहतुकीची विशेषत: मोठ्या शहरातील, समस्या हाताळण्यासाठी सामन्वयिक नियोजनासाठी दहा लाखांहून जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांसाठी एकात्मिक महानगर वाहतूक प्राधिकरण स्थापन करावे, असे सुचविले आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** गव्हर्नन्स इन इंडिया - एम लक्ष्मीकांत के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ४६१-४६२)*

१६. खालीलपैकी कोणती मार्गदर्शक तत्त्वे ही मूळ राज्यघटनेचा भाग नव्हती परंतु त्यांचा समावेश नंतर घटनादुरुस्तीद्वारे करण्यात आला?

K'Sagar Publication

(१) उत्पन्नातील विषमता कमी करणे.Subscribe → @ksagarfocus

(२) पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन आणि वने व वन्यजीवसृष्टीचे रक्षण करणे.

(३) समान कामांबद्दल स्त्री-पुरुषांना समान वेतन.

(४) समान न्यायाची शाश्वती आणि गरिबांना मोफत कायदेविषयक साहाय्य.

(५) सर्व नागरिकांना उपजीविकेची पुरेशी साधने सुरक्षित करणे.

(अ) १, २ आणि ३ (ब) २, ३ आणि ४ (क) ३, ४ आणि ५ (ड) १, २ आणि ४

**आर्थिक स्वरूपाची मार्गदर्शक तत्त्वे**

**कलम ३९ :** सरकारने आपले धोरण अशा प्रकारे आखावे की ज्यायोगे- सर्व नागरिकांना, स्त्री-पुरुषांना समान मानून उपजीविकेची पुरेशी साधने उपलब्ध होतील; समाजाच्या भौतिक साधनांची मालकी आणि नियंत्रण अशा प्रकारे विभागण्यात येईल की, ज्यायोगे समाजाचे सार्वत्रिक कल्याण साधेल; अर्थव्यवस्थेच्या संचालनात संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही आणि उत्पादनाची साधने समाजहितविरोधी वापरली जाणार नाहीत; स्त्री-पुरुषांना समान दर्जाच्या कामासाठी समान वेतन मिळेल; स्त्री आणि पुरुष कामगारांचे शारीरिक स्वास्थ्य आणि शक्ती यावर विघातक परिणाम होणार नाही; लहान मुलांच्या कोवळ्या वयाचा दुरुपयोग केला जाणार नाही आणि कोणत्याही नागरिकांवर त्याच्या वयाला आणि शक्तीला झेपणार नाही असे काम करण्याची पाळी येणार नाही; मुलांना स्वास्थ्यपूर्ण, मुक्त आणि सन्मानपूर्ण वातावरणात स्वत:चा विकास करण्याची संधी मिळेल; त्यांना भौतिक आणि नैतिक पिळवणुकीपासून संरक्षण मिळेल. (हे मार्गदर्शक तत्त्व बेचाळिसावी घटनादुरुस्ती, १९७६ अन्वये नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे.)

**कलम ४३-ए :** औद्योगिक क्षेत्रात आवश्यक ते कायदे करून कामगारांना उद्योगधंदे, कारखाने यांच्या व्यवस्थापनात सहभागी करून घेण्यासाठी राज्य प्रयत्न करील. (हे मार्गदर्शक तत्त्व बेचाळिसावी घटनादुरुस्ती १९७६ अन्वये नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे.)

**कलम ४८ ए :** पर्यावरणात सुधारणा घडवून आणणे, जंगले व जंगली श्वापदे यांचे संरक्षण व संवर्धन करणे यासाठी राज्य प्रयत्न करील. (हे मार्गदर्शक तत्त्वही बेचाळिसावी घटनादुरुस्ती १९७६ अन्वये नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे.)

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण - के'सागर के'सागर पब्लिकेशन्स (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ६१)*

१७. खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

(१) संसद कर वाढवू शकते.

(२) संसद कर कमी करू शकत नाही.

(३) संसद कर रद्द करू शकते.

(४) संसद कर वाढवू शकत नाही.

(५) संसद कर कमी करू शकते.

(अ) १, ३ आणि ५ (ब) २, ३ आणि ४ (क) ३, ४ आणि ५ (ड) ३ आणि ४

अंदाजपत्रकाला मंजुरी देणे हा संसदेचा अधिकार असतो. सरकार संसदेच्या संमतीशिवाय कोणतेही कर बसवू शकत नाही किंवा पैसा खर्चही करू शकत नाही.

संसद कर कमी करू शकते किंवा रद्द करू शकते; पण संसद कर वाढवू शकत नाही.

१६. (ड) १७. (क)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

आर्थिक अधिकारांबाबत लोकसभेचे श्रेष्ठत्व मान्य करण्यात आले आहे. अर्थविषयक विधेयक प्रथम लोकसभेतच मांडले जाऊ शकते. लोकसभेने संमत केलेले अर्थविषयक विधेयक राज्यसभा फेटाळू शकत नाही. ती त्यासंबंधी फक्त काही सूचना करू शकते. तसेच या विधेयकावर राज्यसभेने १४ दिवसांच्या आत निर्णय घेणे तिच्यावर बंधनकारक असते.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण – के'सागर
के'सागर पब्लिकेशन्स, (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १७३, १७४)*

१८. शून्य प्रहराच्या संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने अचूक आहेत?

(१) संसदीय कार्यपद्धतीमध्ये शून्य प्रहर ही नावीन्यपूर्ण संकल्पना भारतामध्ये उदयास आली.

(२) प्रश्नोत्तराचा तास आणि सभागृहाचे कामकाज यांच्या मधल्या काळाला शून्य प्रहर म्हणतात.

(३) ही संकल्पना १९६२ पासून प्रत्यक्षात आली.

(४) शून्य प्रहर हे संसद सदस्यांना उपलब्ध असलेले अनौपचारिक स्वरूपाचे माध्यम आहे.

(अ) १, २ आणि ३ (ब) १, ३ आणि ४ (क) २ आणि ३ (ड) वरील सर्व

**शून्य प्रहर** : प्रश्नोत्तराच्या तासाप्रमाणे शून्य प्रहराचा कामकाजाच्या नियमामध्ये उल्लेख नाही. कोणतीही पूर्वसूचना न देता मुद्दा उपस्थित करण्याचे संसद सदस्यांचे हे एक अनौपचारिक साधन आहे. शून्य प्रहर प्रश्नोत्तराचा तास संपला की लगेच सुरू होतो आणि संसदेचे दिवसाचे नियमित कामकाज सुरू होईपर्यंत असतो. म्हणजेच प्रश्नोत्तराचा तास व दिवसाचे विषयपत्रक यांमधील वेळ म्हणजे शून्य प्रहर. संसदीय प्रक्रियेतील हा भारताचा एक नवोपक्रम असून सन १९६२ पासून अस्तित्वात आहे.

*(**संदर्भ :** गव्हर्नन्स इन इंडिया – एम लक्ष्मीकांत
के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २०५)*

१९. खालील विधाने लक्षात घ्या.

(१) राज्यघटनेच्या नवव्या विभागातील तरतुदी या पाचव्या परिशिष्टात समावेश असलेल्या क्षेत्रांस लागू नाहीत.

(२) पाचव्या परिशिष्टात समाविष्ट असणाऱ्या क्षेत्रात सात राज्यांचा समावेश होतो.

(३) १९९६ मध्ये संसदेने अशा क्षेत्रांसाठी पेसा (PESA) कायदा मंजूर केला.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने अचूक आहेत?

(अ) १ आणि २ (ब) १ आणि ३ (क) फक्त १ (ड) वरील सर्व

घटनेच्या भाग नऊ मधील पंचायतींसंबंधित तरतुदी परिशिष्ट पाच मधील क्षेत्रांना लागू नाहीत; परंतु काही अपवाद आणि बदल करून संसद या तरतुदी अशा क्षेत्रांना लागू करू शकते. या तरतुदींअन्वये संसदेने पंचायती (अनुसूचित क्षेत्रांना लागू करणे) कायदा, १९९६ संमत केला. (याला सर्वसाधारणपणे पेसा (PESA) म्हटले जाते.)

सध्या दहा राज्यांमध्ये परिशिष्ट पाचमधील क्षेत्रे आहेत. ही राज्ये पुढीलप्रमाणे– आंध्र प्रदेश, तेलंगाणा, छत्तीसगढ, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा आणि राजस्थान. उपरोक्त सर्व दहा राज्यांनी आवश्यक ती वैधानिक पूर्तता करून आपापल्या राज्यातील पंचायत राज कायद्यात योग्य त्या दुरुस्त्या केल्या आहेत.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** इंडियन पॉलिटी – एम लक्ष्मीकांत,
के'सागर पब्लिकेशन्स, (दहावी रिप्रिंट आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ४८२)*

१८. (ड) १९. (ब)

२०. राज्यघटनेच्या कोणत्या कलमामध्ये हिंदी भाषेचा प्रसार करण्याची व ती भारताच्या संमिश्र संस्कृतीच्या सर्व घटकांना अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून उपयोगाला येईल अशा रीतीने तिचा विकास करण्याची जबाबदारी केंद्र शासनास दिली आहे?

(अ) कलम ३४३ (ब) कलम ३४८ (क) कलम ३५० (ड) कलम ३५१

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**हिंदी भाषेचा विकास**

हिंदी भाषेच्या विकासाला व प्रसाराला चालना देणे व त्यायोगे हिंदी ही भारताच्या संमिश्र संस्कृतीची संपर्क भाषा बनेल, हे कार्य घटनेच्या कलम ३५१ अन्वये संघराज्यावर म्हणजे केंद्रसरकारवर सोपविण्यात आले आहे. घटनेने मान्यता दिलेल्या म्हणजे अधिकृत भारतीय भाषा घटनेच्या आठव्या परिशिष्टात नमूद केल्या आहेत. सुरुवातीस या परिशिष्टातील भाषांची संख्या १४ होती. आता या परिशिष्टातील भाषांची संख्या २२ आहे. या भाषा पुढीलप्रमाणे–

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) आसामी | (२) कन्नड | (३) मराठी | (४) सिंधी | (५) बंगाली |
| (६) काश्मिरी | (७) नेपाळी | (८) तमिळ | (९) बोडो | (१०) कोंकणी |
| (११) उडिया | (१२) तेलुगू | (१३) डोग्री | (१४) मैथिली | (१५) पंजाबी |
| (१६) उर्दू | (१७) गुजराती | (१८) मल्याळम | (१९) संस्कृत | (२०) हिंदी |
| (२१) मणिपुरी | (२२) संथाळी | | | |

(एकविसावी घटनादुरुस्ती, १९६७ अन्वये सिंधी भाषेचा, एकाहत्तरावी घटनादुरुस्ती, १९९२ अन्वये कोंकणी, मणिपुरी व नेपाळी या भाषांचा तर ब्याण्णवावी घटनादुरुस्ती, २००३ अन्वये बोडो, डोग्री, मैथिली आणि संथाळी या भाषांचा आठव्या परिशिष्टात समावेश करण्यात आला आहे.)

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण – के'सागर के'सागर पब्लिकेशन्स, (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ७१)*

२१. भारतीय राज्यघटनेच्या दुसऱ्या परिशिष्टामध्ये काही पदाधिकाऱ्यांचे मानधन, भत्ता, विशेषाधिकार आणि इतर बाबी यांचा समावेश आहे. खालीलपैकी कोणता पदाधिकारी यांत समाविष्ट नाही?

(अ) विधानसभेचे उपसभापती (ब) विधानपरिषदेचे उपाध्यक्ष

(क) भारताचा महाधिवक्ता (ड) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

| परिशिष्ट दुसरे | | वेतन व भत्ते यांविषयीच्या तरतुदी | अंतर्भूत कलमे |
|---|---|---|---|
| | भाग-ए : | (१) भारताचे राष्ट्रपती | ५९ (३), ६५ (३) |
| | | (२) राज्यांचे राज्यपाल | ७५ (६), ९७, १२५ |
| | भाग-सी : | (३) लोकसभेचे सभापती आणि उपसभापती | १४८ (३), १५८ (३), |
| | | (४) राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष | १६४ (५), १८६ |
| | | (५) राज्य विधानसभेचे सभापती व उपसभाती | आणि २२१ |
| | | (६) राज्य विधानपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष | |
| | भाग-डी : | (७) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश | |
| | | (८) उच्च न्यायालयांचे न्यायाधीश | |
| | भाग-इ : | (९) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक | |

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण – के'सागर के'सागर पब्लिकेशन्स, (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ७०)*

२२. खालीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहे आहेत? K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(१) लोकसभेत नव्हे तर फक्त राज्यसभेतच नामनिर्देशित सभासद असतात.

(२) राज्यसभेवर अँग्लो इंडियन या जमातीचे दोन सभासद नेमण्याची घटनात्मक तरतूद आहे.

(३) किती नामनिर्देशित सभासदांना केंद्रीय मंत्री बनवावे याबाबत राज्यघटनेचे कोणतेही बंधन नाही.

(४) नामनिर्देशित सभासद राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती अशा दोन्ही निवडणुकीत मतदान करू शकतात.

(अ) १ आणि २ (ब) ३ आणि ४ (क) फक्त २ (ड) फक्त ३

भारताच्या लोकसभेची सदस्यसंख्या जास्तीत जास्त ५५० इतकी निश्चित करण्यात आली आहे. घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे जास्तीत जास्त ५३० सदस्य [कलम ८१ (१) (ए)] व संघराज्य प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारे जास्तीत जास्त २० सदस्य [कलम ८१ (१) (बी)] अशी या ५५० सदस्यांची विभागणी आहे. या ५५० सदस्यांमध्ये अँग्लो-इंडियन समाजास पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही असे वाटल्यास कलम ३३१ मधील तरतुदींनुसार राष्ट्रपती दोन अँग्लो-इंडियन सदस्यांची नेमणूक करू शकतात. अशा वेळी लोकसभेच्या सदस्यांची जास्तीत जास्त संख्या ५५२ होऊ शकते.

सध्या लोकसभेची सदस्यसंख्या ५४५ इतकी असून त्यांपैकी ५३० सदस्य घटकराज्यांचे व १३ सदस्य संघराज्य प्रदेशांचे प्रतिनिधित्व करतात; तर राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले २ सदस्य अँग्लो-इंडियन समाजाचे प्रतिनिधित्व करतात.

राज्यसभेस संसदेचे 'वरिष्ठ सभागृह' असेही म्हणतात. राज्यसभेमध्ये घटक राज्यांच्या विधानसभांनी निवडून दिलेले जास्तीत जास्त २३८ सदस्य व साहित्य, शास्त्र, कला, समाजसेवा इत्यादी क्षेत्रांतून राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले १२ सदस्य असे एकूण २५० सदस्य असतात. सध्या या सभागृहाची प्रत्यक्ष सदस्यसंख्या २४५ इतकी आहे. (२३३ घटक राज्यांचे प्रतिनिधी व १२ राष्ट्रपतिनियुक्त सदस्य.)

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण - के'सागर*
*के'सागर पब्लिकेशन्स, (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १७१, १७२)*

२३. योग्य कथन/कथने ओळखा.

(१) काही लोकशाहीवादी देश हे प्रजासत्ताक आहेत.

(२) काही लोकशाहीवादी देश हे प्रजासत्ताक नाहीत.

(अ) फक्त १ (ब) फक्त २

(क) १ आणि २ दोन्हीही (ड) १ आणि २ दोन्हीही नाही.

२४. योग्य कथन/कथने ओळखा.

(१) नागरिक राज्यामध्ये सर्व नागरी अधिकारांचा उपभोग घेतात.

(२) नागरिक राज्यामध्ये सर्व राजकीय अधिकारांचा उपभोग घेतात.

(३) परकीय व्यक्ती राज्यामध्ये सर्व नागरी अधिकारांचा उपभोग घेतात.

(४) परकीय व्यक्ती राज्यामध्ये सर्व राजकीय अधिकारांचा उपभोग घेतात.

(अ) फक्त १, २ आणि ३ (ब) फक्त १, २ आणि ४

(क) फक्त १ आणि २ (ड) फक्त १, ३ आणि ४

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

२०. (ड) २१. (क) २२. (ड) २३. (क) २४. (अ)

राज्याची लोकसंख्या दोन गटांत विभागलेली असते– (१) नागरिक. यांना संपूर्ण नागरी आणि राजकीय हक्क उपभोगता येतात व (२) परकीय व नागरिक नसलेले. यांच्यावर विविध बंधने असतात.

परकियांची विभागणी परत दोन गटात करता येते– (१) मित्र राष्ट्रांमधील नागरिकव (२) शत्रुराष्ट्रांमधील नागरिक. पहिल्या गटांतील लोकांना नागरी स्वातंत्र्य उपभोगता येते, तर दुसऱ्या गटांतील लोकांना स्थानबद्धही करता येते आणि त्याविरोधात त्यांना न्यायालयात पण जाता येत नाही.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण – के'सागर के'सागर पब्लिकेशन्स, (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ४२)*

२५. योग्य क्रमानुसार लावा (राज्यांची निर्मिती).

(१) मिझोराम (२) नागालँड (३) मेघालय (४) महाराष्ट्र

(अ) १, ४, २, ३ (ब) ४, २, ३, १ (क) ३, ४, २, १ (ड) ४, २, १, ३

## नवीन घटकराज्यांची निर्मिती

सन १९५६ च्या राज्यपुनर्रचना अधिनियमातहत् आणि तत्पश्चात निर्मित घटकराज्ये.

| | | |
|---|---|---|
| (१) | आंध्र प्रदेश | इ. स. १९५६ मध्ये हैदराबाद राज्य, आंध्र राज्य व तेलंगाणा हा प्रदेश मिळून आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती केली गेली. |
| (२) | महाराष्ट्र व गुजरात | तत्कालीन द्वैभाषिक मुंबई राज्याचे विभाजन करून सन १९६० मध्ये महाराष्ट्र व गुजरात अशा दोन स्वतंत्र राज्यांची निर्मिती करण्यात आली. |
| (३) | केरळ | सन १९५६ च्या राज्य पुनर्रचना अधिनियमान्वये त्रावणकोर–कोचीनऐवजी केरळ राज्याची निर्मिती करण्यात आली. |
| (४) | कर्नाटक | सन १९७३ मध्ये तत्कालीन म्हैसूर राज्यातून कर्नाटक राज्याची निर्मिती केली गेली. |
| (५) | नागालँड | आसाम राज्यातील काही भाग विलग करून सन १९६३ मध्ये नागालँडची निर्मिती केली गेली. |
| (६) | हरियाना | सन १९६६ मध्ये पंजाब राज्यातून काही भाग विलग करून हरियाना राज्याची निर्मिती करण्यात आली. |
| (७) | हिमाचल प्रदेश | हिमाचल प्रदेश राज्य अधिनियम १९७० मधील तरतुदींनुसार सन १९७१ मध्ये हिमाचल प्रदेश या संघराज्य प्रदेशास राज्याचा दर्जा देण्यात आला. |
| (८) | मेघालय | आसाममधील उपराज्य असणाऱ्या या प्रदेशाला सन १९७२ मध्ये पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात आला. |
| (९) | मणिपूर व त्रिपुरा | सन १९७२ मध्ये या दोन संघराज्य प्रदेशांना पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात आला. |
| (१०) | सिक्किम | छत्तीसावी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७५ अन्वये सिक्किमचे भारतात विलीनीकरण करण्यात आले. सिक्किम हे भारतातील बाविसावे राज्य बनले. |
| (११) | मिझोराम | सन १९८७ मध्ये मिझोरामला भारतातील तेविसाव्या राज्याचा दर्जा देण्यात आला. |

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

२५. (ब)

| | | |
|---|---|---|
| (१२) | अरुणाचल प्रदेश | सन १९८७ मध्ये अरुणाचल प्रदेशास भारतातील चोविसाव्या राज्याचा दर्जा दिला गेला. |
| (१३) | गोवा | सन १९८७ मध्ये गोवा राज्यास भारतातील पंचविसाव्या राज्याचा दर्जा दिला गेला. |
| (१४) | छत्तीसगढ | मध्य प्रदेश राज्याची पुनर्रचना करण्यात येऊन १ नोव्हेंबर, २००० रोजी छत्तीसगढ या नव्या राज्याची निर्मिती करण्यात आली. |
| (१५) | उत्तराखंड | उत्तर प्रदेश राज्याचे विभाजन करण्यात येऊन ९ नोव्हेंबर, २००० रोजी उत्तराखंड राज्याची निर्मिती केली गेली. |
| (१६) | झारखंड | बिहार राज्याचे विभाजन करण्यात येऊन १५ नोव्हेंबर, २००० रोजी झारखंड या नव्या राज्याची निर्मिती करण्यात आली. |
| (१७) | तेलंगाणा | आंध्र प्रदेश या राज्याचे विभाजन करण्यात येऊन २ जून, २०१४ रोजी तेलंगाणा या राज्याची निर्मिती केली गेली. |

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** भारतीय राज्यघटना आणि राजकारण - के'सागर के'सागर पब्लिकेशन्स - (सहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३७)*

२६. उच्च शिक्षण क्षेत्रातील नियंत्रक यंत्रणेसंबंधी पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(अ) २००५ मधील सॅम पित्रोदा यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय ज्ञान आयोगाने उच्च शिक्षण संस्थांसाठी स्वतंत्र नियामक यंत्रणेची शिफारस केली होती.

(ब) यशपाल समितीनेही उच्च शिक्षण संस्थांच्या नियमनासाठी स्वतंत्र नियामक यंत्रणेची शिफारस केली होती.

(क) सध्याच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील नियामक यंत्रणे ऐवजी एकच नियामक यंत्रणा उच्च शिक्षण क्षेत्रात केंद्र शासनाने प्रस्तावित केली आहे. ती यंत्रणा म्हणजे उच्च शिक्षण सक्षमीकरण नियामक यंत्रणा (HEERA) होय.

(ड) सध्याच्या काळात उच्च शिक्षण क्षेत्रात विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) हे एकमेव अस्तित्वात असलेली नियामक यंत्रणा आहे.

**राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना**

१३ जून, २००५ रोजी राष्ट्रीय ज्ञान आयोगाची (National Knowledge Commission) स्थापना करण्यात आली. भारताच्या पंतप्रधानांचे उच्चस्तरीय सल्लागार मंडळ या नात्याने शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, शेती, उद्योग, ई-गव्हर्नन्स यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर धोरणात्मक मार्गदर्शन करण्याची आणि सुधारणा सुचविण्याची कामगिरी या आयोगावर सोपविण्यात आली आहे.

**आयोगाची रचना व कार्यकाल**

राष्ट्रीय ज्ञान आयोगात अध्यक्ष व इतर सात सदस्य यांचा समावेश असतो. सुरुवातीला तीन वर्षांच्या कालावधीसाठी (सन २००५ ते २००८) आयोगाची स्थापना करण्यात आली होती. सॅम पित्रोदा हे या आयोगाचे पहिले अध्यक्ष होत.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**२६. (ड)**

राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे सदस्य अर्धवेळ तत्त्वावर काम करतात आणि ते आपल्या कामासाठी कसलाही मोबदला घेत नाहीत.

आयोगाच्या सदस्यांना त्यांच्या कार्यात साहाय्य करण्यासाठी कार्यकारी संचालकाच्या नेतृत्त्वाखालील तांत्रिक कर्मचारी असतात. याखेरीज आयोगाला काही तज्ज्ञ सदस्य स्वीकृत करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

नियोजन आयोग हे राष्ट्रीय ज्ञान आयोगाची नोडल एजन्सी म्हणून कार्य करते. नियोजन आयोग राष्ट्रीय ज्ञान आयोगासाठी नियोजन व आर्थिक बाबींची पूर्तता करण्याबरोबर संसदेशी संबंधित बाबी हाताळण्याचेही कार्य करते.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

***(संदर्भ :** संपूर्ण मानव संसाधन विकास - प्रा. व्ही. बी. पाटील के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३०५, ३०६)*

२७. पुढीलपैकी योग्य विधान/ने निवडा.

(१) भारतामध्ये प्रत्येकी एक हजार लोकसंख्येमागे एकपेक्षा कमी डॉक्टर उपलब्ध आहेत.

(२) जागतिक आरोग्य संघटनेनुसार डॉक्टर आणि लोकसंख्येचे किमान प्रमाण ३ : १००० (१००० लोकांसाठी ३ डॉक्टर) असे असावे.

(अ) फक्त १ (ब) फक्त २

(क) १ आणि २ दोन्हीही योग्य. (ड) १ आणि २ दोन्हीही नाही.

अलीकडील उपलब्ध माहितीनुसार भारतात दर १,३१६ व्यक्तींमागे एक डॉक्टर उपलब्ध आहे. चीनमध्ये दर ६८७ व्यक्तींमागे एक डॉक्टर उपलब्ध आहे. हेच प्रमाण जपान, जर्मनी आणि अमेरिकेत अनुक्रमे ४६७, २१७ व ४१३ व्यक्तींमागे एक डॉक्टर असे आहे. आर्थिक-सामाजिक प्रगतीचा एक मापदंड म्हणून या माहितीकडे पाहता येईल.

**(संदर्भ** : *भारतीय अर्थव्यवस्था - के'सागर के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ४१)*

२८. भारताच्या परराष्ट्र धोरणांपैकी 'पूर्वलक्षी कृती धोरणा'संबंधी खालील विधानांपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(अ) हे धोरण भारताच्या विस्तारित शेजारी देशांवर म्हणजेच आशिया-पॅसिफिक प्रदेशावर भर देते.

(ब) हे धोरण मुळात आर्थिक पुढाकार म्हणून आखण्यात आले.

(क) या धोरणाने आशिया-पॅसिफिक प्रदेशाशी ईशान्य प्रांतातून सुधारित संपर्काचा पुरस्कार केला आहे.

(ड) या धोरणाने कृतिशील राजनयाचा पुरस्कार करीत आशिया-पॅसिफिक आणि भारतीय सागरी प्रदेशातील घुसखोरीला आळा घालण्यासाठी राजकीय आणि लष्करी हस्तक्षेपाचाही पुरस्कार केला आहे.

भारताच्या 'पूर्व कृती योजनेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

(१) भारताचे 'पूर्व कृती धोरण' हे आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विस्तारित शेजाऱ्यांवर केंद्रित आहे. प्रारंभी आर्थिक उपक्रम म्हणून सुरू केलेल्या या धोरणाला राजकीय, व्यूहात्मक, सांस्कृतिक तसेच चर्चा व सहकार्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे हेही पैलू प्राप्त झाले आहेत.

(२) भारताने इंडोनेशिया, व्हिएतनाम, मलेशिया, जपान, कोरियाचे प्रजासत्ताक, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर आणि आग्नेय आशियाई राष्ट्रे (आसियान) यांच्याबरोबरचे व्यूहात्मक सहकार्य वृद्धिंगत केले आहे आणि आशिया पॅसिफिक क्षेत्रातील सर्व देशांशी जवळचे संबंध प्रस्थापित केले आहेत.

(३) याशिवाय, आशियात, आसियान क्षेत्रीय मंच आणि पूर्व आशिया शिखर परिषद या व्यतिरिक्त भारताचा बे ऑफ बेंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टी-सेक्टोरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक को-ऑपरेशन,

२७. (अ) २८. (ड)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(बहुक्षेत्रीय तांत्रिक व आर्थिक सहकार्यासाठी बंगाल उपसागरीय उपक्रम), आशिया को-ऑपरेशन डायलॉग (आशिया सहकार्य चर्चासत्र), मेकाँग-गंगा को-ऑपरेशन (मेकाँग-गंगा सहकार्य) आणि इंडियन ओशन रिम असोसिएशन अशा क्षेत्रीय मंचांतही सक्रिय सहभाग आहे.

(४) 'पूर्व कृती धोरणाने' पायाभूत व्यवस्था, उत्पादन, व्यापार, कौशल्य, शहरी नवीकरण, स्मार्ट शहरे, भारतात बनवा आणि इतर उपक्रम अशा अंतर्गत बाबतीतही भारत-आशियान सहकार्यावर भर दिला आहे. संपर्क प्रकल्प, अंतराळक्षेत्रात सहकार्य, शास्त्र व तंत्रज्ञान आणि लोकांमधील संपर्क हे क्षेत्रीय एकात्मता आणि समृद्धीप्रत झेप घेण्यासाठी आधार बनू शकतात.

(५) आर्थिक सहकार्य व सांस्कृतिक संबंध यांना चालना देणे आणि द्विपक्षीय, क्षेत्रीय आणि बहुस्तरीय सतत व्यवहारातून व्यूहात्मक संबंध विकसित करणे आणि त्यायोगे अरुणाचल प्रदेश धरून ईशान्य क्षेत्रातील राज्यांचा आपल्या शेजारच्या इतर देशांबरोबर संपर्क वाढविण्यास चालना देणे हे पूर्व कृती धोरणाचे (Act East Policy) उद्दिष्ट आहे.

(६) पूर्व कृती धोरणामध्ये भारताच्या ईशान्य भागाला प्राधान्य आहे. या धोरणामध्ये अरुणाचल प्रदेश धरून ईशान्य भारत आणि आसियान क्षेत्र यांतील संबंध वृद्धिंगत व्हावेत अशी आपल्या पूर्वकृती धोरणात तरतूद आहे.

(७) द्विपक्षीय आणि क्षेत्रीय स्तरावरील विविध कार्यक्रमांमध्ये व्यापार, संस्कृती, लोकांचा आपसातील संपर्क आणि रस्ते, विमानतळ, दूरसंचार, वीज यांसारख्या भौतिक पायाभूत सुविधा यांच्याद्वारे ईशान्य भारताचा आसियान क्षेत्राशी संपर्क विकसित आणि बळकट करण्याचे सततचे प्रयत्न यांचा समावेश होतो.

(८) संस्कृतीच्या आघाडीवर, बौद्ध आणि हिंदू दुवे पुनरुज्जीवित करून लोकांमध्ये नव्याने संपर्क व संबंध विकसित करण्यात येत आहेत.

(९) संपर्क यंत्रणेच्या दृष्टीने ईशान्य भारत आणि आसियान जोडण्यासाठी सुसंगत धोरणे विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. वाहतुकीसाठी पायाभूत व्यवस्था, त्या क्षेत्रामध्ये हवाई संपर्कासाठी विमान उद्योगाला प्रोत्साहन देणे, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये संपर्क अशा उपाययोजना करण्यात येत आहेत.

(१०) आसियान बरोबरचे भारताचे आर्थिक संबंध वृद्धिंगत करण्यात येत आहेत. क्षेत्रीय एकात्मता आणि प्रकल्पांची अंमलबजावणी यांना प्राधान्य दिले जात आहे. भारत व आसियान देशातील सेवा व गुंतवणूक व्यापार करार भारत आणि सात आसियान देशांसाठी १ जुलै, २०१५ पासून लागू झाला आहे.

(११) संरक्षण आघाडीवर द्विपक्षीय आणि बहुस्तरीय या दोन्ही प्रकारे भारताने महत्त्वाच्या सहकाऱ्यांबरोबरची संरक्षणविषयक एकरूपता वाढविली आहे. दहशतवादविरोधात निकटचे सहकार्य, मध्य आशिया क्षेत्रातील शांतता आणि स्थैर्य यांसाठी एकत्रित प्रयत्न आणि आंतरराष्ट्रीय निकष आणि कायदे यांवर आधारित सामुदायिक संरक्षणास चालना देण्यात येत आहे.

*(**संदर्भ :** इंडियन पॉलिटी - एम लक्ष्मीकांत के'सागर पब्लिकेशन्स, (दहावी रिप्रिंट) पृष्ठ क्रमांक : ७१४, ७१५)*

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

२९. 'ज्ञानपीठ' पुरस्काराबाबत खालील विधाने विचारात घ्या.

(१) हा पुरस्कार भारत सरकारद्वारा १९५२ पासून प्रायोजित आहे.

(२) १९८२ च्या अगोदर लेखकाच्या एका कृतीबद्दल दिला जात होता.

(३) आता लेखकाच्या संपूर्ण जीवनातील योगदानाबद्दल दिला जातो.

(४) २०१७ चा पुरस्कार कृष्णा सोबती यांना घोषित झाला आहे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?

(अ) १, २ आणि ३ (ब) २, ३ आणि ४

(क) १ आणि ४ (ड) १, २, ३ आणि ४

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार**

(१) अकरा लाख रुपये रोख, शाल, मानपत्र व मानचिन्ह (वाग्देवीची मूर्ती) या स्वरूपाचा हा पुरस्कार भारतीय ज्ञानपीठातर्फे साहित्यक्षेत्रातील असामान्य कर्तृत्वाबद्दल दिला जातो. या पुरस्काराची सुरुवात सन १९६५ साली झाली. सुरुवातीला या पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये रोख, शाल, मानपत्र व मानचिन्ह (वाग्देवीची मूर्ती) असे होते.

(२) सन २०१७ चा म्हणजे त्रेपन्नावा ज्ञानपीठ पुरस्कार ज्येष्ठ हिंदी साहित्यिका कृष्णा सोबती यांना देण्यात आला आहे. साहित्य क्षेत्रातील बहुमोल योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी, १९२५ रोजी सध्याच्या पाकिस्तानातील पंजाब प्रांतामधील गुजरात या शहरी झाला. सन १९८० मध्ये 'जिन्दगीनामा' या कादंबरीसाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले होते. सन १९९६ मध्ये साहित्य अकादमीची फेलोशिपही त्यांना मिळाली होती. त्यांनी लिहिलेल्या जिन्दगीनामा, ऐ लडकी, मित्रो मरजानी यासारख्या अनेक कादंबऱ्या गाजल्या. सन २०१० मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कार देण्याबाबतही सरकारकडून विचारणा झाली होती. त्यांनी हा पुरस्कार नाकारला होता.

*(**संदर्भ :** महाराष्ट्र गट 'क' सेवा पूर्व परीक्षा – डॉ. अनिरुद्ध के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ४९८-४९९)*

३०. पंधराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत?

(अ) एन. के. सिंग (ब) एन. के. मिश्रा (क) एन. के. राजन (ड) एन. के. त्यागी

२७ नोव्हेंबर, २०१७ रोजी १५ वा वित्त आयोग गठित करण्यात आला असून त्याचा कार्यकाळ १ एप्रिल, २०२० ते ३१ मार्च, २०२५ असा पाच वर्षांचा राहील. यामध्ये एक अध्यक्ष, चार सदस्य व एक सचिव अशी रचना आहे. ती पुढीलप्रमाणे–

**अध्यक्ष** : श्री. एन. के. सिंग

**सदस्य** : (१) श्री. शक्तीकांत दास (२) डॉ. अनुप सिंग
(३) डॉ. अशोक लाहिरी (४) डॉ. रमेश चंद

**सचिव** : श्री. अरविंद मेहता

*(**संदर्भ :** महाराष्ट्र गट 'क' सेवा पूर्व परीक्षा – डॉ. अनिरुद्ध के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ५४२, ५४३)*

३१. पुढील विधानांपैकी मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (MMRDA) विषयीचे कोणते विधान चुकीचे आहे?

(अ) या प्राधिकरणाचे प्रमुख मुख्यमंत्री आहेत.

(ब) या प्राधिकरणाची स्थापना १९७५ मध्ये झाली आहे.

(क) महानगर आयुक्तांची नेमणूक केंद्र शासन करते.

(ड) या प्राधिकरणाने दळणवळण, गृहनिर्माण, पाणीपुरवठा आणि पर्यावरण या विभागांमध्ये सुधारणा घडविण्यासाठी प्रयत्न करावयाचे आहेत.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

२९. (ब) ३०. (अ) ३१. (क)

३२. डॉ. धीरेन्द्रपाल सिंह इतक्यात बातम्यांमध्ये होते. त्यांच्याबाबत काय खरे नाही?
(अ) ते नॅक (राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद) चे संचालक होते.
(ब) ते बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू होते.
(क) ते भारतीय विज्ञान संस्थेचे संचालक होते.
(ड) त्यांची UGC च्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

३३. महाराष्ट्रातील 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' कशाशी संबंधित आहे?
(अ) आदिवासी भागातील उच्च शिक्षण संस्थांमधे चौरस आहार पुरविण्याबाबत.
(ब) आदिवासी भागातील माध्यमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना चौरस आहार पुरविण्याबाबत.
(क) आदिवासी भागातील गर्भवती आणि स्तन्यदा मातांना चौरस आहार पुरविण्याबाबत.
(ड) अंगणवाडी सेविकांना चौरस आहार पुरविण्याबाबत.

● अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया आणि स्तन्यदा मातांच्या आहारातील उष्मांक आणि प्रथिनांमध्ये वाढ करण्याबरोबरच जन्माला येणाऱ्या सुदृढ बालकांचे प्रमाण वाढविण्यासाठी सहा महिने कालावधीसाठी एक वेळचा चौरस आहार देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' सुरू करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.

● अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी कक्षेत येणाऱ्या सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना या योजनेनुसार एकूण सहा महिन्याच्या कालावधीसाठी एक वेळचा चौरस आहार मिळणार आहे.

*(**संदर्भ :** लेटेस्ट जनरल नॉलेज व चालू घडामोडी - के'सागर
के'सागर पब्लिकेशन्स, (ऐंशीवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३२०-३२१)*

३४. जोड्या लावा.

| **लेखक** | **पुस्तके** |
|---|---|
| (य) शशी थरूर | (१) घाचर घोचर |
| (र) रघुराम राजन | (२) दी एण्ड ऑफ कर्मा |
| (ल) सोमिनी सेनगुप्ता | (३) आय डू व्हॉट आय डू |
| (व) विवेक शानबाग | (४) ॲन ईरा ऑफ डार्कनेस |

(अ) य - ४, र - ३, ल - २, व - १ (ब) य - ४, र - २, ल - ३, व - १
(क) य - ३, र - ४, ल - २, व - १ (ड) य - ३, र - ४, ल - १, व - २

३५. सन २०१७ चे साहित्यातील नोबेल पारितोषिक कझुओ इशिगुरो यांना मिळाले आहे. पुढीलपैकी कोणती साहित्यकृती त्यांची नाही?
(१) द रिमेन्स ऑफ दी डे (२) ए पेल व्ह्यू ऑफ हिल्स
(३) ॲन आर्टिस्ट ऑफ द फ्लोटिंग वर्ल्ड (४) नॉर्वेजियन वूड
(५) काफ्का ऑन द शोअर

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(अ) १, २, ३, ४, ५ (ब) २, ३ आणि ४ (क) २, ३, आणि ५ (ड) ४ आणि ५

'द रिमेन्स ऑफ द डे' या जगप्रसिद्ध कादंबरीचे जपानी वंशाचे प्रसिद्ध ब्रिटिश कादंबरीकार, साहित्यिक कझुओ इशिगुरो यांना यंदाचा साहित्यातील नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. इशिगुरो यांचे नोबेलसाठी नाव

**३२. (क) ३३. (क) ३४. (अ) ३५. (ड)**

जाहीर करताना नोबेल समितीने म्हटले की, आपल्या भावनात्मक कादंबऱ्यांच्या माध्यमातून जगाशी असलेल्या आपल्या मायावी आकलनाची खोली उघड करून दाखवण्याचे काम इशिगुरो यांनी केले आहे.

इशिगुरो यांचा जन्म ८ नोव्हेंबर, १९५४ ला जपानमधील नागासाकी येथे झाला. १९६० मध्ये त्यांचे कुटुंब ब्रिटनला स्थलांतरीत झाले. त्यानंतर १९८२ या वर्षी त्यांना ब्रिटनचे नागरिकत्व मिळाले. सन २००५ मध्ये जगप्रसिद्ध टाईम या मासिकाने 'नेव्हर लेट मी गो' या कादंबरीसाठी सर्वोत्कृष्ट शंभर इंग्रजी लेखकांमध्ये इशिगुरो यांना स्थान दिले होते. शिवाय २००८ मध्ये त्यांचा १९९५ पासूनच्या सर्वोत्कृष्ट ५० ब्रिटिश लेखकांच्या यादीत समावेश केला होता.

**इशिगुरो यांच्या कादंबऱ्या** : अ पेले व्हयू ऑफ हिल्स (१९२); ॲन आर्टिस्ट ऑफ द फ्लोटिंग वर्ल्ड (१९८६); द रिमेन्स ऑफ द डे (१९८९); द अनकन्सोल्ड (१९९५); व्हेन वी वेअर ऑर्फन्स (२०००), नेव्हर लेट मी गो (२००५); द ब्युरिड जायंट (२०१५)

*(**संदर्भ :** १. महाराष्ट्र गट 'क' सेवा पूर्व परीक्षा – डॉ. अनिरुद्ध (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ५०८*
*२. स्मॉलेस्ट जनरल नॉलेज – विनायक घायाळ, के'सागर पब्लिकेशन्स, (छत्तीसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २४४ ते २४५)*

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

३६. अयोग्य विधान ओळखा.
(१) प्रथम जागतिक सायबर स्पेस परिषद लंडन येथे २०११ मध्ये आयोजित केली गेली.
(२) चौथी जागतिक सायबर स्पेस परिषद बुडापेस्ट येथे २०१५ मध्ये आयोजित केली गेली.
(३) पाचवी जागतिक सायबर स्पेस परिषद दिल्ली येथे २०१७ मध्ये आयोजित केली गेली.
(अ) १ (ब) २
(क) ३ (ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

३७. अयोग्य विधान निवडा.
(१) प्रत्येक वर्षी १० ऑक्टोबर हा 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' म्हणून पाळला जातो.
(२) जागतिक मानसिक आरोग्य दिन २०१७ ची संकल्पना 'कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य' ही होती.
(३) प्रत्येक वर्षी ७ एप्रिल रोजी 'जागतिक आरोग्य दिन' साजरा केला जातो.
(४) सन २०१७ च्या जागतिक आरोग्य दिनाची संकल्पना 'नैराश्य' अशी होती.
(अ) २ (ब) ४
(क) ३ (ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

३८. भारत शासनाने ५ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर, २०१७ हा २१ दिवसांचा कालखंड .... म्हणून साजरा केला.
(अ) पर्यटन पर्व (ब) स्वच्छता पंधरवडा
(क) राष्ट्रीय एकात्मता पर्व (ड) मानसिक आरोग्य जागृती अभियान

३९. भारत शासनाचा 'भारत नेट' हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम .... शी संबंधित आहे.
(अ) भारतातील ग्रामीण आणि सुदूर भागांमध्ये ब्रॉडबँड सेवा पुरविणे.
(ब) भारतातील सर्व उच्च शैक्षणिक संस्थांना ब्रॉडबँड सेवा पुरविणे.
(क) भारतातील सर्व रेल्वे स्थानकांवर ब्रॉडबँड सेवा पुरविणे.
(ड) भारतातील सर्व सरकारी रुग्णालयांना ब्रॉडबँड सेवा पुरविणे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**३६. (ब) ३७. (ड) ३८. (अ) ३९. (अ)**

४०. महाराष्ट्र शासनाची 'सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना' कशाशी संबंधित आहे?

(अ) (अनुदान पात्र झालेल्या) महिला स्वयंसहायता समूहांना व्याज अनुदान देण्याबाबत.

(ब) महिला उद्योजिकांना जमीन खरेदीसाठी कर्जपुरवठा.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(क) मुंबई आणि नागपूर येथील महिला उद्योजिकांना करमाफी.

(ड) महाराष्ट्रातील स्वयंसहायता समूहांना ४ टक्के दराने कर्जपुरवठा करणे.

| योजना | माहिती |
|---|---|
| सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना | शासनाने बचतगट चळवळीला चालना मिळावी, या उद्देशाने ही योजना सुरू केली आहे. या योजनेतून बचत गटांना दिलेल्या कर्जावरील व्याजाची साडेबारा टक्केपर्यंतची रक्कम शासनाकडून अनुदानरूपात दिली जाणार आहे. म्हणजेच बचतगटांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध होणार आहे. |

*(**संदर्भ :** स्मॉलेस्ट जनरल नॉलेज - विनायक घायाळ के'सागर पब्लिकेशन्स, (छत्तीसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २३८)*

४१. पुढीलपैकी कोणत्या गुप्त राजाने महेंद्रादित्य ही पदवी घेतली?

(अ) दुसरा चंद्रगुप्त (ब) समुद्रगुप्त (क) कुमारगुप्त (ड) स्कंदगुप्त

**सम्राट पहिल्या कुमारगुप्ताची बिरुदे**

दुसरा चंद्रगुप्त आणि समुद्रगुप्त या आपल्या पिता आणि आजोबांप्रमाणेच कुमारगुप्ताने एक मोठे खडे सैन्य संघटित केले होते. आपल्या विस्तीर्ण साम्राज्यावर करडी नजर ठेवण्यासाठी, तुरळक उठावांचे दमन करण्यासाठी आणि साम्राज्याच्या सीमांवरील शत्रूंशी लढण्यासाठी हे सैन्य उपयोगी पडत असे. समुद्रगुप्ताप्रमाणे साम्राज्यविस्ताराच्या आपल्या दीर्घ जीवनक्रमानंतर त्यानेही अश्वमेध यज्ञ केला होता. आपली प्रभुसत्ता जाहीर करून देशाचा चक्रवर्ती म्हणून मान्यता मिळविण्याचा त्याचा हेतू होता.

त्याने चलनात आणलेल्या नाण्यांच्या अनेक श्रेणी आणि त्यांवरील कोरीव मजकुराच्या निरीक्षणावरून त्याने वेळोवेळी अनेक उपाधी आणि बिरुदे धारण केली होती. त्यांची सूची खालीलप्रमाणे आहे–

(१) श्री. महेंद्र, धनुर्धारी पद्धतीच्या नाण्यांवरील बिरुद

(२) अजितमहेंद्र, घोडेस्वार नाण्यांवरील बिरुद

(३) सिम्हमहेंद्र, सिंहसंहारक नाण्यांवरील बिरुद

(४) श्री. महेंद्रसिंह, सिंहसंहारक नाण्यांवरील बिरुद

(५) महेंद्रकर्म, अनेक नाण्यांवरील बिरुद

(६) महेंद्रकुमार, मयुर पद्धतीच्या नाण्यांवरील बिरुद

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(७) महेंद्रकल्प, काही आलेखांतील बिरुद

(८) सिंहविक्रम, सिंहसंहारक नाण्यांवरील कोरीव बिरुद

(९) व्याघ्र बल पराक्रम, व्याघ्रसंहारक पद्धतीच्या नाण्यांवरील बिरुद

(१०) काही गरुड आणि सिंहवाहिनी पद्धतीच्या ताम्र नाण्यांवर त्याचा उल्लेख श्री कुमारगुप्त असा केलेला आहे.

(११) महेंद्रादित्य हे त्याचे सम्राटाचे बिरुद परम भागवत या अतिरिक्त बिरुदासोबत सौराष्ट्रामध्ये चलनात

४०. (अ) ४१. (क)

आलेल्या अनेक रौप्य नाण्यांवर आढळते. चंद्रगुप्त दुसरा विक्रमादित्य कट्टर वैष्णव होता. तोदेखील परम भागवत या बिरुदाने परिचित होता हे या ठिकाणी नमूद करणे वावगे होणार नाही.

(१२) त्याशिवाय त्याच्या अश्वमेध पद्धतीच्या कलात्मक सुवर्ण नाण्यांवर अश्वमेध महेंद्र हे बिरुद कोरण्यात आले आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया - जे. एल. मेहता, सरिता मेहता के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २७८ व २७९)*

४२. जोड्या लावा.

| | |
|---|---|
| (य) तक्षण | (१) सुतार |
| (र) भागदुग | (२) कर वसूल करणारा |
| (ल) क्षत्तरी | (३) राजाचा खाजगी कारभारी |
| (व) विदथ | (४) पुरुष आणि स्त्रिया भाग घेत असे कायदेमंडळ |

(अ) य - ४, र - ३, ल - २, व - १ (ब) य - २, र - १, ल - ४, व - ३
(क) य - १, र - २, ल - ३, व - ४ (ड) य - ३, र - ४, ल - १, व - २

४३. खालील विधानांचा विचार करा व उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

(१) महाराष्ट्रातील जोर्वे, नेवासा, दायमाबाद, चांदोली, सोनगांव, इनामगांव, प्रकाशे, नाशिक इत्यादी ठिकाणी ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत.

(२) राजस्थानमधील अहर व गिलुंड, मध्य प्रदेशातील माळवा, कायथा, एरण इत्यादी ठिकाणी ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत.

(अ) दोन्ही विधाने बरोबर आहेत.
(ब) दोन्ही विधाने चुकीची आहेत.
(क) विधान १ बरोबर आहे; परंतु विधान २ चुकीचे आहे.
(ड) विधान २ बरोबर आहे; परंतु विधान १ चुकीचे आहे.

दक्षिण राजस्थानातील अहर, गिलुंड, बलथल अशी ठिकाणे आणि हडप्पा संस्कृती यांच्यात काही अप्रत्यक्ष संबंध असावेत, असे तेथे सापडलेल्या हडप्पा संस्कृतीमधील मण्यांवरून दिसते. अरवलीमधील तांब्याच्या खाणींच्या सान्निध्यामुळे या ठिकाणी वस्ती करण्यास चालना मिळाली व त्या संबंधातून तांब्याचे खननकर्म सुरू झाले असावे. या संस्कृतीचा व्यापक विस्तार गुजरात, राजस्थान, दुआबाचा प्रदेश, गंगेचे मध्य खोरे व त्याही पलीकडे बंगालचा काही भाग येथे झालेला आहे; कारण या सर्व ठिकाणी मृत्भांडी बनविण्याचे विशिष्ट तंत्र अवलंबिलेले दिसते. या विशिष्ट तंत्रानुसार काळी व तांबडी अशी दुरंगी भांडी बनविता येतात. अर्थात, या सर्व ठिकाणी केवळ अशाच प्रकारची मृत्भांडी सापडली असेही नाही. तथापि, त्यांचे आधिक्य लक्षणीय आहे. या मृत्पात्रांचा काळ प्रत्येक विभागानुसार इ. स. पूर्व दुसरे ते पहिले सहस्रक असा सांगितला जातो.

अकिक आणि वैदुर्य यांचे मणी मध्य प्रदेशातील माळवा संस्कृतीच्या ठिकाणी कित्येकदा आढळतात व ते उत्तर हडप्पा संस्कृतीशी संबंध दर्शवितात. या पूर्वकाळातील कायथा आणि नावडातोली येथील वस्त्यांमध्ये संमिश्र राहणी दिसून येते. नावडातोली हे महेश्वरसमोर नर्मदेच्या पलीकडे वसले असून दोन्ही वस्त्या बहुधा नदी

४२. (क) ४३. (अ)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

ओलांडण्याची ठिकाणे असावीत. नर्मदेवरील धरण पूर्ण होण्यापूर्वी मध्य प्रदेशात पुरातत्त्व खात्यास सबतपूर, पीठानगर आणि मंदसौर अशा अनेक ठिकाणी ताम्राश्मयुगीन थरामध्ये मौलिक पुरावा उपलब्ध झाला आहे. त्यांपैकी काहींचा संबंध माळवा संस्कृतीशी होता तर अन्य काही होशंगाबादमार्गे दक्षिणेकडे जाणाऱ्या हमरस्त्यावर वसलेली होती. हा हमरस्ता पुढील काळात प्रसिद्धीस आला.

उत्तर महाराष्ट्रात दायमाबाद येथे आश्चर्यजनक आणि वेधक अशा चार ब्राँझ वस्तू सापडल्या आहेत. त्यांची धाटणी उत्तर हडप्पाकालीन वाटते. एक गाडीवान बैलजोडी हाकत आहे व चाके असलेल्या गेंडा, म्हैस व हत्ती यांच्या प्रतिमा– ताम्राश्मयुगातील ठिकाणी सहसा न आढळणाऱ्या मूर्ती– आहेत. जर त्यांच्या धाटणीचे साम्य मान्य केले तर त्या गुजरातमार्गे हडप्पाशी संबंध असल्याचे दर्शवितात. अशाच प्रकारचे संबंध ताम्राश्मयुगीन जोर्वे (महाराष्ट्र) या स्थळाशी असल्याचेही सुचविले जाते; कारण जोर्वे येथे तांबे गाळण्याचा व त्यापासून वस्तू बनविण्याचा उद्योग जोरात चालत होता. असेच एक मनोरंजक ताम्राश्मयुगीन ठिकाण म्हणजे इनामगाव (महाराष्ट्र). तेथे मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाले असून त्याचा काळ इ. स. पूर्व दुसरे सहस्रक सांगितला जातो. ते एखाद्या जमातप्रमुखाचे केंद्रस्थान असावे असे मानले जाते.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** अर्लि इंडिया – रोमिला थापर
के'सागर पब्लिकेशन्स, (आठवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ७७, ७८)*

४४. दाशराज्ञ युद्ध पुढीलपैकी कोणात घडले होते?

(अ) पुरोहित व विश्वामित्र
(ब) विश्वामित्र व भरत जमात
(क) सुदास व वसिष्ठ
(ड) पुरू व विश्वामित्र

आधी आलेले आर्य सप्त-सिंधूचा, म्हणजे सिंधूच्या व तिच्या उपनद्यांचा, प्रदेश काबीज करू लागले. त्यासाठी त्यांच्या वेगवेगळ्या टोळ्यांमध्ये वारंवार भांडणे होऊ लागली. ऋग्वेदात या भांडणांचे जे उल्लेख आहेत त्यात'दाशराज्ञ' म्हणजे दहा राजांच्या, युद्धाचा उल्लेख अधिक महत्त्वाचा आहे. त्याची कथा अशी सांगितली जाते की, सुदास हा पश्चिम पंजाबात स्थिरावलेल्या 'भरत' नावाच्या आर्य गणाचा राजा होता. विश्वामित्र त्याचा मुख्य पुरोहित होता. विपास व शतद्रू या नद्यांच्या मुलुखावर विजय मिळविण्यात त्याने राजाला साहाय्य केले होते. कालांतराने सुदासने विश्वामित्राला बडतर्फ केले व त्याच्या जागी वसिष्ठाला नेमले. वसिष्ठ पौरोहित्यात अधिक पारंगत होता. विश्वमित्राला हा अपमान सहन झाला नाही. त्याने दहा गणांचा एक संघ स्थापन केला. यापैकी मुख्य पाच गणांचा 'पंचजन' या नावाने ऋग्वेदात अनेकदा उल्लेख येतो. या दहा गणांनी परुष्णी नदीच्या तीरावर सुदासशी युद्ध केले. त्यात सुदासचा विजय झाला. अशा प्रकारच्या लढाया एका एका गणातही आपसात होत असण्याचा संभव आहे.

*(**संदर्भ :** प्राचीन भारत – प्रा. डी. एन. झा
के'सागर पब्लिकेशन्स, (सातवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २९)*

४५. खालीलपैकी कोणत्या शिलालेखात सम्राट अशोकाच्या 'धम्म'ची माहिती आहे?

(अ) छोटे शिलालेख
(ब) भब्रु शिलालेख
(क) कलिंग शिलालेख
(ड) चौदा शिलालेख

इ. स. पूर्व २६० च्या सुमारास अशोकाने कलिंगाविरुद्ध मोहीम केली व त्याचा पराभव केला. या मोहिमेचा उद्देश बहुधा कलिंगाची साधनसंपत्ती मिळवावी, मौर्यांचा द्वीपकल्पाशी होणारा फायदेशीर व्यापार सुरक्षित

४४. (ब) ४५. (अ)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

व्हावा; कारण तो पूर्व किनारपट्टीमधून जात होता; अथवा मगधाचे नियंत्रण झुगारून दिल्याबद्दल त्यांना शिक्षा (नंदांनी तेथे बांधलेला कालवा ही जर मगधाच्या नियंत्रणाची निशाणी मानली तर) ही असावी. या युद्धात झालेल्या विनाशामुळे राजाला पश्चात्ताप झाला. बुद्धाच्या शिकवणुकीबद्दल त्याला पूर्वी वाटणारी वरकरणी आस्था आता प्रज्वलित झाली आणि आता ती त्याच्या जीवितकार्याचा केंद्रबिंदू बनली. यापूर्वी असे मानले जात होते की, कलिंगाच्या युद्धातील हानीने तो नाट्यमयरीत्या बौद्ध बनला; पण हे एका रात्रीत घडलेले परिवर्तन नव्हते. तो आपल्या एका शिलालेखात म्हणतो, अडीच वर्षांनंतर तो बौद्ध धर्माचा निष्ठावान अनुयायी बनला. परिणामत: त्या युद्धाने त्याला अहिंसेच्या प्रसारास प्रवृत्त केले आणि शेवटी युद्धाने विजय मिळविण्याच्या मार्गाचा त्याने त्याग केला.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** अर्लि इंडिया – रोमिला थापर*
*के'सागर पब्लिकेशन्स, (आठवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १४४, १४५)*

४६. चंद्रगुप्त मौर्याच्या राज्याचे चार प्रांत व त्यांच्या राजधान्या यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| (य) उत्तरपथ | (१) पाटलीपुत्र |
| (र) पश्चिम पथ | (२) सुवर्णगिरी |
| (ल) पूर्व पथ | (३) उज्जयिनी |
| (व) दक्षिण पथ | (४) तक्षशिला |

(अ) य – २, र – ३, ल – ४, व – १ (ब) य – १, र – ४, ल – २, व – ३
(क) य – ४, र – ३, ल – १, व – २ (ड) य – ३, र – २, ल – ४, व – १

संपूर्ण साम्राज्याचे अनेक प्रांतांत विभाजन केले जाई. प्रत्येक प्रांताचा अथवा इलाख्याचा कारभार राजघराण्यातील एखाद्या राजपुत्राकडे सुपुर्द केला जात असे. प्रत्येक इलाख्याचे पुन्हा लहान लहान विभाग पाडले जात. ग्रामीण व शहरी अशा दोन्ही प्रकारच्या प्रशासनांसाठी अशीच व्यवस्था केली जात असे. मौर्य काळात अनेक शहरे असल्याचे उत्खननातून दिसून येते. पाटलीपुत्र, कौशांबी, उज्जैन व तक्षशिला ही सर्वांत महत्त्वाची शहरे होती. पाटलीपुत्र ही मौर्यांची राजधानी होती. या नगराचे प्रशासन सहा समित्यांमार्फत चालवले जात असे. प्रत्येक समितीत पाच सदस्य असत. शहराची स्वच्छता राखणे, परदेशीयांची काळजी घेणे (रक्षण इत्यादी), जन्ममृत्यूची नोंद ठेवणे, वजने व मापे नियमित करणे आणि यांसारखी अन्य कार्ये पार पाडण्याची जबाबदारी या समित्यांवर होती. मौर्य काळातील विविध प्रकारची वजने बिहारमध्ये उत्खननात अनेक ठिकाणी सापडली आहेत.

*(**संदर्भ :** एन्शंट इंडिया प्राचीन भारत – आर. एस. शर्मा*
*के'सागर पब्लिकेशन्स, (तिसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १०१)*

४७. खालील विवरणावरून व्यक्ती ओळखा.

(१) विशाल साम्राज्याचा संस्थापक.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(२) सुसंस्कृत, विद्वान आणि कवी.

(३) प्रसिद्ध कवी हरिसेन हा त्याचा राजकवी होता व बौद्धपंडित वसुबंधू त्याच्या दरबारात होता.

(४) 'भारतीय नेपोलियन' अशी विन्सेंट स्मिथ त्याची प्रशंसा करतात.

(अ) हरिसेन (ब) कनिष्क (क) समुद्रगुप्त (ड) चंद्रगुप्त मौर्य

**४६. (क) ४७. (क)**

स्तंभावरील आलेखांचा मजकूर हरिसेनाने प्रशस्तीच्या स्वरूपात लिहिला होता. त्यामधील ३३ पंक्ती अंशत: काव्यात आणि अंशत: गद्यात लिहिल्या आहेत. पहिल्या आठ पंक्ती काव्यात असून बाकीच्या सर्व गद्यातील आहेत. भारदस्त संस्कृतमधील हा मजकूर उत्तम वाङ्मयाचा एक नमुना आहे. अत्यंत अस्सल आणि विश्वसनीय ऐतिहासिक माहिती हा या आलेखाचा महत्त्वाचा गुण आहे. व्ही. ए. स्मिथ म्हणतात, दरबारी कवीने लिहिलेला हा मजकूर आजही जशाच्या तसा अस्तित्वात आहे; त्यामधील त्याच्या कारकिर्दीतील घडामोडींचा समकालीन वृत्तान्त अन्य कोणत्याही भारतीय आलेखातील नोंदीपेक्षा सरस आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

समुद्रगुप्ताने इ. स. ३३५ ते ३७५ अशी चाळीस वर्षे राज्य केले. तो महान योद्धा आणि कर्तबगार सेनापती होता. हरिसेन त्याच्या पराक्रमाचे वर्णन करताना म्हणतो, 'विविध प्रकारच्या शेकडो युद्धांत समुद्रगुप्त निपुण होता. शस्त्र हाच त्याचा सच्चा साथीदार होता. कुऱ्हाडी, बाण, भाले, तलवारी, लोखंडी बाण आणि अन्य शस्त्रांनी त्याच्या शरीरावर शेकडो जखमा झाल्या होत्या.'

महत्त्वाकांक्षी समुद्रगुप्ताची महत्त्वाकांक्षा साम्राज्याचे राजकीय एकीकरण करण्याची होती. आपल्या योजनेच्या अंमलबजावणीचा एक तपशीलवार कार्यक्रम त्याने तयार केला होता. त्याने मोठ्या धैर्याने दिग्विजयाचे साम्राज्यवादी धोरण अवलंबले. तत्कालीन भारतवर्षावर आपली अधिसत्ता असल्याचा त्याचा दावा होता. व्ही. ए. स्मिथ म्हणतात, 'गादीवर आल्यावर समुद्रगुप्ताने लगेच महत्त्वाकांक्षी सम्राटाची आग्रही भूमिका स्वीकारली; शेजारच्या राज्यांचा प्रदेश काबीज करून आपल्या राज्याचा विस्तार करण्याचा निश्चय केला. पौर्वात्य देशातील लोकमताने आक्रमक युद्धांचा निषेध कधीच केला नाही; आणि ज्या राजाला आपल्या कीर्तीची काळजी आहे अशा प्रत्येक राजाला आपल्या राज्याच्या सीमांमध्ये स्वस्थ बसणे शक्य नसते. राज्य (विस्तार) करणे हे राजाचे कामच आहे, या तत्त्वाचा अवलंब करून गादीवर आल्यावर लगेच त्याने आक्रमक युद्धामध्ये स्वत:ला झोकून दिले. त्याच्या प्रदीर्घ कारकिर्दीत तो अशीच युद्धे करीत राहिला.

गुणसंपन्न सेनापती आणि मुत्सद्दी असलेल्या समुद्रगुप्ताचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. बुद्धी आणि भावनांच्या गुणांनी तो एक अष्टपैलू प्रज्ञावंत झाला होता. एक महान योद्धा, धैर्यशील आणि दृढनिश्चयी समुद्रगुप्त कर्तबगार राजा, प्रशासक आणि कला व ज्ञानाचा महान आश्रयदाता होता. देशाचे राजकीय एकीकरण आणि ऐक्याप्रती बांधील असलेला समुद्रगुप्त कट्टर राष्ट्रवादी होता. प्रजाजनांप्रती त्याचे वर्तन दिलदार औदार्याचे असे. तो नेहमीच निष्पक्षपातीपणे आणि कसलाही भेदभाव न करता न्यायनिवाडा करीत असे. त्याने चलनात आणलेल्या सुवर्ण नाण्यांमध्ये त्याचे जीवन आणि कारकिर्दीचे लक्षणीय स्मारक दिसून येते. किमान तीन प्रकारच्या नाण्यांत योद्ध्याच्या पूर्ण वेषातील समुद्रगुप्ताची छबी कोरली आहे. नाण्याच्या एका प्रकारामध्ये योद्ध्याच्या पूर्ण पोषाखातील समुद्रगुप्त हाती धनुष्यबाण घेऊन उभा आहे. 'पृथ्वी काबीज करणारा हा जेता आपल्या सद्गुणाने स्वर्गदेखील जिंकेल' असा मजकूर त्यावर कोरला आहे. नाण्याच्या दुसऱ्या प्रकारामध्ये समुद्रगुप्ताच्या हाती कुऱ्हाड असून शेजारी 'कुऱ्हाड हाती धारण केलेला जगज्जेता राजा' असा मजकूर कोरलेला दिसतो. नाण्यांच्या तिसऱ्या प्रकारामध्ये डोक्याला फेटा आणि कमरेला शेला बांधलेला समुद्रगुप्त वाघाच्या अंगावर पाय ठेवून उभा आहे. शेजारी 'वाघाची शक्ती असलेला राजा' असा मजकूर कोरला आहे. या तिन्ही आकृत्या त्याचे वास्तव जीवन दर्शवतात यात काहीच शंका नाही. म्हणूनच व्ही. ए. स्मिथ हे नामांकित इतिहासकार त्याची तुलना महान नेपोलियनशी करतात.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया – जे. एल. मेहता के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २५६, २५७, २५८, २६४)*

४८. खालील विवरणावरून व्यक्ती ओळखा.

(१) त्याने उलेमांचे राज्यातील वर्चस्व नष्ट केले.

(२) तो पराक्रमी योद्धा व यशस्वी सेनापती होता.

(३) दक्षिणेकडील राज्यांवर स्वारी करणारा पहिला सुलतान असावा.

(४) त्याच्या दरबारात अमीर खुसरो हा नामवंत कवी होता.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(अ) अल्तमश (ब) महमंद तुघलक (क) अलाउद्दीन खिलजी (ड) कुतुबुद्दीन ऐबक

अलाउद्दीन हा एक अतिशय धाडसी, कल्पक व दूरदृष्टीचा सेनापती होता. दक्षिण भारतातील राज्यकर्त्यांवर त्याने मिळवलेले विजय, मंगोलांविरुद्ध त्याने केलेला संघर्ष, त्याने अन्यत्र केलेला राज्यविस्तार, राजपुतांविरुद्धचा संघर्ष हे त्याचे सेनापती म्हणून कर्तृत्व सिद्ध करतात. त्याचबरोबर दक्षिणेतील राज्यांना केवळ आपले आधिपत्य मान्य करावयास लावून आणि त्यांच्याकडून नियमित खंडणी देण्याचे वचन घेऊन, त्यांचे राज्य त्यांच्याकडेच राहू दिले. त्यांना आपल्या राज्यात विलीन करण्याचा खटाटोप अलाउद्दीनने केला नाही; म्हणूनच कदाचित देवगिरीच्या रामचंद्र यादव राजाने त्याला त्याच्या दक्षिण भारताच्या स्वारीत मदत केली. यावरून त्याची मुत्सद्देगिरी व व्यावहारिक चातुर्य दिसते. मंगोलांविरुद्ध त्याने जी संरक्षण सिद्धान्त व व्यूहरचना केली होती, त्यावरून त्याचे सेनापती म्हणून कौशल्य दिसून येते. मंगोलांनी त्याच्या काळात तरी पुन्हा आक्रमण केले नाही.

अलाउद्दीनच्या अंगी प्रशासकीय क्षमता होती. त्याने राज्यातील व दरबारातील सर्व शक्तींना, घटकांना आपल्या अंकित ठेवले. संपन्न हिंदू जमीनदार, अमीर-उमराव, मलिक व उलेमा आदींना त्याने आपल्यापेक्षा अधिक प्रभावी व डोईजड होऊ दिले नाही.

अलाउद्दीनच्या काळात काही साहित्यिक आणि लेखक मंडळी होऊन गेली. हसन देहलवी व अमीर खुस्रो हे प्रसिद्ध लेखक त्याच्या दरबारात होते. काही वास्तूंचे व इमारतींचे बांधकाम त्याने केले. दिल्लीच्या संरक्षणासाठी त्याने सिरी येथे किल्ला बांधला होता. अलाई दरवाजा हे त्याने बांधलेले आणखी एक महत्त्वपूर्ण स्थापत्य होते.

*(**संदर्भ :** मध्ययुगीन भारत दिल्लीची सुलतानशाही - डॉ. व. तु. देशपांडे के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ८१,८२)*

४९. खालील विवरणावरुन व्यक्ती ओळखा.

(१) या राजास 'आंध्रभोज' ही पदवी देण्यात आली होती.

(२) त्याच्या दरबारात आठ प्रसिद्ध तेलुगू कवी होते.

(३) 'नागलपुरम' नावाचे नगर त्याने स्थापन केले होते.

(४) बिदर, गुलबर्गा या मुसलमान राज्यांच्या राजधान्या जिंकणारा तो एकमेव हिंदू राजा होता.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(अ) रामदेवराय (ब) पुलकेशी प्रथम (क) पहिला परान्तक (ड) कृष्णदेवराय

'तुलुव घराणे' या नावाने ओळखले गेलेले एक नवे घराणे उदयाला आले. या घराण्याची स्थापना कृष्णदेवराय याने (इ. स. १५०९-१५३०) केली. कृष्णदेवराय हा या घराण्यातील सर्वश्रेष्ठ राजा मानला जातो. तथापि, काही इतिहासकार त्याला एकूणच विजयनगर राज्याच्या सर्व राज्यकर्त्यांमध्ये श्रेष्ठ मानतात. कृष्णदेवराय याला केवळ कायदा आणि सुव्यवस्था पुनर्प्रस्थापित करावी लागली असे नव्हे, तर त्याला विजयनगर राज्याच्या जुन्या शत्रूंचा बंदोबस्तही करावा लागला; त्यात बहामनी राज्याची उत्तराधिकारी राज्ये (गोवळकोंडा, अहमदनगर, बिदर, वऱ्हाड, विजापूर) आणि ओरिसा राज्य यांचाही समावेश होता; त्यांनी विजयनगरचे बरेच प्रदेश बळकावले होते. या शिवाय हळूहळू शक्तिशाली होत असलेल्या पोर्तुगिजांकडेही त्याला लक्ष देऊन त्यांना नमवावयाचे होते.

**४८. (क) ४९. (ड)**

पोर्तुगीज हे किनाऱ्यावरील प्रदेशात विजयनगर राज्याच्या अधीन असलेल्या छोट्या-छोट्या राज्यांना भयभीत करून त्यांच्याकडून आर्थिक व राजकीय सवलती प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत होते. इतकेच नव्हे तर, पोर्तुगिजांनी विजयनगरच्या राजासमोर असा प्रस्ताव मांडला होता की, किनाऱ्याच्या राज्यांबाबत जर राजा तटस्थ राहिला तर ते विजापूर राज्याकडून गोवा परत मिळवून देण्यासाठी मदत करतील आणि त्याला भारतात आयात केल्या जाणाऱ्या घोड्यांच्या खरेदीचे एकाधिकार देतील.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

सात वर्षे चाललेल्या संघर्षात, एका नंतर एक अशा अनेक लढाया लढल्यानंतर कृष्णदेवराय याने ओरिसाच्या राजाला पराभूत करून कृष्णा नदीपर्यंतचा प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यास पुन्हा जोडला. अशा रीतीने स्वत:ला सामर्थ्यशाली बनविल्यानंतर कृष्णदेवराय याने तुंगभद्रा दुआबावर वर्चस्व प्राप्त करण्यासाठी जुन्या संघर्षाला पुन्हा एकदा सुरुवात केली; यामुळे त्याच्या दोन प्रमुख शत्रूंनी– म्हणजे विजापूर आणि ओरिसाच्या राजांनी– त्याच्या विरुद्ध आपसात मैत्री करून आघाडी उघडली. या संघर्षासाठी कृष्णदेवरायाने जबरदस्त तयारी केली. रायचूर आणि मुडकलचा प्रदेश पादाक्रांत करून कृष्णदेवरायाने या संघर्षाचा श्रीगणेशा किंवा सुरुवात केली. यानंतर झालेल्या लढाईत विजापूरच्या राजाचा त्याने पूर्ण पराभव केला (इ. स. १५२०). विजापूरच्या राजाला कृष्णदेवरायाने कृष्णा नदीपलीकडे हुसकावून लावले. विजापूरचा राजा या संघर्षात कसाबसा जीव वाचवून निसटला. विजयनगरचे सैन्य बेळगावपर्यंत पोहोचले व त्यांनी विजापूर शहर ताब्यात घेतले. बरेच दिवस तेथे राहून त्यांनी यथेच्छ लूट केली आणि अखेर तह होण्यापूर्वी गुलबर्गा शहर उद्ध्वस्त केले.

अशा रीतीने कृष्णदेवरायाच्या नेतृत्वाखाली विजयनगरचे राज्य हे दक्षिण भारतात लष्करी सामर्थ्याच्या बाबतीत सर्वश्रेष्ठ राज्य म्हणून उदयाला आले; परंतु जुने संघर्ष पुन्हा एकदा उकरून काढण्याच्या उत्साहाच्या भरात दक्षिणेतील राज्यांचे एका गोष्टीकडे दुर्लक्ष झाले; ती म्हणजे पोर्तुगीज सत्तेच्या उदयातून ते आणि त्यांचा व्यापार याला निर्माण झालेला धोका ही होय. चोल राज्यकर्ते आणि विजयनगरचे प्रारंभिक राज्यकर्ते यांच्याप्रमाणे न वागता, कृष्णदेवराय याने नौदलाच्या विकासाकडे पुरेसे लक्ष दिले नाही किंवा जवळ-जवळ दुर्लक्षच केले, असे म्हणता येईल.

या काळातील विजयनगरच्या राज्यातील स्थितीचे वर्णन बऱ्याच परकीय प्रवाशांनी केले आहे. कृष्णदेवराय याच्या दरबारात ज्याने बरीच वर्षे घालवली त्या पेस या इटालियन प्रवाशाने कृष्णदेवराय याच्या व्यक्तिमत्त्वाचे रसभरीत वर्णन केले आहे. त्याने कृष्णदेवरायच्या स्वभावाबद्दल एक टिप्पणी केली आहे; तो लिहितो, ''तो (कृष्णदेवराय) एक महान राज्यकर्ता आहे आणि न्यायप्रिय आहे; परंतु त्याला अधून-मधून क्रोधाचे झटके येतात. तथापि, त्याला आपल्या प्रजेबद्दल नितांत प्रेम आहे व तो त्यापोटी त्यांची काळजी घेतो आणि याबद्दलची त्याला असलेली तळमळ सुद्धा सर्वश्रुत आहे.''

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

कृष्णदेवराय हा एक स्थापत्यात रस असणारा महान राज्यकर्ता होता; त्याने आपल्या कारकिर्दीत अनेक इमारती बांधल्या. विजयनगरच्या जवळ त्याने एक नवे शहर (नागलपूर) वसविले व एक मोठा, विशाल असा तलाव तेथे खोदला. या तलावातील पाण्याचा वापर शेतीच्या सिंचनासाठी देखील केला गेला. तो संस्कृत आणि तेलुगू या भाषांमधील अतिशय प्रतिभावान, विद्वान व लेखक होता. मात्र त्याच्या अनेक ग्रंथरचनांपैकी राज्यपद्धतीवर लिहिलेला तेलुगू भाषेतील एक ग्रंथ फक्त आज आपणास उपलब्ध आहे. त्याची कारकीर्द ही तेलुगू साहित्यासाठी एका नव्या युगाची पहाट होती. याच कालखंडात संस्कृतमधील ग्रंथ रचनांचे अनुकरण न करता तेलुगू भाषेतील स्वतंत्र साहित्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला. त्याने तेलुगू, तमिळ व कन्नड भाषेतील कवींना सारख्याच प्रमाणात आश्रय देऊन प्रोत्साहन दिले. बारबोसा, पेस आणि नुनिझ यांच्यासारख्या परकीय प्रवाशांनी कृष्णदेवरायच्या कार्यक्षम प्रशासनाबद्दल आणि त्याच्या काळातील विजयनगर साम्राज्याच्या संपन्नतेबद्दल बरेच लिहून ठेवले आहे. कृष्णदेवराय याच्याबद्दल बारबोसा म्हणतो, ''राजाने प्रत्येक नागरिकाला इतके स्वातंत्र्य दिले आहे की, कोणतीही

व्यक्ती आपापल्या धर्माच्या तत्त्वांप्रमाणे आपले जीवन जगू शकते. यासाठी त्या व्यक्तीला कोणाची नाराजी सहन करावी लागत नाही; जरी ती व्यक्ती ख्रिश्चन, ज्यू अथवा नास्तिक असली तरी.'' बारबोसा याने कृष्णदेवरायाचे त्याच्या न्यायीपणासाठी व त्याच्या समानतेच्या व्यवहाराबद्दल कौतुक करून प्रशंसोद्गार काढले आहेत.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** मध्ययुगीन भारत - प्रा. सतीश चंद्र
के'सागर पब्लिकेशन्स, (बारावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १२७, १२८)*

५०. टीपू सुलतान आणि इंग्रज यांच्यात झालेल्या श्रीरंगपट्टण तहात खालीलपैकी कोणती तरतूद नव्हती?

(अ) टीपूने युद्धखर्च म्हणून साडेतीन कोटी रुपये इंग्रजांना द्यावेत.

(ब) टीपूने आपले निम्मे राज्य इंग्रजांना द्यावे.

(क) टीपूची दोन मुले इंग्रजांकडे ओलीस राहतील.

(ड) टीपूने तैनाती फौजेचा स्वीकार करावा.

**युद्धघटना**

कॉर्नवॉलिसने १७९१ मध्ये बंगलोरवर ताबा मिळविला आणि तो टिपूची राजधानी श्रीरंगपट्टणमजवळ पोहोचला. टिपूने आक्रमक धोरणाचा अंगीकार करून कोईम्बतूरवर कब्जा केला; परंतु लवकरच टिपूची पीछेहाट सुरू झाली. शेवटी इंग्रजांनी टिपूची राजधानी श्रीरंगपट्टणमला वेढा दिला आणि १७९२ मध्ये ते ताब्यात घेतले. २३ मार्च, १७९२ रोजी दोन्ही पक्षांत श्रीरंगपट्टणमचा तह झाला ज्यानुसार–

(१) टिपूला त्याच्या अर्ध्या राज्यावर पाणी सोडावे लागले; तसेच त्याने युद्धातील नुकसानभरपाईपोटी इंग्रजांना ३० लक्ष पौंड देण्याचे मान्य केले. जोपर्यंत या रकमेची पूर्तता होत नाही तोपर्यंत टिपूची दोन मुले इंग्रजांकडे ओलीस राहतील असे ठरले.

(२) टिपूने सर्व युद्धकैद्यांची मुक्तता केली.

(३) या तहाचे मुख्य वैशिष्ट्य हे की, ज्या त्रावणकोरच्या हिंदू राजासाठी हे युद्ध लढले गेले त्याच्या तोंडाला या तहात पाने पुसली गेली.

(४) या युद्धाचे आणखी एक महत्त्व की, दक्षिणेतील दोन भारतीय शक्ती मराठे व निजाम यांनी तिसरी दाक्षिणात्य शक्ती नष्ट करण्यासाठी कंपनीशी हातमिळवणी केली.

*(**संदर्भ :** आधुनिक भारताचा इतिहास महाराष्ट्राच्या संदर्भात - के'सागर
के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २३)*

५१. .... यांनी रोम आणि पॅरिसमध्येही 'फ्री इंडिया सेंटर्स' सुरू केली होती.

(अ) सुभाषचंद्र बोस (ब) मॅडम कामा (क) ॲनी बेझंट (ड) श्यामजी कृष्ण वर्मा

इ. स. १९४१ मध्ये सुभाषचंद्र बोस यांनी जर्मनीमध्ये तेथील भारतीयांच्या मदतीने 'फ्री इंडिया सेंटर' स्थापना करून त्याच्या अनेक शाखा काढल्या.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. व. तु. देशपांडे
के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३९३)*

५२. पुढील वाक्यात कोणाचे वर्णन केले आहे?

(१) ती गांधीजींची कट्टर अनुयायी होती.

(२) ती ब्रिटिश आरमारप्रमुखाची मुलगी होती.

(३) ती मीराबेन या लोकप्रिय नावाने ओळखली जात असे.

(अ) सिस्टर निवेदिता (ब) मिस कार्पेंटर (क) मिस स्लाद (ड) मिस नाइटिंगेल

**५०. (ड) ५१. (अ) ५२. (क)**

५३. खालील विधानांचा विचार करा व उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

(१) भारतातील विविध नवीन घडामोडी या परंपरागत आणि मनाने प्रजा असलेल्या समाजास बदलण्याची लोकशाहीची कल्पना स्वीकारून चळवळ करण्याची हाक देत होत्या.

(२) हे कार्य कठीण आणि विस्मयकारक होते.

(अ) दोन्ही विधाने बरोबर असून विधान २ हे विधान १ चे योग्य स्पष्टीकरण आहे.

(ब) दोन्ही विधाने चुकीची आहेत.

(क) दोन्ही विधाने बरोबर आहेत; परंतु विधान २ विधान १ चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(ड) विधान १ बरोबर; परंतु विधान २ चूक.

५४. पुढील वाक्यात वर्णन केलेले समाजसुधारक कोण ते ओळखा.

(१) त्यांच्या कुटुंबाचा जातिव्यवस्थेचा धिक्कार करणाऱ्या कबीराच्या शिकवणुकीवर विश्वास होता.

(२) त्यांचे वडील सैन्यात होते आणि ते सुभेदार-मेजर म्हणून सेवानिवृत्त झाले होते.

(३) त्यांच्या शाळेतील शिपाई बाईंना त्यांचे दप्तरही अस्पृश्य वाटे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(४) ते अस्पृश्य असल्यामुळे संस्कृत शिकू शकले नाहीत.

(अ) महात्मा जोतीबा फुले (ब) तुकाराम तात्या पडवळ

(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (ड) डॉ. विश्राम रामजी घोले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते. त्यांचा जन्म मध्य प्रदेशातील महू या गावी १४ एप्रिल, १८९१ रोजी झाला. त्यांचे मूळ गाव महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे हे होय. बाबासाहेबांचे वडील लष्करात सुभेदार म्हणून नोकरीस होते. पुढे ते सातारा येथे स्थायिक झाले. त्यामुळे बाबासाहेबांचे बालपण सातारा येथेच गेले. त्यानंतर त्यांच्या वडिलांनी मुलांच्या शिक्षणासाठी मुंबईस स्थलांतर केले.

बाबासाहेब आंबेडकर यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण दापोली, सातारा व मुंबई या ठिकाणी झाले. मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमधून ते १९०७ मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचा जन्म महार जातीत झाला असल्याने त्यांना अगदी बालपणापासूनच अस्पृश्यतेचे चटके बसले होते. शैक्षणिक जीवनात त्यांना अनेक प्रकारच्या कटू अनुभवांतून जावे लागले होते. वर्गातील बरोबरीच्या मुलांकडून त्यांना अवहेलना सहन करावी लागली होती. सातारा येथील शाळेत शिकत असताना त्यांनी संस्कृत विषय घेण्याचे ठरविले; परंतु त्या शाळेतील संस्कृतच्या शिक्षकाने 'मी महाराच्या मुलाला संस्कृत शिकविणार नाही,' असे सांगून त्यांचा मनोभंग केला. त्या प्रसंगी बाबासाहेबांच्या संवेदनक्षम मनाला किती यातना झाल्या असतील याची आपण कल्पना करू शकतो.

मॅट्रिक झाल्यावर बाबासाहेबांनी पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजच्या शिक्षणासाठी त्यांना बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली. नोव्हेंबर, १९१२ मध्ये ते एल्फिन्स्टन कॉलेजातून बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

जून, १९१३ मध्ये आंबेडकर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना झाले. या प्रसंगीही त्यांना सयाजीराव गायकवाडांनी आर्थिक साहाय्य केले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी विषयांचे अध्ययन केले. सन १९१५ मध्ये त्यांनी 'प्राचीन भारतातील व्यापार' या विषयावर

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

५३. (क) ५४. (क)

प्रबंध लिहून कोलंबिया विद्यापीठाची एम. ए. ची पदवी संपादन केली. पुढे १९१६ मध्ये सादर केलेल्या त्यांच्या 'नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया : ए हिस्टॉरिकल अँड अॅनॅलिटिकल स्टडी' या प्रबंधाबद्दल १९२५ मध्ये कोलंबिया विद्यापीठाने त्यांना पीएच. डी. ही पदवी बहाल केली.

अमेरिकेतील अभ्यासक्रम पूर्ण करून डॉ. आंबेडकर कायदा व अर्थशास्त्र यांचे अध्ययन करण्यासाठी इंग्लंडला गेले; परंतु आर्थिक अडचणींमुळे शिक्षण अर्धवट सोडून २१ ऑगस्ट, १९१७ रोजी ते भारतात परतले. भारतात आल्यावर त्यांनी काही काळ बडोदा संस्थानात नोकरी केली; पण तेथे आलेल्या कटू अनुभवांमुळे त्यांनी आपल्या नोकरीचा त्याग केला. १० नोव्हेंबर, १९१८ रोजी मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये एक वर्षासाठी त्यांची अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली.

डॉ. आंबेडकरांचे तीन गुरू याप्रमाणे— पहिले गौतम बुद्ध, दुसरे महात्मा फुले, तिसरे कबीर हे होत.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** १. महाराष्ट्रातील समाजसुधारक – के'सागर के'सागर पब्लिकेशन्स (बत्तीसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३३६–३३७*
*२. महाराष्ट्रातील समाजसुधारक मुद्देनिहाय परामर्श – डॉ. अनिरुद्ध के'सागर पब्लिकेशन्स (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ११२)*

५५. पुढील वाक्यात कोणत्या समाजसुधारकाचे वर्णन केलेले आहे?

(१) त्यांना अमेरिकन युनिटेरियन असोसिएशनची शिष्यवृत्ती मिळाली होती.
(२) अनेक धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी ते दोन वर्षांकरिता इंग्लंडला गेले होते.
(३) ॲमस्टरडॅम येथील धर्मपरिषदेला ते उपस्थित होते.
(४) सुबोध पत्रिकेसाठी ते लेखन करीत.

(अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (ब) विठ्ठल रामजी शिंदे
(क) भाऊराव पाटील (ड) बाबूराव जेधे

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल, १८७३ रोजी कर्नाटकातील जमखिंडी येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी व आईचे नाव यमुनाबाई असे होते.त्यांच्या पाच आपत्यांपैकी विठ्ठल हा सर्वांत थोरला.

विठ्ठल रामजी शिंदे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण त्यांच्या जमखिंडी या गावीच झाले. शाळेत ते एक हुशार विद्यार्थी म्हणून ओळखले जात होते. सन १८९१ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर काही काळ त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. पुढे १८९३ मध्ये ते उच्च शिक्षणासाठी पुण्यास आले आणि तेथील फर्गसन महाविद्यालयात त्यांनी आपले नाव दाखल केले. वास्तविक पाहता त्यांचे घराणे जहागीरदाराचे होते; पण त्यांच्या वडिलांच्या काळात आर्थिक स्थिती बरीच खालावली; त्यामुळे महर्षींना आपले शिक्षण घेताना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागले. तथापि, पुण्याच्या 'डेक्कन मराठी एज्युकेशन असोसिएशन'ने त्यांना थोडीफार मदत केली. बडोदानरेश सयाजीराव गायकवाड यांनीही त्यांना शिष्यवृत्ती सुरू केली; त्यामुळे आपले शिक्षण ते पूर्ण करू शकले. सन १८९८ मध्ये त्यांनी बी. ए. ची पदवी संपादन केली.

पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर महर्षी शिंदे मुंबईला गेले व त्या ठिकाणी त्यांनी वकिलीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. दरम्यानच्या काळात त्यांचा प्रार्थना समाजाशी संबंध आला होता. प्रार्थना समाजाची तत्त्वे व त्याचा समाजसुधारणेविषयीचा दृष्टिकोन यांचा त्यांच्या मनावर मोठाच प्रभाव पडला. पुढे सन १९०१ मध्ये प्रार्थना समाजाच्या साहाय्याने त्यांना पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली. इंग्लंडमधील दोन वर्षांच्या वास्तव्यात महर्षी शिंद्यांनी त्या देशाच्या, तसेच युरोपातील अन्य काही देशांच्या सामाजिक स्थितीचा व सांस्कृतिक

५५. (ब)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

जीवनाचा अभ्यास केला. ऑक्टोबर, १९०३ मध्ये ते मायदेशी परतले. इंग्लंडहून मायदेशी परतताना त्यांनी ॲमस्टरडॅम येथे भरलेल्या उदार धर्म परिषदेत भाग घेतला. त्या ठिकाणी त्यांनी 'हिंदुस्थानातील उदार धर्म' या विषयावरील प्रबंध वाचला.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(संदर्भ : महाराष्ट्रातील समाजसुधारक - के'सागर के'सागर पब्लिकेशन्स, (बत्तीसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ९१)*

५६. यादी १ आणि यादी २ यांच्या योग्य जोड्या जुळवा आणि योग्य पर्याय निवडा.

| यादी १ | यादी २ |
|---|---|
| (य) एर्डकुंडे | (१) अलेक्झांडर व्हॉन हम्बोल्ट |
| (र) ॲन्थ्रोपोजिऑग्रफी | (२) जिन ब्रुन्स |
| (ल) जिऑग्रफिया ह्युमेना | (३) कार्ल रिट्टर |
| (व) कॉसमॉस | (४) फ्रेडरिक रॅटझेल |

(अ) य - २, र - ३, ल - १, व - ४ (ब) य - ४, र - २, ल - ३, व - १
(क) य - ३, र - ४, ल - २, व - १ (ड) य - १, र - ३, ल - ४, व - २

**अलेक्झांडर व्हॉन हम्बोल्ट :** 'कॉसमॉस' (विश्व) या नावाचा त्याचा चिरस्मरणीय ग्रंथ १८४५ मध्ये प्रसिद्ध झाला. जगभर त्याचे स्वागत झाले. नंतर कित्येक परदेशी भाषांमध्ये त्याचा अनुवाद झाला. हा ग्रंथ म्हणजे त्याच्या सर्व प्रवासांचे व मोहिमांचे सर्वांगीण वर्णन आहे.

एकंदरीत, एक वैश्विक शास्त्र निर्माण करणे हा 'कॉसमॉस' ग्रंथ लिहिण्यामागील हम्बोल्टचा उद्देश होता. वैश्विक विज्ञानाचा पाया भरणे हे 'कॉसमॉस' या ग्रंथाचे मुख्य उद्दिष्ट होते.

**कार्ल रिट्टर (१७७९-१८५९) :** एर्डकुंडे' हा रिट्टरचा महान ग्रंथ. निसर्ग व इतिहास यांच्या संदर्भात पृथ्वीचे विज्ञान, असा या जर्मन शब्दाचा अर्थ आहे.

युरोपची सभ्यता वायव्येकडे सरकत गेली आहे, असा विचार 'एर्डकुंडे' ग्रंथात मांडलेला आहे.

'एर्डकुंडे'च्या दोन खंडांनंतर इतिहासाचा ऊहापोह व्हावयाचा होता. इ. स. १८१७ ते १८५९ या अवधीत रिट्टरने 'एर्डकुंडे'चे एकोणीस खंड पुरे केले; परंतु या खंडांमध्ये संपूर्ण आफ्रिका व आशियाचा काही भाग इतक्याच प्रदेशाचा इतिहास आला आहे.

**फ्रेडरिक रॅटझेल (१८४४-१९०४) :** 'मानवी भूगोलाचा जनक' अशी त्याची जगभर ख्याती आहे.

उत्तर अमेरिकेच्या प्राकृतिक व सांस्कृतिक भूगोलाबद्दल त्याची दोन पुस्तके १८७८ ते १८८० मध्ये प्रसिद्ध झाली; परंतु ज्या एका ग्रंथाबद्दल त्याला जगभर कीर्ती प्राप्त झाली, तो त्याचा Anthropogeographie (मानववंशीय भूगोल) हा ग्रंथ १८७२ ते १८९९ या काळात लिहिला गेला. विशिष्ट प्राकृतिक रचनांचा व स्थल-विशेषांचा तेथील लोकांच्या जीवनशैलीवर कसा प्रभाव पडतो, हा त्या बृहत् ग्रंथाचा मुख्य विषय आहे. या ग्रंथाच्या पहिल्या खंडात मानव व पृथ्वी यांच्या परस्पर संबंधाचे विवेचन आहे, तर दुसऱ्या खंडात मानवाचा त्याच्या पर्यावरणावर कसा प्रभाव पडतो याचा ऊहापोह आहे. मानवाच्या क्रियाकलापावर प्राकृतिक पर्यावरणाचे नियंत्रण असते हे रॅटझेलच्या विचारसरणीचे मुख्य तत्त्व आहे. त्याच्या 'मानववंशीय भूगोल' या ग्रंथात व्यक्ती व मानवी वंश यांच्या संबंधात मानवी भूगोलाचा विचार केलेला आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

५६. (क)

**जिन ब्रुन्स (१८९६–१९३०) –** Geographie Humaine : essai de Classification Positive (मानवी भूगोल : वर्गीकरणाचे निबंध) हा त्याचा ग्रंथ १९१० मध्ये प्रसिद्ध झाला. मानवी भूगोलाचे त्याने तीन वर्ग केले : (१) जमिनीचा अनुत्पादक ताबा, (२) वनस्पती व प्राणी सृष्टीवर मात करणाऱ्या बाबी, व (३) विनाशकारी अर्थव्यवस्था– 'लुटारू अर्थव्यवहार' किंवा दारिद्र्यात परिणत होणारा निसर्गावरील अत्याचार. हे तीन वर्ग प्रत्यक्षात निरीक्षण करता येतात; परंतु ते भौगोलिक प्रदेशांच्या अंतिम सीमा आखत नाहीत; असेही तो म्हणतो.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** इव्होल्यूशन ऑफ जिऑग्रफिकल थॉट – डॉ. माजिद हुसैन
के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ११८, १२२, १३०, १३१, १४१)*

५७. खालील विधानांची सत्यता तपासा व त्यांपैकी कोणते विधान बरोबर आहे ते ओळखा.

विधान (१) : पृथ्वी २४ तासांमध्ये ३६०° रेखांशात फिरते.

विधान (२) : प्रत्येक रेखावृत्त ओलांडण्यास पृथ्वीला चार मिनिटांचा कालावधी लागतो.


(अ) विधान (१) आणि (२) दोन्ही बरोबर आहेत.

(ब) विधान (१) आणि (२) दोन्ही चूक आहेत.

(क) विधान (१) बरोबर असून विधान (२) चूक आहे.

(ड) विधान (१) चूक असून विधान (२) बरोबर आहे.

पृथ्वीला स्वतःभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास २४ तास लागतात. या काळात पृथ्वीवरील ३६० रेखावृत्तांपैकी प्रत्येक रेखावृत्तावर असलेली स्थळे एकदा सूर्यासमोर येतात. दुसऱ्या शब्दांत, त्या स्थळी सूर्य २४ तासांत एकदा ख–मध्यावर येतो. पृथ्वी पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरत असल्यामुळे पूर्वेकडील स्थळी सर्वांत आधी सूर्योदय, मध्यान्ह व सूर्यास्त होतो; त्यानंतर पश्चिमेकडील स्थळ या तीन अवस्थांतून जाते. पृथ्वी २४ तासांत ३६० रेखांशांनी फिरते म्हणजेच एका तासात १५ रेखांशाने व ४ मिनिटांत १ रेखांशाने फिरते; म्हणून एखाद्या रेखांशावर सूर्य डोक्यावर असताना दुसरे रेखांश सूर्यासमोर येण्यास ४ मिनिटांचा कालावधी लागतो. आकृती क्र. ३० मधील 'अ' हे ठिकाण ०° रेखावृत्तावर असून 'ब' व 'क' ही ठिकाणे अनुक्रमे १° पूर्व व १° पश्चिम रेखावृत्तावर आहेत. 'ड' व 'इ' ही ठिकाणे अनुक्रमे १५° पूर्व व १५° पश्चिम रेखावृत्तांवर आहेत. 'अ' हे ठिकाण बरोबर सूर्यासमोर असून त्या ठिकाणी दुपारचे १२ वाजले असतील व 'ब' या ठिकाणी १२ वाजून ४ मिनिटे झाली असतील. १° पश्चिम रेखावृत्तावर असलेल्या 'क' या ठिकाणी ११ वाजून ५६ मिनिटे झाली असतील व ते ठिकाण सूर्यासमोर येण्यास आणखी चार मिनिटांचा अवधी लागेल. त्याच वेळी १५° पश्चिम व १५° पूर्व रेखावृत्तांवर अनुक्रमे सकाळचे ११ व दुपारचा १ वाजलेले असतील.




K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** प्राकृतिक भू–विज्ञान – प्रा. सु. प्र. दाते
के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ५२–५३)*

५८. खालीलपैकी कोणते भूरूप भू–अंतर्गत शक्तींचा परिणाम नाही?

(अ) ग्रॅबन (ब) गट पर्वत (क) अवशिष्ट पर्वत (ड) खचदरी


पर्वतनिर्माणकारी भूहालचालींमुळे पृथ्वीच्या कवचावर दाब किंवा ताण निर्माण होऊन भूपृष्ठाच्या कठीण भागाला घड्या पडण्याऐवजी भेगा पडतात. कधी कधी समोरासमोर पडलेल्या दोन भेगांतील भूपृष्ठाचा भाग वर

उचलला जातो. अशा रीतीने अवरोधी किंवा गटपर्वतांची (Block Mountains) निर्मिती होते. या वर उचलल्या गेलेल्या भागाला 'हॉर्स्ट' (Horst) असे म्हणतात. जर्मनीतील हॅर्झ पर्वत हे याचे उत्तम उदाहरण आहे. समोरासमोर पडलेल्या दोन भेगांतील भाग कधी कधी खाली खचतो व त्या ठिकाणी खचदरी निर्माण होऊन तिच्या दोन्ही बाजूंस गटपर्वतांची निर्मिती होते. याला 'ग्रॅबेन' असे म्हणतात. उदाहरणार्थ– युरोपमधील ब्लॅक फॉरेस्ट व व्हॉसजेस हे दोन गटपर्वत ऱ्हाईन नदीच्या खचदरीच्या दोन्ही बाजूंस आहेत.

*(**संदर्भ :** प्राकृतिक भू-विज्ञान - प्रा. सु. प्र. दाते के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २६६)*

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

५९. ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे निर्माण झालेल्या भूरूपांच्या खालील आकृत्यांचा योग्य पर्याय निवडा.




| | (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|---|
| (अ) | ॲसिड लाव्हा शंकू | संमिश्र शंकू | सिंडर शंकू | बेसिक लाव्हा शंकू |
| (ब) | बेसिक लाव्हा शंकू | सिंडर शंकू | संमिश्र शंकू | ॲसिड लाव्हा शंकू |
| (क) | ॲसिड लाव्हा शंकू | बेसिक लाव्हा शंकू | सिंडर शंकू | संमिश्र शंकू |
| (ड) | सिंडर शंकू | ॲसिड लाव्हा शंकू | बेसिक लाव्हा शंकू | संमिश्र शंकू |

पृथ्वीवरील ज्वालामुखी भिन्न भिन्न आकारांचे आहेत. ज्वालामुखी शंकूचा (Volcanic Cones) आकार त्यातून बाहेर पडणाऱ्या पदार्थांच्या प्रकारावर अवलंबून असतो. बहुतेक सर्व ज्वालामुखी आकाराने शंक्वाकार असतात. या शंकूच्या शिरोभागात वर्तुळाकार असा खोल भाग असून त्याला ज्वालामुखीचे मुख (Crater) असे म्हणतात. वेगवेगळ्या पदार्थांच्या संचयनाने ज्वालामुखी शंकू तयार होतात. या विविध पदार्थांच्या आधारावर ज्वालामुखी शंकूचे शिलारसापासून तयार झालेले शंकू (Lava Domes or Lava Cones); ज्वालामुखीतील राख व खडकांचे तुकडे यांच्या संचयनापासून तयार झालेले शंकू किंवा अंगारक शंकू (Ash and Cinder Cones) आणि शिलारस आणि राख व खडकांचे तुकडे यांच्या मिश्रणापासून तयार झालेले शंकू किंवा संमिश्र शंकू (Composite Cones) असे तीन प्रकार पडतात.


**शिलारसापासून तयार झालेले शंकू**

ज्वालामुखीच्या नळीभोवती शिलारसाचे संचयन होऊन निर्माण झालेले शंकू हे बहुधा घुमटाकार असतात; त्यामुळे त्यांना 'Lava Dome' असे म्हणतात. हे शंकू शीघ्र उताराचे असतात. ज्वालामुखीतून शिलारस सावकाश बाहेर पडत असल्यास या प्रकारच्या शंकूची निर्मिती होते; परंतु अशा शंकूचा आकार हा शिलारसाच्या


५७. (अ) ५८. (क) ५९. (क)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

गुणधर्मांवरही अवलंबून असतो. ॲसिड शिलारसाच्या संचयनापासून तयार होणाऱ्या शंकूचा विस्तार कमी असून उंची जास्त असते व उतार शीघ्र असतो. याउलट बेसिक शिलारसापासून तयार होणाऱ्या शंकूची उंची कमी असून विस्तार जास्त असतो व उतार मंद असतो. बेसिक शिलारसापासून तयार होणाऱ्या शंकूला 'हवाईयन टाईप' (Hawaiian Type) किंवा 'शील्ड कोन्स' (Shield Cones) म्हणून ओळखले जाते.



**आकृती क्र. ९२ : ॲसिड शिलारसापासून तयार झालेला शंकू**




**आकृती क्र. ९३ : बेसिक शिलारसापासून तयार झालेला शंकू**

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**संमिश्र शंकू**

जगातील अतिशय उंच, अवाढव्य व नियमित आकार असलेले जवळजवळ सर्व ज्वालामुखी या प्रकारचे आहेत. काही भागात काही ठराविक काळाच्या अंतराने ज्वालामुखीचे लहान व मोठे उद्रेक होत असतात. यात एखाद्या वेळी ज्वालामुखीतून खडकाचे मोठे तुकडे तर एखाद्या वेळी नुसता शिलारसच बाहेर पडतो. एकापाठोपाठ एक असे लहानमोठे उद्रेक होत असल्यामुळे या प्रकारच्या उद्रेकात वर दिलेल्या पदार्थांचे एकावर एक असे संचयन होऊन कालांतराने ज्वालामुखी शंकूची निर्मिती होते. या प्रकारच्या शंकूच्या उभारणीला खरी सुरुवात खडकांचे लहानमोठे तुकडे व राख यांच्या संचयनापासूनच होते. असे शंकू दोन भिन्न पदार्थांच्या संचयनाने निर्माण होत असल्यामुळे यांना संमिश्र शंकू (Composite Cones किंवा Strato Cones) असेही म्हणतात. या शंकूच्या निर्मितीस फार मोठा कालावधी लागतो. हे ज्वालामुखी शंकू अतिशय उंच असून समान उताराचे असतात. शंकूच्या उताराचे स्वरूप शिलारस, खडकांचे तुकडे व राख यांच्या परस्पर प्रमाणावर अवलंबून असते. शिलारसाच्या संचयनाच्या मानाने कठीण पदार्थांच्या संचयनाचे प्रमाण जास्त असेल तर शंकू शीघ्र उताराचा असतो. याउलट शिलारसाचे प्रमाण जास्त असेल तर शंकू मंद उताराचा असतो. संमिश्र ज्वालामुखीच्या शिरोभागी असलेले शंकूचे मुख रुंद असते. काही भागांत या प्रकारच्या शंकूच्या शिरोभागाजवळील त्याचा बराच मोठा भाग नाहीसा झालेला आढळतो; त्यामुळे त्या ज्वालामुखी शंकूचे मुख हे विस्तीर्ण व पसरट झालेले आढळते. अशा शंकूच्या उतारावर बऱ्याच ठिकाणी दुय्यम स्वरूपाच्या लहान आकाराच्या शंकूंची निर्मिती झालेली असते. सिसिली बेटावरील 'माऊंट एटना' या ज्वालामुखीच्या उतारावर अशा प्रकारचे शंकू आढळत असून त्यांची संख्या शंभराहून अधिक आहे. अशा प्रकारच्या ज्वालामुखींत त्यांच्या विस्तीर्ण व रुंद अशा मुखांच्या तळभागावर अंतर्गत शंकूंची निर्मिती झालेली आहे. जगात अशा प्रकारचे पुष्कळ शंकू आहेत. सिसिली बेटावरील माऊंट एटना व जपानमधील फुजियामा ही मिश्र शंकूंची उत्तम उदाहरणे होत.



**आकृती क्र. ९६ : संमिश्र शंकू**

*(**संदर्भ :** प्राकृतिक भू-विज्ञान - प्रा. सु. प्र. दाते के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १२३, १२५)*

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

६०. विषुववृत्तापासून ध्रुवाकडे वाहणाऱ्या ग्रहीय वाऱ्यांचा योग्य क्रम ओळखा.


(अ) पश्चिमी वारे, व्यापारी वारे, ध्रुवीय वारे (ब) व्यापारी वारे, पश्चिमी वारे, ध्रुवीय वारे

(क) व्यापारी वारे, ध्रुवीय वारे, पश्चिमी वारे (ड) ध्रुवीय वारे, पश्चिमी वारे, व्यापारी वारे

पृथ्वीवर हवेच्या कमीजास्त दाबाचे पट्टे निर्माण झाल्यामुळे जास्त दाबाच्या पट्ट्यांकडून कमी दाबाच्या पट्ट्यांकडे वारे वाहतात. या वाऱ्यांना 'ग्रहीय वारे' (Planetary Winds) असे म्हणतात. या वाऱ्यांचे व्यापारी वारे, प्रतिव्यापारी वारे आणि ध्रुवीय वारे असे एकूण तीन गट पडतात.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**व्यापारी वारे**




दोन्ही गोलार्धात २५° ते ३५° अक्षवृत्तांच्या दरम्यान पसरलेल्या जास्त दाबाच्या पट्ट्यांकडून विषुववृत्तावरील कमी दाबाच्या पट्ट्यांकडे वाहणाऱ्या वाऱ्यांना 'व्यापारी वारे' (Trade Winds or Easterlies) म्हणतात. पृथ्वीच्या परिवलनामुळे हे वारे आपल्या मूळ दिशेपासून विचलित होतात; त्यामुळे त्यांची सर्वसाधारण दिशा पूर्वेकडून पश्चिमेकडे असते. म्हणून यांना 'पूर्वीय वारे' असे म्हणतात. उत्तर गोलार्धात हे वारे ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे वाहत असल्याने त्यांना 'ईशान्य व्यापारी वारे' असे संबोधले जाते. दक्षिण गोलार्धात हेच वारे आग्नेयेकडून वायव्येकडे वाहत असल्याने त्यांना 'आग्नेय व्यापारी वारे' या नावाने ओळखतात. हे दोन्ही वारे विषुववृत्ताजवळील शांत हवेच्या पट्ट्याजवळ येऊन मिळतात.

व्यापारी वारे उष्ण प्रदेशाकडे वाहत असल्यामुळे ते उष्ण व कोरडे असतात. त्यांच्यापासून सहसा पाऊस पडत नाही. किनाऱ्यावरील पर्वतरांगांवरून वर चढताना मात्र यांच्यापासून क्वचित पाऊस पडतो. हे वर्षभर नियमित व एकसारखे वाहणारे वारे आहेत. ताशी १६ ते २४ कि. मी. च्या वेगाने हे वारे वाहतात. समुद्रावरील भागात हे जोराने वाहतात. तौलनिकदृष्ट्या उन्हाळ्यापेक्षा हिवाळ्यात हे जोराने वाहतात. हिंदी महासागरावरून विषुववृत्ताच्या उत्तरेकडील भागात त्यांचे मोसमी वाऱ्यांत रूपांतर होते.

**प्रतिव्यापारी वारे**

दोन्ही गोलार्धांत २५° ते ३५° अक्षवृत्तांच्या दरम्यान पसरलेल्या जास्त दाबाच्या पट्ट्याकडून ६०° अक्षवृत्ताच्या जवळ असलेल्या हवेच्या कमी दाबाच्या पट्ट्यांकडे जे वारे वाहतात त्यांना 'प्रतिव्यापारी वारे' (पश्चिमी वारे) (Westerlies) म्हणतात. या वाऱ्यांच्या मूळ दिशेवर परिणाम होऊन त्यांची सर्वसाधारण दिशा पश्चिम-पूर्व अशी असते. त्यांना 'पश्चिमी वारे' म्हणतात. उत्तर गोलार्धात हे वारे नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे व दक्षिण गोलार्धात हेच वारे वायव्येकडून आग्नेयेकडे वाहतात. उत्तर गोलार्धात यांना 'नैर्ऋत्य प्रतिव्यापारी वारे' व दक्षिण गोलार्धात 'वायव्य प्रतिव्यापारी वारे' असे म्हणतात. यांची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

(१) प्रतिव्यापारी वारे विषुववृत्ताच्या दोन्ही बाजूंना ३५° ते ४०° व ६०° ते ६५° या अक्षवृत्तांच्या दरम्यान वाहतात.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

६०. (ब)

(२) साधारण हे वारे उष्ण प्रदेशाकडून ध्रुवाकडील थंड प्रदेशाकडे वाहत असल्यामुळे यांच्यापासून खंडांच्या पश्चिम भागात बहुधा वर्षभर पाऊस पडतो.

(३) उत्तर गोलार्धात आवर्त आणि प्रत्यावर्तामुळे प्रतिव्यापारी वाऱ्यांच्या दिशेवर परिणाम होतो. हिवाळ्यात हे वारे जोराने वाहतात.

(४) दक्षिण गोलार्धात जमिनीच्या भागाच्या मानाने समुद्राचा भाग जास्त असल्यामुळे या भागात हे वारे नियमित वाहतात. दक्षिण गोलार्धात भूमिखंडाचा फारसा अडथळा येत नसल्यामुळे ते अतिशय वेगाने वाहतात. ४०° दक्षिण अक्षांशापलीकडे हे वारे अतिशय वेगाने एकसारखे वाहतात. या भागात या वाऱ्यांना 'गरजणारे चाळीस' (Roaring Forties) असे म्हणतात. ५०° दक्षिण अक्षांशाच्या भागात तर वारे वादळाच्या वेगाने वाहत असतात. या भागात यांना 'खवळलेले पन्नास' (Furious Fifties) असे म्हणतात.

**ध्रुवीय वारे**

ध्रुवाजवळील हवेच्या जास्त दाबाकडून ६०° अक्षवृत्तांजवळील कमी दाबाच्या पट्ट्याकडे उत्तर व दक्षिण गोलार्धात जे वारे वाहतात त्यांना 'ध्रुवीय वारे' असे संबोधले जाते. हे वारे पूर्वेकडून वाहत असल्याने त्यांना 'पूर्व ध्रुवीय वारे' (Polar Easterlies) असेही म्हणतात.

*(**संदर्भ :** PSI-STI-ASO पूर्व परीक्षा-के'सागर*
*के'सागर पब्लिकेशन्स, (एकोणऐंशीवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ५९५-५९६)*

६१. खाली दोन विधाने दिलेली आहेत. त्यांपैकी 'य' हे विधान असून 'र' हे त्याचे कारण आहे. खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.

विधान (य) : विषुववृत्तीय प्रदेशामध्ये सागराची क्षारता कमी असते.

कारण (र) : विषुववृत्तीय प्रदेश हा अति पर्जन्यमान, आभ्राच्छादित आकाश आणि आर्द्रता ही वैशिष्ट्ये असलेला आहे.

(अ) (य) आणि (र) दोन्ही सत्य असून (र) हे (य) चे बिनचूक स्पष्टीकरण आहे.
(ब) (य) आणि (र) दोन्ही सत्य असून (र) हे (य) चे बिनचूक स्पष्टीकरण नाही.
(क) (य) सत्य असून (र) असत्य आहे.
(ड) (य) असत्य असून (र) सत्य आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

समुद्राच्या पाण्याची क्षारता अथवा लवणता सर्वसामान्यपणे दर हजारी ३५ इतकी असते. क्षारतेचे हे प्रमाण सर्व ठिकाणी सारखे नसते. भूमिखंडापासून दूर अंतरावर खुल्या समुद्रात क्षारतेचे हे प्रमाण थोडेबहुत कायम असते. क्षारता तसेच विभिन्न क्षारांचे परस्पर प्रमाण कायम राहण्यास समुद्रातील पाण्याच्या हालचालींची मदत होते.

कर्क आणि मकर वृत्तापासून विषुवृत्ताकडे तसेच ध्रुवाकडे गेल्यास सागरजलाची क्षारता कमी होताना आढळते.

विषुववृत्तीय प्रदेशात उष्णतेमुळे बाष्पीभवन बरेच होत असले तरी वर्षातील अधिक काळ आकाश ढगांनी आच्छादलेले असते. तसेच वातावरणात बाष्पाचे प्रमाण जास्त असते; त्यामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढू शकत नाही. विषुववृत्तीय प्रदेशात वर्षभर पडणाऱ्या जोरदार पावसामुळे समुद्राला शुद्ध पाण्याचा भरपूर पुरवठा होतो. याचा परिणाम म्हणजे या भागात सागरजलाची क्षारता कमी होऊन ती दरहजारी ३४ ते ३५ च्या दरम्यान आढळते. याशिवाय विषुववृत्तीय प्रदेशातील महासागरात ॲमेझॉन, झैरे यांसारख्या अजस्र नद्यांनी आणून टाकलेल्या शुद्ध पाण्यामुळेही त्या भागात लवणता कमी होण्यास मदत होते.

ध्रुवीय प्रदेशात सागरजलाची क्षारता कमी असते. न्यू फाऊंडलंड बेटांजवळ सागरजलाच्या क्षारतेचे प्रमाण दर हजारी ३२ इतके आढळते.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

६१. (अ)

काही वेळा क्षारतेवर समुद्रप्रवाहाचा परिणाम होताना आढळतो. लॅब्राडॉर समुद्रप्रवाहामुळे उत्तर अमेरिकेच्या ईशान्य किनाऱ्याजवळ सागरजलाची क्षारता कमी झाली आहे; तर गल्फ प्रवाहामुळे ब्रिटिश बेटांजवळ सागरजलाची क्षारता थोडे वाढलेली आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** प्राकृतिक भू-विज्ञान - प्रा. सु. प्र. दाते के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३८६-३८७)*

६२. खालीलपैकी कोणता रासायनिक विदारणाचा प्रकार नाही?

(अ) द्रवीकरण (ब) भस्मीकरण (ऑक्सिडेशन)

(क) कर्बाम्ल क्रिया (कार्बोनेशन) (ड) क्षरण क्रिया

गॅब्रो गटातील अग्निजन्य खडकांवर या प्रकारे सौम्य कार्बानिक आम्लाची क्रिया होऊन त्यापासून कॅल्शियम कार्बोनेट, सोडियम, मॅग्नेशियम, सिलिका व माती ही निराळ्या गुणधर्मांची घटकद्रव्ये बाहेर पडतात. यात मूळ खडकाचे अपक्षयन होते. या प्रकारे सौम्य कार्बानिक आम्लाची भूपृष्ठातील घटकांवर रासायनिक क्रिया होऊन ते कुजून नाहीसे होतात. या क्रियेला 'कार्बोनेशन' (Carbonation) असे संबोधले जाते. ही क्रिया चुनखडी, डोलोमाईट आणि संगमरवर खडक असलेल्या भूपृष्ठाच्या भागात जास्त प्रभावी असते. या क्रियेमुळे चुनखडीच्या प्रदेशात भूपृष्ठावर निरनिराळ्या आकारांचे खड्डे पडलेले आढळतात. चुनखडीच्या प्रदेशावरून वाहणारे पाणी अंतर्गत भागातून वाहू लागल्यास त्या पाण्यात चुनखडीचे खडक विरघळून गुहांची निर्मिती होते.

भूपृष्ठाकडे येणाऱ्या पावसाच्या पाण्यात वातावरणातील प्राणवायू थोड्याफार प्रमाणात विरघळलेला असतो; पण प्राणवायुमिश्रित पावसाचे पाणी खडकावर कार्बानिक आम्लासारखे तीव्रतेने कार्य करीत नाही. तरीही ज्या खडकात लोहधातूचा अंश अधिक असतो अशा खडकावर या पाण्याचा परिणाम होऊन लोखंडाचा प्राणिद तयार होतो. यात मूळ खडक कुजतो; कमकुवत होतो व अपक्षयाची क्रिया घडून येते. या क्रियेला 'ऑक्सिडेशन' (Oxidation) असे म्हटले जाते.

पावसाच्या पाण्याचा खडकातील काही विशिष्ट खनिज द्रव्यांवर रासायनिक परिणाम होऊन त्यात ही खनिज द्रव्ये विरघळतात व खडकापासून विलग होतात किंवा त्या खनिज द्रव्यांचे रासायनिक संघटन बदलून खडकांचे विदारण होते. खनिज मीठ व जिप्सम यांसारखी खनिज द्रव्ये पाण्यात लवकर विरघळतात; म्हणून अशा क्षारयुक्त खडकांवर या क्रियेचा जास्त परिणाम होतो. या क्रियेला 'सोल्युशन' (Solution) असे म्हणतात.

*(**संदर्भ :** प्राकृतिक भू-विज्ञान - प्रा. सु. प्र. दाते के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १३८-१३९)*

६३. खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

विधान '१' : विशिष्ट तापमानावर ठरावीक आकारमानाच्या हवेत असलेले बाष्पाचे प्रमाण म्हणजे त्या हवेची 'सापेक्ष आर्द्रता' होय.

विधान '२' : हवेची निरपेक्ष आर्द्रता आणि त्याच तापमानावर त्या हवेची कमाल बाष्पधारण शक्ती यांच्या गुणोत्तराला 'विशिष्ट आर्द्रता' म्हणतात.

(अ) विधान '१' आणि '२' दोन्ही बरोबर आहेत.

(ब) विधान '१' आणि '२' दोन्ही चूक आहेत.

(क) विधान '१' बरोबर असून विधान '२' चूक आहे.

(ड) विधान '१' चूक असून विधान '२' बरोबर आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

६२. (ड) ६३. (ब)

**निरपेक्ष आर्द्रता :** एका विशिष्ट तापमानावर विशिष्ट परिमाणाच्या हवेत किती बाष्प आहे ते पाहून हवेची निरपेक्ष आर्द्रता ठरवतात. (Absolute humidity refers to the weight of water vapour per unit volume of air.) १ घनफूट किंवा १ घनमीटर हवेत अनुक्रमे किती ग्रेन किंवा ग्रॅम बाष्प आहे ते पाहून त्यावरून निरपेक्ष आर्द्रता काढतात.

उदाहरणार्थ १ घनमीटर हवेत ०° सें. ग्रे. तापमानावर ४.०८ ग्रॅम बाष्प असेल, तर ४.०८ ग्रॅम ही त्या एका घनमीटर हवेची निरपेक्ष आर्द्रता होईल. विशिष्ट आकारमानाची हवा विशिष्ट तापमानावर बाष्पाचे विशिष्ट परिमाण धारण करू शकते. जर एका विशिष्ट परिमाणाच्या हवेत एका विशिष्ट तापमानावर ती त्या तापमानावर जितके जास्तीत जास्त बाष्प धारण करू शकते तितकेच बाष्प जर त्या वेळी प्रत्यक्षात असेल तर अशा वेळी ती हवा बाष्पाने परिपूर्ण असते. या हवेला संपृक्त हवा असे म्हणतात. उलट बाष्पधारणक्षमतेपेक्षा कमी बाष्प असेल तर अशा वेळी ती हवा बाष्पाने परिपूर्ण नसते. अशा हवेला असंपृक्त हवा असे म्हणतात.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** प्राकृतिक भू-विज्ञान - प्रा. सु. प्र. दाते के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३५१)*

६४. खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

विधान 'य' : सागरी क्षेत्रात समतापरेषा एकमेकीस व अक्षवृत्तास जवळजवळ समांतर जातात.

कारण 'र' : सागरी स्थानांचे तापमान उंचीच्या परिणामांपासून मुक्त असते.

(अ) 'य' व 'र' दोन्ही बरोबर आहेत आणि 'र' हे 'य' चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ब) 'य' व 'र' दोन्ही बरोबर आहेत; परंतु 'र' हे 'य' चे अचूक स्पष्टीकरण नाही.

(क) 'य' हे बरोबर आहे; परंतु 'र' हे चूक आहे.

(ड) 'य' हे चूक आहे; परंतु 'र' हे बरोबर आहे.

(१) समताप रेषा या साधारणपणे नकाशावर पूर्व-पश्चिम गेलेल्या असून त्या अक्षवृत्तांना जवळ जवळ समांतर असतात. यावरून पृथ्वीवरील तापमानाच्या वितरणावर अक्षवृत्तांचा फार मोठा परिणाम होत असल्याचे सिद्ध होते. कोणत्याही ऋतूत पृथ्वीवरील एकाच अक्षवृत्तावर तापमानात फार फरक नसतो, परंतु ध्रुववृत्त आणि विषुववृत्त यांच्या तापमानांत त्या दृष्टीने फार फरक आढळतो.

(२) समुद्र आणि जमीन यांच्यामधील सीमेवर या रेषा वाकलेल्या आढळतात. याचे प्रमुख कारण म्हणजे जमीन आणि पाणी यांचे तापण्याचे गुणधर्म विभिन्न असल्याने त्यांचे तापमानही वेगवेगळे असते. समुद्रावर या रेषा परस्परांना जवळपास समांतर असतात; परंतु जमिनीवर मात्र तापमानावर विभिन्न घटकांचा प्रभाव पडत असल्यामुळे त्या नागमोडी अथवा अनियमित आकाराच्या आढळतात. उन्हाळ्यात जमिनीवरून समुद्राकडे जाणाऱ्या समताप रेषा विषुववृत्ताकडे झुकलेल्या आढळतात. हिवाळ्यात याच रेषा ध्रुवाकडे झुकलेल्या असतात. समुद्रावरून जमिनीकडे जाणाऱ्या रेषा उन्हाळ्यात ध्रुवाकडे व हिवाळ्यात विषुववृत्ताकडे वळतात.

(३) समताप रेषांमधील अंतर हे सर्व ठिकाणी सारखे नसते. त्यांच्यामधील कमी अंतर तापमानातील शीघ्र बदल दाखविते. काही वेळा त्यांच्यात अंतर अधिक असते. ते तापमानातील मंद बदल दर्शविते.

(४) समुद्रकिनाऱ्याजवळून उष्ण प्रवाह वाहत असल्यास या रेषा ध्रुवाकडे व थंड प्रवाह वाहत असल्यास विषुववृत्ताकडे झुकलेल्या आढळतात.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** प्राकृतिक भू-विज्ञान - प्रा. सु. प्र. दाते के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३१२)*

६४. **(अ)**

६५. खालील विधानांचा विचार करून बिनचूक पर्यायांची निवड करा.

(१) ज्या ठिकाणी खंडान्त उतार अतिशय रुंद असतो, त्या क्षेत्रामध्ये मत्स्यक्षेत्रे तयार होतात.

(२) उबदार उष्णकटिबंधीय सागरी पाण्यामध्ये मासेमारी विकसित झालेली आहे.

(३) उष्ण आणि थंड समुद्रप्रवाहांच्या मिश्रणातून माशांसाठी वनस्पतिखाद्य आणले जाते.

(४) भारतामध्ये अंतर्गत मासेमारी इतर मासेमारी प्रकारांपेक्षा अधिक महत्त्वाची आहे.

(अ) विधान १ आणि २ सत्य आहेत. (ब) विधान १ आणि ३ सत्य आहेत.

(क) विधान २, ३ आणि ४ सत्य आहेत. (ड) विधान १, २ आणि ३ सत्य आहेत.

मासेमारी व्यवसायाचा विकास पुढील घटकांवर अवलंबून असतो–

(१) समुद्रकिनाऱ्याचे स्वरूप (२) समुद्रकिनाऱ्याची खोली

(३) उष्ण व शीत प्रवाहाचे एकत्रीकरण (४) माशाची खाद्य वनस्पती (प्लवंग)

(५) समुद्राच्या पाण्याचे तापमान (६) वाहतुकीच्या सोयी

(७) शीतगृहाच्या सोयी (८) माशांना असलेली बाजारपेठ

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** महाराष्ट्राचा भूगोल - प्रा. के. ए. खतीब के'सागर पब्लिकेशन्स, (एकोणतिसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २७२)*

६६. विकसनशील देशांमध्ये लोकसंख्या स्तूप .... असतो.

(अ) अरुंद पाया आणि रुंद माथा (ब) रुंद पाया आणि रुंद माथा

(क) रुंद पाया आणि अरुंद माथा (ड) अरुंद पाया आणि अरुंद माथा

६७. खालील विधानांची सत्यता तपासा आणि योग्य पर्याय निवडा.

विधान '१' : भारताचा काही भूभाग उत्तर गोलार्धात असून काही भूभाग दक्षिण गोलार्धात आहे.

विधान '२' : भारताचा दक्षिणोत्तर विस्तार सुमारे ७५०० कि. मी. पेक्षाही जास्त आहे.

(अ) विधान '१' आणि '२' दोन्ही बरोबर आहेत.

(ब) विधान '१' आणि '२' दोन्ही चूक आहेत.

(क) विधान '१' बरोबर असून विधान '२' चूक आहे.

(ड) विधान '१' चूक असून विधान '२' बरोबर आहे.

भारत पूर्व गोलार्धात जवळजवळ मध्यवर्ती ठिकाणी आहे. दुसऱ्या प्रकारे तो उत्तर गोलार्धात आहे, असेही म्हणता येईल. मध्यवर्ती स्थानामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या भौगोलिक स्थानाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारताचे उत्तर-दक्षिण अंतर ३,२१४ कि. मी. आहे व पूर्व-पश्चिम अंतर २,९३३ कि. मी. आहे.

*(**संदर्भ :** भारताचा भूगोल - डॉ. अनिरुद्ध के'सागर पब्लिकेशन्स, (नववी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ९)*

६८. खालील विधानांची सत्यता तपासा आणि योग्य पर्याय निवडा.

विधान '१' : हिमालयीन नद्या या हिमालयाच्या अनेक रांगा व शिवालीक टेकड्या पार करून मैदानी प्रदेशात प्रवेश करतात.

विधान '२' : प्रायद्वीपीय (द्वीपकल्पीय) नद्या प्रस्तरभंगामुळे निर्माण झालेल्या खचदऱ्यांतून वाहतात.

६५. (ड) ६६. (क) ६७. (ब)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(अ) विधान '१' आणि '२' दोन्ही बरोबर आहेत.
(ब) विधान '१' आणि '२' दोन्ही चूक आहेत.
(क) विधान '१' बरोबर असून विधान '२' चूक आहे.
(ड) विधान '१' चूक असून विधान '२' बरोबर आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

नद्यांची गुणवैशिष्ट्ये, स्वरूप व त्यांच्याद्वारा निर्माण होणाऱ्या भू-प्रदेशांचे स्वरूप लक्षात घेता भारतातील नद्यांचे हिमालयीन नद्या व द्वीपकल्पीय नद्या असे दोन वर्ग पडतात. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्या तीव्र उताराच्या प्रदेशातून वाहणाऱ्या असल्याने त्या मोठ्या प्रमाणावर खननकार्य करतात. मोठ्या प्रमाणातील खननकार्यामुळे त्या गाळही मोठ्या प्रमाणावर वाहून आणतात; त्यामुळे या नद्यांनी विस्तृत स्वरूपाची अशी गाळाची मैदाने बनविली आहेत. द्वीपकल्पीय नद्या तुलनात्मक दृष्ट्या प्राचीन अशा भू-प्रदेशांवरून वाहणाऱ्या असल्याने या प्रदेशांचे उतार मंद आहेत.

हिमालयीन नद्या वेगाने खननकार्य करीत असल्याने त्यांच्या दऱ्या खोल व इंग्रजी 'व्ही' (V) आकाराच्या आहेत. 'डून' प्रदेशासारख्या काही भागात त्या इंग्रजी 'यू' (U) आकाराच्या आहेत. याउलट, द्वीपकल्पीय नद्यांच्या दऱ्या रुंद व सपाट असून काही भागांत भू-प्रदेशाच्या पुनरुज्जीवनामुळे नद्यांच्या मार्गात धबधबे निर्माण झाले आहेत.

हिमालयातील प्रचंड पाऊस व वितळणारे बर्फ यांमुळे हिमालयीन नद्या बारमाही वाहणाऱ्या, भरपूर पाणी वाहून आणणाऱ्या व परिणामी अधिक क्रियाशील आहेत. याउलट, द्वीपकल्पीय नद्या फक्त पावसाळ्यातच सलगरीत्या वाहू शकतात. उरलेल्या काळात पाण्याचे प्रमाण रोडावल्यामुळे त्यांची सलगता नष्ट होते व काही भागांत तर त्या कोरड्या पडतात.

हिमालयीन नद्यांचा अभ्यास केला असता त्या चंद्राकृती वळणे घेऊन वारंवार प्रवाहाची दिशा बदलत असल्याचे दिसून येते. याउलट, द्वीपकल्पीय नद्यांनी अपवादात्मकरीत्याच प्रवाहाचे वळण बदलल्याचे दिसून येते.

हिमालयीन नद्या बारमाही वाहणाऱ्या असल्याने त्यांचा जलसिंचनासाठीही मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. वाहतुकीसाठीही या नद्यांचा उपयोग केला जातो. या नद्यांनी निर्माण केलेली सुपीक गाळाची मैदाने, जलसिंचनासाठी व वाहतुकीसाठी त्यांचा होत असणारा उपयोग यांमुळे साहजिकच, त्यांच्या खोऱ्यांत दाट लोकवस्ती आढळते. याउलट, द्वीपकल्पीय नद्या उंचसखल भागातून वाहणाऱ्या असल्याने व त्यांनी वाहून आणलेल्या पाण्याचे प्रमाणही कमी असल्याने जलसिंचन व जलवाहतूक यांसाठी त्यांचा मर्यादितच उपयोग होतो. परिणामी, या नद्यांच्या खोऱ्यांतील लोकवस्ती हिमालयीन नद्यांच्या खोऱ्यांतील लोकवस्तीपेक्षा तुलनात्मकदृष्ट्या कमी आहे.

*(**संदर्भ :** संपूर्ण तयारी - के'सागर के'सागर पब्लिकेशन्स, (एकविसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३७३, ३७४)*

६९. पर्जन्यप्रदेश आणि पर्जन्यछायेचा प्रदेश ही कोणाची वैशिष्ट्ये आहेत?
(अ) आवर्त पर्जन्य (ब) अभिसरण पर्जन्य (क) प्रतिरोध पर्जन्य (ड) औष्णिक पर्जन्य


**प्रतिरोध पर्जन्य**

यास इंग्रजीत 'Relief Rain' असे म्हणतात. बाष्पयुक्त हवा वाहत येत असताना भूपृष्ठावरील पर्वतासारख्या एखाद्या उंचवट्याला अडते. पर्वताच्या ज्या बाजूला ही हवा अडते त्या बाजूवरून ती जोराने वर ढकलली जाते. वर ढकलल्या गेलेल्या हवेवरील दाब कमी होतो व ती प्रसरण पावते. हवा पर्वताच्या बाजूवरून वर चढत राहिल्यास तिचे तापमान आपोआप पुरेसे कमी होते व शेवटी ती हवा बाष्पाने संपृक्त होऊन तिची साक्षेप आर्द्रता १०० टक्के होते. यानंतरही हवा वर चढत राहिली तर तिचे तापमान पुरेसे कमी होऊन बाष्पाचे सांद्रीभवन होते व सूक्ष्म जलकण

६८. (अ) ६९. (अ)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

तयार होऊन ते वातावरणात ढगांच्या रूपाने तरंगू लागतात व शेवटी यापासून पाऊस पडतो. आकृती क्र. २८९ मध्ये बाष्पयुक्त हवा पर्वताला अडल्यावर आर्द्रतेच्या दृष्टीने तिच्या स्थितीत कसकसा बदल होत जातो हे स्पष्ट होईल. अशा रीतीने बाष्पयुक्त हवा पर्वतासारख्या एखाद्या अडथळ्याला अडून पावसाची निर्मिती होत असल्यामुळे याला प्रतिरोध पाऊस असे म्हणतात. डोंगराच्या वातसन्मुख बाजूवर असा पाऊस भरपूर पडतो. डोंगराच्या माथ्यावरून बाष्पयुक्त हवा पलीकडे गेली म्हणजे डोंगराच्या विरुद्ध बाजूवरून ती खाली उतरू लागते; यामुळे तिच्यावरील दाब वाढतो व ती आकुंचन पावते. या क्रियेत खाली उतरणाऱ्या हवेचे तापमान वाढते व तिची बाष्पधारणशक्ती वाढून तिची सापेक्ष आर्द्रता कमी कमी होते. शेवटी हवा कोरडी होते. यामुळे पर्वताच्या ज्या बाजूवरून बाष्पयुक्त हवा खाली उतरते त्या बाजूवर बहुधा पाऊस पडत नाही. पर्वताच्या या भागाला वर्षाछायेचा प्रदेश (Rain Shadow Area) म्हणतात. आपल्या देशात मोसमी वाऱ्यांमुळे पडणारा बहुतेक पाऊस या प्रकारचा असतो. नैर्ऋत्य मोसमी वारे सह्याद्री पर्वताला अडल्यावर पश्चिम बाजूवर जास्त पाऊस पडतो. पर्वताच्या पूर्व भागात पावसाचे प्रमाण कमी कमी होत जाते.




**आकृती क्र. २८९ : प्रतिरोध पर्जन्य**

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** प्राकृतिक भू-विज्ञान - प्रा. सु. प्र. दाते के'सागर पब्लिकेशन्स, (पाचवी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ३६६, ३६७)*

७०. खालील वैशिष्ट्ये कोणत्या प्रदेशाची आहेत?

(१) जलवाहतुकीसाठी उपयुक्त आहे. (२) नारळाचे उत्पादन घेतले जाते.
(३) मासेमारीसाठी अनुकूल असतो. (४) पर्यटकांसाठी आकर्षक असतो.

(अ) उत्तर-भारतीय मैदानी प्रदेश (ब) प्रायद्वीपीय पठारी प्रदेश
(क) किनारवर्ती प्रदेश (ड) हिमालयीन प्रदेश

७१. UNEP च्या नियमांप्रमाणे खालील प्रदूषक आणि त्यांच्या माध्यमांच्या जोड्या जुळवा.

| प्रदूषक | माध्यम |
|---|---|
| (य) नायट्रोजन ऑक्साइडस् | (१) समुद्र |
| (र) पेट्रोलियम हायड्रोकार्बन्स | (२) अन्न |
| (ल) फ्लुराइडस् | (३) हवा |
| (व) मायकोटॉक्झिन्स | (४) स्वच्छ पाणी |

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(अ) य - १, र - २, ल - ३, व - ४ (ब) य - ४, र - ३, ल - २, व - १
(क) य - ३, र - १, ल - ४, व - २ (ड) य - ३, र - १, ल - २, व - ४

**७०. (क) ७१. (क)**

७२. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने खालीलपैकी कोणता दिवस 'जागतिक ओझोन दिवस' म्हणून निवडलेला आहे?

(अ) १ जून (ब) ५ जून (क) १ सप्टेंबर (ड) १६ सप्टेंबर

१९९५ पासून १६ सप्टेंबर हा जागतिक ओझोन दिवस म्हणून साजरा केला जातो.

१६ सप्टेंबर - ओझोन थर संरक्षणासाठीचा आंतरराष्ट्रीय दिन

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** १. संपूर्ण पारिस्थितीकी जैव-विविधता व हवामान बदल साधना योगेश नेतनकर, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २००*

*२. संपूर्ण जनरल स्टडीज - के'सागर पब्लिकेशन्स, (पन्नासावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ४७३)*

७३. खालीलपैकी कोणता हरितगृह वायू संपूर्ण मानवनिर्मित आहे?

(अ) मिथेन (ब) कार्बन-डाय-ऑक्साइड

(क) नायट्रस ऑक्साइड (ड) क्लोरोफ्लुरोकार्बन

**क्लोरोफ्लुरो कार्बन्स**

विविध औद्योगिक व दैनंदिन वापराच्या प्रक्रिया व उपकरणांमध्ये वापरला जाणारा हा मानवनिर्मित एक स्वस्त वायू आहे. क्लोरोफ्लुरो कार्बन (CFC) बाष्पनशील आहेत. या वायूमुळे गंज चढत नाही. हा वायू ज्वलनशील, क्रियाशील (रिॲक्टीव्ह) आणि विषारी नाही. मात्र, तो स्थिर आहे. अशा या गुणांमुळे या वायूचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला आहे. खालील विविध प्रक्रियांमध्ये क्लोरोफ्लुरो कार्बन (CFC) चा वापर होतो.

(१) रेफ्रिजरेटर्समध्ये पदार्थ ताजे व थंड ठेवण्यासाठी क्लोरोफ्लुरो कार्बन (CFC) हे उष्णता शोषून घेतात.

(२) वातानुकूलन व्यवस्थेमध्ये वातावरण थंड ठेवण्यासाठी.

(३) इन्सुलेशन व पॅकेजिंगमध्ये दृढ फोम तयार करण्यासाठी.

(४) ऑटोमोबाईल्समध्ये शीतकारक म्हणून.

(५) विद्युत मंडलांच्या (इलेक्ट्रिक सर्किट्स) स्वच्छतेकरिता द्रावक म्हणून.

(६) विविध रुग्णालयांमध्ये निर्जंतुकीकरण पदार्थ म्हणून.

(७) आग विझविण्यासाठी अग्निशामक म्हणून.

(८) विविध सुगंधी फवारे (एरोसोल स्प्रेकॅन्स) यामध्ये प्रणोदक (प्रॉपलंट) म्हणून.

क्लोरोफ्लुरो कार्बन (CFC) मुळे ओझोन थराचा ऱ्हास करण्याचे प्रमाण १४ टक्के आहे.

*(**संदर्भ :** संपूर्ण पारिस्थितीकी जैव-विविधता व हवामान बदल - साधना योगेश नेतनकर के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १९५)*

७४. दोन लगतच्या जीवसमुदायामधील संक्रमणात्मक प्रदेश .... म्हणून ओळखला जातो.

(अ) इकोझोन (ब) इकोपॉज

(क) इकोटोन (ड) इकोटाइप

**इकोटोन** : दोन समुदायांच्या सीमेवर असणारा संक्रमणावस्थेतील विशिष्ट पारिस्थितीकीय प्रदेश म्हणजे इकोटोन (Ecotone).

*(**संदर्भ :** संपूर्ण पारिस्थितीकी जैव-विविधता व हवामान बदल - योगेश व साधना नेतनकर के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती), पृष्ठ क्रमांक : २७)*

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

७२. (ड) ७३. (ड) ७४. (क)

७५. खालीलपैकी कोणत्या मानवी परिणामांमुळे जागतिक हवामानात बदल होतो?

(१) ८००० वर्षांपासून होणारी जंगलतोड. (२) आग आणि अतिचरण यांचा वापर.

(३) ५००० वर्षांपासून होणारी खाचरातली भातशेती.

(४) औद्योगिक क्रांती

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(अ) फक्त ४ (ब) फक्त ३ आणि ४

(क) फक्त २, ३ आणि ४ (ड) वरीलपैकी सर्व

पृथ्वीवरील सजीवसृष्टीच्या सर्व व्यवहारांच्या मुळाशी सौरऊर्जा आहे; कारण सौरऊर्जा पृथ्वीच्या पृष्ठभागावर पडते आणि त्याचा परिणाम म्हणून पृष्ठभागालगतची हवा गरम राहते. वातावरणातील निरनिराळे 'हरितगृह वायू' पृष्ठभागापासून परत बाहेर फेकली जाणारी ऊर्जा अडवितात. या नैसर्गिक प्रक्रियेचा सजीवसृष्टीला आणि मानवालाही फायदा असतो. वातावरणातील कार्बन डाय ऑक्साइड व मिथेन हे वायू या कामात महत्त्वाचे ठरतात. निसर्गात ऑक्सिजन, कार्बन डाय ऑक्साइड वगैरे वायू दीर्घकाळ संतुलित अवस्थेत होते; परंतु गेल्या दीडशे-दोनशे वर्षांत मात्र विशेषत: औद्योगिक क्रांतीनंतर या संतुलनावर विपरीत परिणाम झाला आहे. या बदलाचा परिणाम म्हणून पृथ्वीचे तापमान वाढलेले दिसते. या परिणामाला 'जागतिक तापमानवाढ' असे म्हणतात. जागतिक तापमानवाढीमुळे मानवी आरोग्य, पर्यावरण यांवर दुष्परिणाम होत आहेत. म्हणूनच अलीकडच्या काळात जागतिक तापमानवाढ आणि एकूणच हवामानातील बदल हे विषय सतत चर्चेमध्ये आहेत.

जागतिक तापमानवाढीस एकूण चार वायू कारणीभूत असतात असे मानले जाते. कार्बन डाय ऑक्साइड, मिथेन ($CH_4$), नायट्रस ऑक्साइड ($N_2O$) आणि क्लोरो-फ्ल्युरो-कार्बन (आणि इतर ओझोननाशक घटक) ही ती चार मुख्य प्रदूषके आहेत. 'आयपीसीसी' म्हणजे 'इंटरगव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज' ही आंतरराष्ट्रीय संस्था हरितगृह वायूंच्या प्रमाणावर लक्ष ठेवते. या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीवरून या चार हरितगृह वायूंच्या प्रमाणात झालेला बदल स्पष्टपणे जाणवणारा आहे. उदाहरणार्थ– औद्योगिक क्रांतीपासून ते सन २०१२ पर्यंत गेल्या २६१ वर्षांत कार्बन डाय ऑक्साइड वायूच्या प्रमाणात २८० ppm ते ३९१ ppm (पार्टस् पर मिलियन) अशी ४० टक्के वाढ झालेली आहे.

वातावरणीय बदल घडून येण्याची मुख्य कारणे म्हणजे प्रदूषण, निर्वनीकरण, जैवविविधतेचा ऱ्हास व मानवाकडून होत असलेले निसर्गाचे अमर्याद शोषण. औद्योगिक क्रांतीनंतर जागतिक तापमानवाढ ही मुख्य समस्या निर्माण झाली आहे.

**जंगलतोड**

विकसनशील देशांमध्ये जंगले तोडण्याऐवजी जाळली जातात. यामुळे कार्बन-डाय-ऑक्साइड तर निर्माण होतोच शिवाय वनांद्वारे होणारे कार्बन संग्रहणही रोखले जाते. वनांच्या जागी शेती केली तर वनांमुळे मिळणारा वातावरण थंड होण्याचा फायदा मिळत नाही.

यांसारख्या इतरही अनेक कारणांमुळे वातावरण बदलते. उदाहरणार्थ– सागरकिनाऱ्यावरील बांधकामे, खाणी तसेच जेट विमानांद्वारे उत्सर्जित होणारा वायूंचा प्रवाह यासारख्या मानवाच्या कृत्यांमुळे वातावरण बदलांना अधिक चालना मिळते.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**हरितगृह वायू**

वातावरणातील ज्या वायूंमुळे हरितगृह परिणाम घडून येतो त्यांना हरितगृह वायू (ग्रीन हाऊस गॅसेस) म्हणतात. कार्बन-डाय-ऑक्साइड ($CO_2$), मिथेन ($CH_4$), नायट्रस ऑक्साइड ($N_2O$), क्लोरोफ्लुरोकार्बन्स

**७५. (ड)**

(CFCs) या चार वायूंना मुख्य हरितगृह वायू म्हणतात. हे वायू अत्यंत अल्प प्रमाणात वातावरणात असतात. पण पृथ्वीच्या तापमानाचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. या वायूंव्यतिरिक्त हायड्रो क्लोरोफ्लुरोकार्बन्स (HCFCs), हॅलोन्स, कार्बन टेट्राक्लोराइड (CTC) आणि ओझोन हे सुद्धा हरितगृह परिणामात योगदान देतात.

**मिथेन ($CH_4$)**

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

मिथेन हा निसर्गामध्ये अत्यल्प प्रमाणात आढळतो. मात्र औद्योगिक क्रांतीनंतर मिथेनचे निसर्गातील प्रमाण दुप्पट झाले आहे. निसर्गतः मिथेन हा ज्वालामुखीद्वारे वातावरणात मिसळतो, मात्र औद्योगिक क्रांतीनंतर ज्वालामुखीपेक्षाही मानवी क्रियांमुळे मिथेनचे वातावरणातील प्रमाण वाढले आहे. मिथेनची निर्मिती मुख्यत्वे खनिज तेलाच्या उत्पादन, प्रक्रिया इत्यादीमुळे होते. त्याचबरोबर पशुपालन, भातशेती, सेंद्रिय कचऱ्याचे ज्वलन व विघटन, जैवकचऱ्याची विल्हेवाट, दूषित व मैलापाणी प्रक्रिया इत्यादीमुळे वातावरणात मिथेन मिसळला जातो. मिथेन हा वातावरणात १२ वर्षे रेंगाळत राहतो व त्याची तापमानवृद्धीची क्षमता कार्बन-डाय-ऑक्साइडपेक्षा २१ पट अधिक आहे. वातावरणातील मिथेनचे औद्योगिक क्रांतीपूर्व प्रमाण ७०० पार्टस् पर बिलियन (Parts per billion) एवढे होते तर १९९४ मध्ये १७२० पार्टस पर बिलीयन (२.५ पट) एवढे झाले आहे.

*(**संदर्भ :** १. संपूर्ण तयारी - के'सागर (एकविसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ७८३ ते ७८५*
*२. संपूर्ण पारिस्थितीकी जैव-विविधता व हवामान बदल - योगेश व साधना नेतनकर*
*के'सागर पब्लिकेशन्स, (दुसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १६६, १६८, १७२)*

७६. दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळात पुढीलपैकी कोणत्या ठिकाणी लोहपोलाद कारखाना सुरू करण्यात आला नाही?

(१) रूरकेला (ओडिशा) (२) भिलाई (छत्तीसगढ)
(३) दुर्गापूर (प. बंगाल) (४) बोकारो (झारखंड)
(अ) फक्त १ आणि २ (ब) फक्त ३ (क) फक्त ४ (ड) फक्त १ आणि ४

राष्ट्रीय उत्पन्नात प्रतिवर्षी ४.५ टक्क्यांनी वाढ घडवून आणणे; दहा ते बारा दशलक्ष व्यक्तींसाठी नव्याने रोजगार निर्माण करणे; अवजड आणि पायाभूत उद्योगांच्या विकासावर विशेष भर देऊन देशास वेगाने औद्योगिकीकरणाच्या दिशेने नेणे; उत्पन्नातील व संपत्तीतील विषमता दूर करून आर्थिक साधनसंपत्तीचे अधिक समान वाटप घडवून आणणे, ही या योजनेची उद्दिष्टे होती. ही योजना पी. सी. महालनोबिस यांच्या प्रतिमानावर आधारित होती.

**पायाभूत उद्योगांची स्थापना**

या योजनेच्या काळात रशियाच्या मदतीने भिलाई (छत्तीसगढ) येथे, जर्मनीच्या म्हणजे तत्कालीन पश्चिम जर्मनीच्या मदतीने रुरकेला (ओडिशा) येथे, तर ब्रिटनच्या मदतीने दुर्गापूर (पश्चिम बंगाल) येथे पोलादनिर्मितीचे प्रचंड प्रकल्प उभारले गेले.

*(**संदर्भ :** भारतीय अर्थव्यवस्था -के'सागर*
*के'सागर पब्लिकेशन्स (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ९१)*

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

७७. किंमतवाढीस कारणीभूत असणारा पुढीलपैकी कोणता घटक पुरवठाजन्य नाही?

(१) निर्यातवाढ (२) साठा (३) पतनिर्मितीत वाढ (४) दुष्काळ
(अ) फक्त १ आणि २ (ब) फक्त ३ आणि ४ (क) फक्त ४ (ड) फक्त ३

**७६. (क) ७७. (ड)**

बँकदर आणि नाणेबाजारातील व्याजाचे दर यांचा परस्पर निकटचा संबंध असतो. बँकदरात बदल केल्यास, त्याप्रमाणे नाणेबाजारातील व्याजाचे दर बदलतात. समजा, व्यापारी बँकांकडे अतिरिक्त पैसा असल्याने अर्थव्यवस्थेत पतनिर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे. अशा वेळी देशात भाववाढीला चालना मिळते.

बँकदरात बदल करताना रिझर्व्ह बँकेने केवळ भाववाढ रोखणे हेच प्रमुख उद्दिष्ट ठेवल्याचे आढळते. तथापि, भारतीय अर्थव्यवस्थेत वस्तूंची टंचाई मोठ्या प्रमाणात असल्याने आणि मागणी सतत वाढत असल्याने बँकदराद्वारे किंमतपातळी स्थिर राहण्याऐवजी प्रत्यक्षात त्यात वाढ झाल्याचे दिसते.

भारतीय रिझर्व्ह बँकेचे बँकदरात वाढ करून भाववाढ रोखण्याचे उद्दिष्ट फारसे सफल झाले नाही. याचे मुख्य कारण बँकदर वाढविल्याने केवळ साठेबाजी किंवा सट्टेबाजी कमी होते; परंतु भारतात वस्तूंची टंचाई हेच भाववाढीचे प्रमुख कारण असते.

समजा, भारतीय अर्थव्यवस्थेत पैसा किंवा पतपैसा वाढलेला आहे. व्यापारी बँका अर्थव्यवस्थेच्या गरजेपेक्षा जास्त पैसा निर्माण करीत आहेत; त्यामुळे भाववाढ होत आहे.

भारतीय बँकिंग नियमन अधिनियमातील कलम २१ मध्ये निवडक पतनियंत्रणासंबंधी तरतुदी आहेत. त्या तरतुदींचा वापर रिझर्व्ह बँक प्रामुख्याने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून करीत आहे; कारण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून भारतातील औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली; त्यामुळे रोजगार, उत्पन्न आणि मागणी यांत वाढ झाली. परिणामी, देशात किंमतपातळी वाढू लागली. शेतमालाची आणि जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी/सट्टेबाजी यात वाढ झाल्याने पुन्हा किमती वाढू लागल्या.

वस्तूंची टंचाई व अपुरे उत्पादन ही भारतातील किंमतवाढीची प्रमुख कारणे आहेत. व्यापाऱ्यांची साठेबाजीची प्रवृत्ती हेदेखील या किंमतवाढीचे एक कारण असते.

*(**संदर्भ :** भारतीय अर्थव्यवस्था – के'सागर*
*के'सागर पब्लिकेशन्स (पहिली आवृत्ती); पृष्ठ क्रमांक : १९८, १९९, २००, २०१, २०६, २०७)*

७८. पुढीलपैकी कोणता घटक दारिद्र्यनिर्मितीस कारणीभूत नाही?

(१) भाववाढ (२) शासकीय खर्चात वाढ

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

(३) तुटीचा अर्थभरणा (४) अल्पबचती व भांडवलनिर्मिती

(अ) फक्त १ आणि ३ (ब) फक्त १, ३ आणि ४ (क) फक्त २ आणि ४ (ड) फक्त २ आणि ३

**भारतातील दारिद्र्याची कारणे**

भयावह लोकसंख्यावाढ, मालमत्तेची असमान विभागणी, उच्च व्यावसायिक प्रशिक्षणासाठी समान संधीचा अभाव, मोठ्या प्रमाणावरील खुली व छुपी बेरोजगारी, वारसा हक्काच्या कायद्यानुसार मालमत्तेची अनेक वारसांत होणारी वाटणी, द्वितीयक व तृतीयक क्षेत्रांचा अपुरा विकास, जमिनींचे विभाजन वा तुकडीकरण, अज्ञान व निरक्षरता आदींचा भारतातील मोठ्या प्रमाणावरील दारिद्र्याची कारणे म्हणून उल्लेख करावा लागेल.

*(**संदर्भ :** संपूर्ण तयारी – के'सागर*
*के'सागर पब्लिकेशन्स, (एकविसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ६६६)*

७९. 'किमान जीवनावश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक किमान उत्पन्नाचा अभाव' याचा संबंध दारिद्र्याच्या पुढीलपैकी कोणत्या प्रकाराशी येतो?

(अ) निरपेक्ष दारिद्र्य (ब) सापेक्ष दारिद्र्य (क) वरील दोन्ही (ड) यांपैकी नाही.

**७८. (ड) ७९. (अ)**

८०. अन्न सुरक्षा कायदा, २०१३ च्या संदर्भात पुढीलपैकी योग्य विधान/विधाने निवडा.

(१) हा कायदा ७५ टक्के ग्रामीण व ५० टक्के शहरी लोकसंख्येला अन्न सुरक्षेचा लाभ उपलब्ध करून देतो.

(२) लाभार्थ्यांना दरमहा प्रतिकिलो रु. ३ प्रमाणे तांदूळ, प्रतिकिलो रु. २ प्रमाणे जाडेभरडे धान्य व प्रतिकिलो रु. १ प्रमाणे गहू उपलब्ध होणार आहे.

(अ) दोन्ही १ आणि २ बरोबर (ब) दोन्ही १ आणि २ चूक

(क) फक्त १ बरोबर (ड) फक्त २ बरोबर

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, २०१३ - ५ जुलै, २०१३ - देशातील गरीब जनतेस स्वस्त दरात धान्य मिळण्याचा हक्क या कायद्याने मान्य केला आहे. यानुसार प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक महिन्याला ५ किलोग्रॅम धान्य मिळणार आहे. तांदूळ ३ रुपये प्रतिकिलोग्रॅम, गहू २ रुपये प्रतिकिलोग्रॅम तर भरडधान्ये १ रुपया प्रतिकिलोग्रॅम दराने उपलब्ध होणार आहेत. ग्रामीण भागातील ७५ टक्के तर शहरी भागातील ५० टक्के नागरिकांना या योजनेच्या माध्यमातून स्वस्त दरात धान्य उपलब्ध होणार आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** भारतीय अर्थव्यवस्था - के'सागर के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ७५)*

८१. भारतीय जनगणना अहवाल, २०११ अनुसार एकूण जागतिक लोकसंख्येच्या किती टक्के भारतीय लोकसंख्या आहे?

(अ) १६.५ टक्के (ब) १७.३ टक्के (क) १७.५ टक्के (ड) १७.७ टक्के

**आयोगाने हा प्रश्न रद्द केला आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने अधिक माहिती पुढीलप्रमाणे–**

(१) जगातील एकूण भू-क्षेत्राच्या २.४२ टक्के इतके भू-क्षेत्र असलेल्या या देशात जगातील १७.५ टक्के लोक (सन २०११ प्राथमिक निष्कर्ष) दाटीवाटीने राहतात.

(२) सन २०११ च्या जनगणनेचे प्राथमिक निष्कर्ष लक्षात घेता जागतिक लोकसंख्येतील भारतीयांचे प्रमाण दर ६ व्यक्तींपैकी (किंबहुना, ५.७० व्यक्तींपैकी) १ भारतीय असे आहे.

(३) सन २००१ च्या जनगणनेनुसार जगातील १६.७ टक्के लोकसंख्या भारतात राहत होती व जगातील ६ व्यक्तींपैकी १ भारतीय होती.

(४) लोकसंख्येचा विचार करता भारताचा चीनच्या खालोखाल दुसरा क्रमांक लागत असला तरी भारताच्या लोकसंख्यावाढीचा वेग चीनच्या लोकसंख्यावाढीच्या वेगापेक्षा अधिक असून याच गतीने भारताच्या लोकसंख्येत वाढ होत राहिली तर एकविसाव्या शतकाच्या मध्यावर (किंबहुना, २०२१ वा २०३१ मध्येच) 'जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश' ही बिरुदावली मिरविण्याची पाळी आपल्यावर येईल.

(५) सन २००१-११ या दशकात (टक्केवारीचा विचार करता) दादरा आणि नगर हवेली या संघराज्य प्रदेशात इतर कोणत्याही राज्यापेक्षा वा केंद्रशासित प्रदेशापेक्षा अधिक म्हणजे ५५.९ टक्के इतकी लोकसंख्यावाढ झाली; तर नागालँडमध्ये सर्वांत कमी म्हणजे –०.६ टक्के इतकी लोकसंख्यावाढ घडून आली.

*(**संदर्भ :** भारताचा भूगोल वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरांसह - डॉ. अनिरुद्ध के'सागर पब्लिकेशन्स, (दहावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १५९, १६०)*

८२. पुढीलपैकी कोणत्या लोकसंख्या धोरणानुसार भारतीय पुरुषांचे विवाहाचे किमान वय २१ वर्षे व स्त्रियांचे किमान वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले?

(अ) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, १९७६ (ब) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, १९७७

(क) राष्ट्रीय लोकसंख्या धोरण, २००० (ड) लोकसंख्या भविष्यवेध (२००१-२०२६)

८०. (क) ८१. (*) ८२. (अ)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

**लोकसंख्याविषयक राष्ट्रीय धोरण – १९७६**

मुलगा व मुलगी यांच्या विवाहाच्या किमान वयाच्या मर्यादेत कायद्याने वाढ करणे; मुलांसाठी किमान वयोमर्यादा १८ वरून २१ पर्यंत तर मुलींसाठी किमान वयोमर्यादा १५ वरून १८ पर्यंत वाढविणे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** संपूर्ण मानव संसाधन विकास – व्ही. बी. पाटील के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ८३)*

८३. भारत सरकारने पुढीलपैकी कोणते कार्यक्रम 'सामाजिक सुरक्षा' या उद्देशाने सुरू केले आहेत?

(१) आम आदमी विमा योजना  (२) राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना

(३) राष्ट्रीय सामाजिक साहाय्य कार्यक्रम

(अ) फक्त १ आणि २ (ब) फक्त २ आणि ३ (क) फक्त ३ (ड) वरील सर्व

| अ.क्र. | योजना/कार्यक्रम/अभियान | सुरुवात | उद्देश/वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| २ | राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम (सध्या वरील कार्यक्रमांतर्गत खालील पाच योजना राबविल्या जातात.) | १५ ऑगस्ट, १९९५ | ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना वित्तीय सहायता करणे. |
| २६ | आम आदमी बिमा योजना (AABY) | २ ऑक्टोबर, २००७ | ग्रामीण भागातील भूमिहीन कुटुंबातील १८ ते ५९ वर्षे वयोगटातील रोजगार करणाऱ्या कुटुंब प्रमुखास वा कुटुंबातील मिळवत्या व्यक्तीस विमा संरक्षण पुरविणे. |
| २७ | राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजना (RSBY) | १ ऑक्टोबर, २००७ अंमलबजावणी १ एप्रिल, २००८ | ही रोख रक्कम विरहित व स्मार्ट कार्ड आधारित आरोग्य विमा योजना आहे. या योजनेअंतर्गत असंघटीत क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना दरवर्षी रुपये ३०,००० पर्यंत विमा सुरक्षा पुरविली जाते. |

*(**संदर्भ :** संपूर्ण तयारी – के'सागर के'सागर पब्लिकेशन्स (एकविसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ६७८ ते ६८१)*

८४. हरित राष्ट्रीय उत्पन्न (GNI) मापनाशी पुढीलपैकी कोणते घटक संबंधित आहेत?

(१) राष्ट्रीय उत्पन्न (२) नैसर्गिक संसाधनांमध्ये घट (३) पर्यावरणीय ऱ्हास

(अ) फक्त १ आणि ३ (ब) फक्त १ (क) फक्त १ आणि २ (ड) वरील सर्व

८५. 'सहस्रक विकास लक्ष्ये (MDGs)' यांमध्ये पुढीलपैकी कशाचे मापन केले जाते?

(१) दारिद्र्य व भूक  (२) महिला सबलीकरण

(३) पर्यावरणीय शाश्वतता  (४) विकासासाठी जागतिक भागीदारी

(अ) फक्त १ आणि २  (ब) फक्त ३ आणि ४

(क) फक्त १, २ आणि ३  (ड) वरील सर्व

८३. (ड) ८४. (ड) ८५. (ड)

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

## सहस्रकातील विकास उद्दिष्टे

सहस्रकातील उद्दिष्टांबाबतच्या जाहीरनाम्यामध्ये आठ विकास उद्दिष्टे स्वीकृत करण्यात आली असून ती उद्दिष्टे सन २०१५ पर्यंत साध्य करणे अपेक्षित होते.

भारताशी निगडित ही आठ उद्दिष्टे आणि त्यांची १२ कालमर्यादित लक्ष्ये यांचा तपशील पुढीलप्रमाणे सांगता येईल.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

| उद्दिष्ट | लक्ष्य |
|---|---|
| (१) अति दारिद्र्य व उपासमारी निर्मूलन | (अ) १९९० ते २०१५ दरम्यान राष्ट्रीय दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण निम्म्यावर आणणे.<br>(ब) १९९० ते २०१५ दरम्यान उपासमारीने पीडित लोकांचे प्रमाण निम्म्यावर आणणे. |
| (२) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण | सन २०१५ पर्यंत सर्व मुले प्राथमिक शिक्षणाचा संपूर्ण पाठ्यक्रम पूर्ण करतील याची खातरजमा करणे. |
| (३) स्त्री-पुरुष समानता आणि महिला सक्षमीकरणास प्रोत्साहन | प्राथमिक व माध्यमिक शिक्षणातील स्त्री-पुरुष विषमता विशेषतः २००५ पर्यंत व शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील स्त्री-पुरुष विषमता सन २०१५ पर्यंत दूर करणे. |
| (४) बालमृत्यू कमी करणे | सन १९९० ते २०१५ दरम्यान पाच वर्षांखालील बालमृत्युदराचे प्रमाण दोन-तृतीयांशाने कमी करणे. |
| (५) माता स्वास्थ्य सुधारणे | सन १९९० ते २०१५ दरम्यान माता मृत्युदर-तीन-चतुर्थांशाने कमी करणे. |
| (६) एचआयव्ही/ एड्स्, मलेरिया आणि इतर आजारांशी लढा देणे. | (अ) सन २०१५ पर्यंत निर्मूलन करणे व एच्आयव्ही/एड्स्चे संसर्ग प्रतिकूल करणे.<br>(ब) सन २०१५ पर्यंत निर्मूलन करणे व मलेरिया आणि इतर प्रमुख आजारांचा संसर्ग प्रतिकूल करणे. |
| (७) पर्यावरणाचा समतोल सातत्याने राखणे | (अ) देशाच्या धोरणांमध्ये व कार्यक्रमांमध्ये शाश्वत विकासाची तत्त्वे एकरूप करणे आणि पर्यावरणविषयक संसाधनांची होणारी हानी प्रतिकूल करणे.<br>(ब) सन २०१५ पर्यंत शुद्ध पिण्याचे पाणी व मूलभूत स्वच्छता सुविधा सातत्याने उपलब्ध नसलेल्या लोकांचे प्रमाण निम्म्यावर आणणे.<br>(क) सन २०२० पर्यंत झोपडपट्टीत राहणाऱ्या किमान १०० दशलक्ष लोकांच्या जीवनात लक्षणीय सुधारणा घडवून आणणे. |
| (८) विकासासाठी जागतिक स्तरावर भागीदारी निर्माण करणे. | खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने नवीन तंत्रज्ञानाचे, विशेषतः माहिती व दळणवळण क्षेत्राचे लाभ जनतेला उपलब्ध करणे. |

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** संपूर्ण मानव संसाधन विकास - व्ही. बी. पाटील के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २८ व २९)*

८६. महिला व बालकल्याण योजनांमध्ये पुढीलपैकी कोणत्या योजनांचा समावेश होतो?
(१) अंगणवाडी सेवा योजना (२) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना
(३) राष्ट्रीय पोषण अभियान (४) बाल सुरक्षा योजना
K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus
(अ) फक्त १ आणि २ (ब) फक्त ३ आणि ४
(क) फक्त १, २ आणि ३ (ड) वरील सर्व

८७. द्रारिद्र्य घटविण्याच्या कुठल्याही धोरणात स्वयंरोजगार आणि वेतनाधिष्ठित रोजगार या दोन्ही गोष्टींचा समावेश होणे गरजेचे आहे; कारण ....
(१) ग्रामीण भागात स्वयंरोजगार हा जास्त प्रचलित आहे.
(२) वेतनरोजगारावरील अवलंबित्व हे मालकांवरील (एम्प्लॉयर) अवलंबित्व वाढविते.
(३) असे केले नाही तर श्रीमंत व गरिबांमधील दरी वाढेल.
(४) श्रीमंतांची मालमत्ता संसाधने वाढतील.
(अ) फक्त १ आणि २ (ब) फक्त २ आणि ३ (क) फक्त ३ आणि ४ (ड) वरील सर्व

८८. 'मानवी दारिद्र्य निर्देशांक' ही संकल्पना सर्वप्रथम .... या अहवालात मांडली गेली.
(अ) मानव विकास अहवाल, १९९० (ब) मानव विकास अहवाल, १९९७
(क) मानव विकास अहवाल, २००१ (ड) मानव विकास अहवाल, २०१४

**बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक (Multidiamensional Poverty Index-MPI)**

- बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाची सुरुवात यु.एन.डी.पी. आणि ऑक्सफर्ड विद्यापीठ यांनी संयुक्तपणे जुलै, २०१० मध्ये केली.
- बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाने १९९७ पासून लागू करण्यात आलेल्या मानवी दारिद्र्य निर्देशांकाची (HPI) जागा घेतली आहे.
- युएनडीपीच्या मानव विकास अहवालात बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक प्रकाशित केला जातो.
- बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाचे मापन करण्यासाठी आरोग्य, शिक्षण आणि राहणीमान हे तीन घटक विचारात घेण्यात येतात.

*(**संदर्भ :** संपूर्ण मानव संसाधन विकास – व्ही. बी. पाटील के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : ९८)*

८९. 'शिरगणनात्मक शहरे' यांची झालेली भरमसाट वाढ हे एक मोठे आव्हान आहे; कारण अशा शहरांमध्ये–
(१) शहर अनुशासन संरचना नसतात.
(२) आवश्यक त्या नागरी पायाभूत सुविधा नसतात.
(३) शहरांची वाढ ही वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे झालेली असते.
(अ) १, २ आणि ३ (ब) १ आणि २ (क) २ आणि ३ (ड) १ आणि ३

९०. बाराव्या पंचवार्षिक योजनेचे (२०१२-१७) मुख्य उद्दिष्ट कोणते होते?
(अ) आर्थिक वृद्धी व स्थिर विकास साधणे.
(ब) जलद वृद्धी व विकास साधणे.
K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus
(क) जलद व अधिक सर्वसमावेशक वृद्धी साधणे.
(ड) जलद, शाश्वत आणि अधिक सर्वसमावेशक वृद्धी साधणे.

८६. (ड) ८७. (ड) ८८. (ब) ८९. (अ) ९०. (ड)

२० ऑगस्ट, २०११ रोजी नियोजन आयोगाने, तर १५ सप्टेंबर, २०११ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने बाराव्या योजनेच्या दिशादर्शक आराखड्यास मंजुरी दिली. राष्ट्रीय विकास परिषदेने २२ ऑक्टोबर, २०११ रोजी आपल्या छप्पन्नाव्या बैठकीत बाराव्या योजनेचा दिशादर्शक आराखडा स्वीकृत केला. राष्ट्रीय विकास परिषदेने पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत २७ डिसेंबर, २०१२ रोजी योजनेच्या मसुद्यास अंतिम मान्यता दिली.


'जलद, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास' हे ध्येय बाळगून १ एप्रिल, २०१२ पासून बारावी पंचवार्षिक योजना कार्यान्वित झाली.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** भारतीय अर्थव्यवस्था - के'सागर के'सागर पब्लिकेशन्स, (पहिली आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १०२)*

९१. खालीलपैकी काय जिओस्टेशनरी ऑर्बिट (GEO) चे अचूकपणे वर्णन करते?
(अ) समुद्रसपाटीपासूनची उंची २०,००० कि.मी. व एक कक्षा परिभ्रमणास १२ तास लागतात.
(ब) समुद्रसपाटीपासूनची उंची ३६,००० कि.मी. व एक कक्षा परिभ्रमणास २४ तास लागतात.
(क) समुद्रसपाटीपासूनची उंची ४०० कि.मी. व एक कक्षा परिभ्रमणास ९० मिनिटे लागतात.
(ड) यांपैकी कुठलेही नाही.

**भूस्थिर कक्षा :** भूस्थिर कक्षा (Geostationary Orbit) हा विषुववृत्तीय कक्षेचाच खास प्रकार आहे. या वर्तुळाकार कक्षेतील उपग्रह पृथ्वीपासून खूप उंचीवर स्थापित केले जातात. ही उंची ३५,९०० ते ३६,००० किलोमीटर अशी असते. या उंचीवर उपग्रह स्थापित करण्याचा फायदा असा आहे की या कक्षेत उपग्रह भूस्थिर (Geostationry) केल्यास त्याची जागा तुलनेने फारशी बदलत नाही. याचे कारण ३५,९०० किलोमीटर अंतरावर अपकेंद्री बलामुळे (Centrifugal Force) पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या बलाचा परिणाम शून्य होतो. भूस्थिर याचा अर्थ या कक्षेतील उपग्रह पृथ्वीच्या परिवलनाच्याच (Rotation) वेगाने फिरत असल्याने पृथ्वीवरून बघितल्यास ते आकाशात एकाच जागी स्थिर असल्याप्रमाणे भासतात. भूस्थिर कक्षेचा मुख्य उपयोग असा आहे की, पृथ्वीच्या परिवलनाप्रमाणेच (सर्वसाधारणपणे २३ तास, ५६ मिनिटे व ४ सेकंद) फिरणाऱ्या उपग्रहांना एका संपूर्ण गोलार्धावर




K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

९१. (ब)

नजर ठेवता येते. चक्रीवादळांवर लक्ष ठेवणाऱ्या आणि संदेशवहनात वापरल्या जाणाऱ्या उपग्रहांसाठी ही ३५,९०० किलोमीटरची कक्षा अत्यंत उपयुक्त ठरते.

पृथ्वीच्या परिवलना एवढ्याच काळात पृथ्वीभोवती फिरणाऱ्या उपग्रहांच्या कक्षेला जिओसिन्क्रोनस (Geosynchranous) असे देखील म्हणतात. भारताच्या जीसॅट-१२ (GSAT-12) या दूरसंचार क्षेत्रासाठी उपयुक्त उपग्रहाची कक्षा या प्रकारची आहे.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** समग्र विज्ञान तंत्रज्ञान - डॉ. प्रमोद जोगळेकर के'सागर पब्लिकेशन्स, (तिसरी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : १९६, १९७)*

९२. फ्रेसनल्स बायप्रिझममध्ये (λ) तरंगलांबीची किंमत कशावर अवलंबून असते?
(अ) दोन संलग्न उगमस्थानांतील अंतर
(ब) फ्रिंजची रुंदी
(क) स्लिट व दूरदर्शकाची नेत्रकाच यांतील अंतर
(ड) वरील सर्व

९३. ज्या व्यक्तीचे सुस्पष्ट दृष्टीचे अंतर ५० cm आहे, अशा व्यक्तीच्या चष्म्याच्या भिंगांचे नाभीय अंतर किती असेल?
(अ) ५० cm, अंतर्वक्र (ब) ५० cm, बहिर्वक्र (क) २५ cm, अंतर्वक्र (ड) २५ cm, बहिर्वक्र

९४. १० ओहमचा रोध १२ V च्या विद्युतघटास जोडल्यास रोधातून १.१ A विद्युतधारा वाहते, तर विद्युतघटाचा अंतर्गत रोध काढा.
(अ) १० Ω (ब) ०.१ Ω (क) १०.९ Ω (ड) ०.९१ Ω

९५. एकमेकांपासून १ मिलिमीटर अंतरावर असलेली दोन समांतर रेखाच्छीद्र पडद्यापासून १ मीटर अंतरावर ठेवलेल्या आहेत. त्यांच्यावर ५०० नॅनोमीटर तरंगलांबीची शलाका सोडल्यानंतर पडद्यावर व्यतिकरण परिणामामुळे तयार झालेल्या पंक्तींमधील अंतर किती असेल?
(अ) ५.० mm (ब) ०.५ mm (क) ५.० cm (ड) ०.०५ mm

९६. एका वाफेच्या इंजीनाला ३.६ × १०$^{९}$ J/min दराने उष्णता पुरविली जाते. त्यापासून इंजीन ५.४ × १०$^{८}$ J/min दराने कार्य करते. अशा इंजीनाची कार्यक्षमता किती टक्के असेल?
(अ) १५ टक्के (ब) १२.५ टक्के (क) ८५ टक्के (ड) ८७.५ टक्के

९७. काही झाडांमधे तांब्याच्या कमतरतेमुळे सालीवर फोड व खोलवर तुकडे पडून त्यातून डिंक बाहेर येतो. अशा रोगाला .... म्हणतात.
(अ) एक्झान्थिमा (ब) पांढरा डोळा (क) डायबॅक (ड) पेशी मृत होणे

९८. सुक्रोजचे एरोबिक ऑक्सिडेशन होऊन अधिकतम किती ATP तयार होतात?
(अ) ३७ (ब) ४४ (क) ६० (ड) ५०

९९. दोन नावे (बायनॉमिअल) देण्याची वर्गीकरण पद्धती कोणी सुचविली?
(अ) कॅरोलस लिनियस (ब) बेन्थम आणि हुकर (क) थिओफ्रॅस्टस (ड) हचिनसन

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

भारतात फार प्राचीन काळापासून सजीवांचे वर्गीकरण करण्याचे प्रयत्न झाले आहेत. त्या काळात वनस्पती व प्राणी यांचे बाह्य स्वरूप व उपयोग यांवरून वर्गीकरण केले जात असे; परंतु सजीवांची शरीररचना व जीवनव्यापार

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९२. (ड) | ९३. (ब) | ९४. (ड) | ९५. (ब) | ९६. (अ) | ९७. (अ) | ९८. (क) | ९९. (अ) |

यांवर आधारलेले शास्त्रीय वर्गीकरण **कॅरॉलियस लिनियस** (इ. स. १७०७ – १७७८) या स्वीडिश वनस्पतिशास्त्रज्ञाने पहिल्यांदा सुचविले. लिनियसने सजीव सृष्टीचे वनस्पतिसृष्टी आणि प्राणिसृष्टी असे दोन प्रमुख समूह केले आहेत. या प्रत्येक समूहाचे त्याने संघ, वर्ग, गण, कुल, प्रजाती आणि जाती असे लहान समूह केले. प्रत्येक सजीवाचे वर्गीकरण करताना लिनियसने त्यांना दोन नावे दिली. यांपैकी पहिले नाव प्रजातीविषयक आणि दुसरे नाव जातीविषयक आहे. ही नावे बहुधा लॅटिन भाषेत आहेत. या दोन नावे देण्याच्या पद्धतीस 'द्विनामपद्धती' असे म्हणतात. उदाहरणार्थ– आंबा (Mangifera indica) यामध्ये प्रजातीच्या नावाचे पहिले अक्षर मोठ्या लिपीत तर जातीच्या नावाचे आद्याक्षर लहान लिपीत लिहितात. परस्परांशी पुष्कळ साम्य असणाऱ्या वनस्पतींच्या (किंवा प्राण्यांच्या) गटास जाती (Species) म्हणतात; तसेच परस्परांशी पुष्कळ साम्य दाखविणाऱ्या जातींच्या गटास प्रजाती (Genus) म्हणतात.

K'Sagar Publication
Subscribe → @ksagarfocus

*(**संदर्भ :** संपूर्ण सामान्य विज्ञान – प्रा. कविता भालेराव के'सागर पब्लिकेशन्स, (एकोणिसावी आवृत्ती) पृष्ठ क्रमांक : २४, २५)*

१००. सर जे. सी. बोस, भारतीय वैज्ञानिक यांच्यानुसार कॉर्टिकल थरांच्या आतील जिवंत पेशींमुळे 'असेंट ऑफ सॅप' .... या क्रियेमुळे घडते.

(अ) पल्सेटरी क्रिया
(ब) ट्रान्सपिरेशन पूल सिद्धान्त
(क) कोहीजन सिद्धान्त
(ड) मूळ दाब सिद्धान्त

*All Exam syllabus are available here–*
*for more updates Join our Telegram Channel–*
**Subscribe → @ksagarfocus**

For Serious Aspirants of MPSC, UPSC, RRB, Banking, SSC, LIC, NET, SET, TET, CTET, CDPO, Saralseva Bharati or any other Competitive Exam, send queries & comments on–

**Administrators - @aniruddhaksagar**
**@Nitahirrao**

१००. (अ)